

IRBK-0105325
IRBK-0105325

# मठ ११

ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय [illegible]
क्र. 5325

बंकिम साहित्य-माला – ११

# आनंदमठ

[ संक्षेपित आवृत्ति ]

२९४५०
९६२२

: लेखक :

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय

: अनुवादक–संक्षेपक :

भा. वि. वरेरकर

का. क्र. ५३२५

IRBK-0105325

…ंस्था, मुंबई ४.

: प्रकाशक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन-संस्था,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

★

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

★

आवृत्ति पहिली,
मे १९५५

★

किंमत दोन रुपये

★

: मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

# — प्रस्तावना —

प्रस्तुत कादंबरी १८८० सालीं 'वंगदर्शन' नामक बंगाली मासिकांत क्रमशः सुरू झाली होती, ती १८८२ सालच्या ज्येष्ठ महिन्यांत संपूर्ण झाली. त्याच सालीं—म्हणजे १८८२ सालीं—ती पुस्तक रूपानें प्रसिद्ध झाली.

या कादंबरींत कर्त्यांनें आपल्या आयुष्यांत वेळोवेळीं बरेच फेरफार केले होते. पहिल्या आवृत्तींत उपक्रमणिकेंत एक, प्रथम खंडांत पंचवीस आणि द्वितीय खंडांत वीस, असे सेहेचाळीस परिच्छेद एकशें एक्याणव पानांत पुरे झाले होते. कर्त्याच्या हयातींतच शेवटची पांचवी आवृत्ती निघाली होती. आणि तींत उपक्रमणिका एक, प्रथम खंड अठरा, द्वितीय खंड बारा आणि चतुर्थ खंड आठ, असे सत्तेचाळीस परिच्छेद दोनशें अकरा पृष्ठांत झाले होते.

प्रस्तुत भाषांतर या पुस्तकाच्या पांचव्या आवृत्तीवरून केलेलें आहे. यानंतर या पुस्तकाच्या बऱ्याच आवृत्त्या निघाल्या आणि वंगभंगाच्या चळवळीच्या वेळीं 'वंदे मातरम्' हें गीत युद्ध गीतासारखें वापरण्यांत येऊं लागलें, म्हणून ब्रिटिश सरकारनें हें पुस्तक जप्त केलें.

आज हें पुस्तक वाचलें असतांना दिसून येतें, कीं यांत ब्रिटिशांविरुद्ध कांहीं नव्हतें. उलट ब्रिटिश राज्याच्या अस्तित्वाचें आणि उपकारिकतेचें समर्थनच करण्यांत आलें होतें. असें असूनही त्यावेळीं हें पुस्तक जप्त करण्यांत आलें तें केवळ 'वंदे मातरम्' गीतामुळें. किंबहुना राष्ट्रीयत्वाच्या भावनेला पोषक असणारें, कुठल्याही जुलमी राजसत्तेविरुद्ध विद्रोह उत्पन्न करायला प्रवृत्त करणारें वाङ्मय त्यावेळच्या सरकारला नको होतें म्हणूनच हें पुस्तक त्यावेळीं जप्त करण्यांत आलें. मधल्या काळांत त्याच्यावरची बंदी एकदां उठली होती

आणि पुन्हा १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळीनंतर पुन्हां तें जप्त करण्यांत आलें होतें. पुन्हां त्याजवरील बंदी उठवण्यांत आली ती काँग्रेसची मंत्रिमंडळें अस्तित्वांत आल्यावर.

'संतानांचें बंड' ज्याला स्वातंत्र्यसंग्राम असें नांव देतां येईल, ती घटना म्हणजे ऐतिहासिक सत्य आहे. १८५७ सालच्या पूर्वीचा हा स्वातंत्र्यसंग्राम आहे. त्या घटनेचा जो काल दिला आहे तोही ऐतिहासिक आहे. मात्र प्रस्तुत कादंबरींत या 'संतान' पुढाऱ्यांना ज्याप्रकारचें धार्मिक आणि उज्वल स्वरूप देण्यांत आलें आहे, तसें 'बंड' करणारे संतान वस्तुतः अस्तित्वांत नव्हते. ते केवळ बंडखोर होते. त्या बंडखोरांची भूमीका ध्येयवादी किंवा राष्ट्रवादी नव्हती. ते जुलमाला विटले होते यांत शंकाच नाहीं; तें बंड जुलुमशाही विरुद्धच होतें हेंही खरें; पण त्या बंडखोरांच्या वृत्तींत आणि ध्येयांत मूलभूत फरक होता. प्रस्तुत कादंबरींत कर्त्यानें या संतानांच्या प्रवृत्तीचें जें उदात्तीकरण केलें आहे, ती लेखकाची स्वतंत्र कल्पना आहे.

अक्षयचंद्र सरकार यांनी बंकिमबाबूंवरील आपल्या लेखांत म्हटलें आहे, "आनंदमठ" ज्यावेळीं लिहिलें जात होतें, त्यावेळीं क्षेत्रनाथ मुखोपाध्याय हेही त्यांच्यासारखेच एक डेप्युटी कलेक्टर होते. दोघेही शेजारींशेजारींच राहत होते. तेही संध्याकाळीं बंकिमबाबूंच्या घरीं येत असत तसाच मींही जात असें.

'क्षेत्रबाबू स्वरज्ञ होते. त्यांनींच हें गीत टेबलहार्मोनियम हातीं घेऊन 'मल्हार' रागांत बसविलें होतें. त्या स्वराला अनुसरून आणि तें गीत तालबद्ध करण्यासाठीं क्षेत्रबाबूंच्या सुचनेप्रमाणें त्यांनीं त्या गीतांत क्वचित् फेरबदल केले होते."

आज 'वंदे मातरम्' गीताला जे निरनिराळे 'राग' लावले जाण्याचा प्रयत्न होत आहे, तो ध्यानीं घेऊनच या गोष्टीचा उल्लेख इथें केला आहे. 'मल्हार' हाच राग या गीताला युक्त आहे आणि त्याच रागांत हें गीत म्हटलें जावें. भलभलते राग लावण्याचा प्रयत्न अप्रयोजक आहे.

या कादंबरींत कालाचा फरक नसला तरी कथावस्तूच्या 'स्थलाच्या' बाबतींत मात्र मतभेद आहे. कांहींच्या मतें संतानांचें बंड बीरभूम जिल्ह्याच्या

आसपास कुठेंतरी झालें होतें, तर कुणाचें म्हणणें तें पूर्णिया, तिरहूत, आणि दीनापूर या भागांत झालें असावें.

संतानांच्या कार्यपद्धतींत आणि चारित्र्यांत या कादंबरींत जरी स्वातंत्र्य अवलंबिलेलें आहे, तरीही तें अगदींच ऐतिहासिक नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. स्वतः बंकिमबाबू मात्र ही कादंबरी केवळ काल्पनिक आहे असेंच म्हणत असत.

मात्र या कादंबरींतील घटना ऐतिहासिक आहेत. वॉरन हेस्टिंग्सच्या पत्रांत या घटनांचा उल्लेख आहे. त्या पत्रांत असें म्हटलें आहे, कीं रंगपूरच्या जवळपास परगण्याचे शिपाई बरोबर घेऊन कॅप्टन टॉमस नामक नामजादा अधिकारी निघाला होता. त्याच्यावर तीन हजार बंडखोरांनीं हल्ला करून त्याचा जीव घेतला. हे हल्लेखोर संन्यासी होते. त्याच पत्रसंग्रहांतील आणखी एका पत्रांत म्हटलें आहे, 'आमच्या प्रांताला सध्यां लढाईचें स्वरूप आलें आहे. एका संन्याशाच्या टोळीनें परगणा शिपायांच्या तुकडीवर हल्ला करून दोन ऑफिसरांचा शिरच्छेद केला. त्यांतले एक तुमच्या परिचयाचे कॅप्टन टॉमस हे होते. ब्रिगेड शिपायांचीं चार बटालियन्स त्यांचा पाठलाग करीत आहेत, पण हे लोक समोरासमोर लढाई देत नाहींत. त्यांची छावणी नसते, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या अंगावर कपडेसुद्धां नसतात. नदीनाल्यांचा आधार घरून ते लढत असतात. त्यांना घरदार नाहीं, बायकापोरें नाहींत, ते गांवोगांव भटकत हिंडत असतात आणि कोणत्याही गांवांतील सुदृढ मुलें दिसलीं, कीं त्यांना घेऊन आपल्यांत सामील करून घेतात. ते महाबलवान् आणि कर्तृत्ववान् लोक आहेत. त्यांत कांहीं व्यापारीही आहेत. पण बहुतेक लोक यात्रेकरूसारखे रहात असल्यामुळें सामान्य नागरिकांना त्यांच्याबद्दल आदर आहे आणि त्याचमुळें त्यांच्या हालचालींची कांहींही माहिती द्यायला कुणीही तयार नसतो. एकदम आकाशांतून खालीं पडल्यासारखे तें कुठूनही उपस्थित होतात. ते कणखर आहेत, शूर आहेत आणि त्यांचा उत्साह असामान्य असल्यामुळें ते भारी होऊन बसले आहेत."

वॉरन हेस्टिंग्सच्या या पत्रांतील पुष्कळशी माहिती इथें देण्याजोगी असली तरी विस्तारभयास्तव ती इथें देणें अशक्य झालें आहे.

वास्तविक संन्यास हा शैवांचा धर्म आहे—वैष्णवांचा नव्हे. बंगाल्यांत बहुधा सर्वच गोसावीबैराग्यांना ‘ संन्यासी किंवा फकीर ’ म्हणायची सुरवात त्या प्रांतांत पहिल्यानें आलेल्या इंग्रजांनीं केल्यामुळें आणि त्यांच्या सरकारी अहवालांत तोच शब्द वापरला गेल्यामुळें बंकिमबाबूंनीं या संतानांना उद्देशून ‘ संन्यासी ’ हा शब्द वापरला असावा. मात्र त्या त्या व्यक्तीचा वैयक्तिक उल्लेख करतांना त्यांनीं ‘ गोस्वामी ’ हा शब्द वापरल्यामुळें ‘ आनंदमठा’तील संन्यासी वैष्णव ठरत आहेत. या वैष्णव गोस्वाम्यांचे वेष किंवा आचारविचार कोणत्याही दृष्टीनें संन्याशांसारखे नाहींत.

सर वॉल्टर स्कॉटच्या Old Mortality या कादंबरीशीं ‘ आनंदमठ ’ कादंबरीचें बरेचसें साम्य आहे. दोन्हीही कथेंत बंडखोर संन्यासी किंवा धर्मोन्मत्त योद्धे राजशक्तीशीं झगडा करीत होते. ज्या विशिष्ठ काळांत बंकिमबाबूंनीं ही कादंबरी लिहिली त्या काळांत इंग्रजी वाङ्मयाचा प्रभाव मराठी वाङ्मयनिर्मितीवर पडल्यावांचून राहत नव्हता.

इतिहासाच्या दृष्टीनें या कादंबरीच्या कालखंडाचा अभ्यास करणें अवश्य आहे. बंगाली भाषेंत आणि इंग्रजींतही या कादंबरीवर चिकित्सक दृष्टीनें लिहिलेले अनेक लेख आहेत. त्या सर्वांची यादी या लहानशा प्रस्तावनेंत देणें अशक्य आहे.

श्री. नरेशचंद्र सेनगुप्त यांनीं १९०६ सालीं Abbey of Bliss या नांवानें या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध केला आहे. श्री. अरविंद घोष यांनीं ‘ वंदेमातरम् ’ या गीताचा इंग्रजींत गद्य पद्य अनुवाद केला आहे.

Encyclopedia Britanica मध्यें प्रस्तुत कादंबरी आणि वंदे मातरम् गीत यांजबद्दल जो लेख आलेला आहे, तो आमच्या विद्यार्थ्यांनीं नजरेखालीं घालणें अवश्य आहे.

या कादंबरीचा मराठी अनुवाद श्री. शिवराम गोविंद फाळके यांनीं १८९७–९८ च्या सुमारास बडोदें येथें प्रसिद्ध केला होता. त्याशिवाय भारतगौरव ग्रंथमालेंतून वासुदेव गोविंद आपटे यांनीं केलेला अनुवाद १९२३ सालीं प्रसिद्ध झाला आहे. श्री. कुळकर्णी यांचाही एक अनुवाद त्याच सुमारास प्रसिद्ध झाला होता. आज हीं पुस्तकें उपलब्ध नाहींत. शिवाय

आजच्या काळांत अनुवादाच्या पद्धतींतही नवी दृष्टी निर्माण झालेली आहे, त्या दृष्टीनें शक्य तेवढ्या सुबोध भाषेंत हा अनुवाद करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

आज सर्वत्र ' वंदे मातरम् ' म्हणून जो तो टाहो फोडीत आहे, पण ' वंदे मातरम् ' गीताची उत्पत्ति कोणत्या परिस्थितींत झाली, याची आजच्या पिढीला कितपत जाणीव आहे ! एका कादंबरीकारानें आपल्या एका कादंबरींत घातलेलें हें गीत आज अखिल भारताचें राष्ट्रगीत होऊन बसलें आहे, हें आजच्या देशी भाषेच्या विश्वविद्यालयींल अध्यापकांना या अनुवादामुळें तरी कळून येईल. कथा, कादंबरी, नाटकादी स्वयंकल्पित साहित्याची ललित वाङ्मय म्हणून हेटाळणी करणाऱ्या स्वयंमन्य पंडितांच्या बुद्धिवादाला ही कादंबरी म्हणजे एक बिनतोड उत्तर आहे.

जगाच्या इतिहासांत उलथापालथ झाली आहे ती समशेरीच्या जोरापेक्षां कथा, कादंबरी, नाटक लिहिणाऱ्या लेखकाच्या लेखणीच्या माऱ्यामुळेंच. लेखणीच्या कसोटीवर समशेरींना धार चढवलेली आहे. या अनुवादामुळें आजच्या विद्यार्थ्याला एवढी जरी जाणीव झाली, तरी या माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मी समजेन.

हाजीकासम वाडी
मुंबई नं. ७

मामा वरेरकर

# उपक्रमणिका

तें अत्यंत अफाट अरण्य होतें. अरण्यांतलीं बरीचशीं झाडें शाल वृक्षाचीं होतीं. तीं तोडलीं नव्हतीं, किडलीं नव्हतीं, इतकीं दाट झालीं होतीं कीं त्यांतून सूर्याचे किरण खाली येत नव्हते. खालीं निबिड अंधःकार पडला होता. मध्यान्हीचा प्रकाश देखील अस्पष्ट—भयानक भासत होता.

मनुष्याचा प्रवेश तिथें होणें अशक्य होतें. पानांची सळसळ आणि जंगली पशुपक्षांचे आवाज यांच्याखेरीज दुसरा कसलाही शब्द तिथें ऐकूं येत नव्हता.

तें भलें मोठें अफाट अरण्य काळोखानें भरून गेलें होतें. त्यांतून रात्रीची वेळ. दोन प्रहर रात्र उलटली होती. आंतल्या काळोखाचें वर्णन करणें तर अशक्यच होतें.

पशुपक्षी झोंपी गेले होते. या जंगलांत राहणाऱ्या पशुपक्षांची संख्या लाखानें आणि कोटीनें मोजतां आली असती, पण त्या कुणाचा एवढासुद्धां आवाज ऐकूं येत नव्हता. या काळोखाची कल्पना करतां आली नसती. शब्दमयी पृथ्वीच्या निस्तब्धतेची कल्पना करणें अशक्य होतें.

*या अंत नसलेल्या अरण्यांत* घनघोर अंधःकारांत कल्पनातीत अशा निस्तब्धतेंत एक आवाज उठला, " माझी मनीषा पूर्ण होणार नाहीं का ? "

तेवढाच आवाज उठल्यावर पुन्हां सर्वत्र शांतता पसरली. या अरण्यांत मनुष्याचा शब्द उत्पन्न होऊन नाहींसा झाला असें कोण म्हणणार होतें ?

थोड्या वेळानें पुन्हां आवाज ऐकूं आला. मनुष्याच्या कंठांतला तोच पूर्वीचा मानवी शब्द, " माझी मनीषा पूर्ण होणार नाहींच का ! "

तो काळोखाचा समुद्र अशा प्रकारें तीन वेळां हादरला गेला त्यावेळीं उत्तर आलें, " कसला पण लावशील ? "

प्रत्युत्तर आलें, " माझें जीवनसर्वस्व पणाला लावीन. "

प्रतिशब्द उठला, " जीवन म्हणजे तुच्छ वस्तु. कुणीही सहज त्याचा त्याग करील. "

" त्याशिवाय दुसरं कांहीं आहे ! दुसरं काय देशील ? "

तेव्हां उत्तर आलें, " भक्ति. "

# आनंद मठ

२८१४५०
आ.वा.
१५३२

# प्रथम खंड

## — १ —

१७७० सालीं पदचिन्ह गांवीं उन्हाळ्याचा ताप बेसुमार वाढला होता. गांवांत घरांची दाटी होती पण माणसें नव्हतीं. बाजारांत सुंदर सुंदर दुकानें, सुंदर सुंदर शेंकडों इमारतीचीं घरें, आणि मधून मधून लहान मोठ्या इमारती दिसून येत होत्या. पण सर्वत्र शुकशुकाट होता. बाजारांतलीं दुकानें बंद होतीं. आज बाजाराचा दिवस होता, पण बाजार भरायचें लक्षण दिसत नव्हतें. शिक्षकांनीं शाळा बंद केल्या होत्या. मुलेंसुद्धां आज रडायला भीत होतीं. रस्त्यावर लोक दिसत नव्हते. नदीच्या घांटावर स्नानासाठीं कुणी आले नव्हते. घराच्या दारांत माणसें दिसत नव्हतीं. झाडावर पक्षी नव्हते. कुरणांत गुरें नव्हतीं. फक्त स्मशानांत कोल्हे कुत्रे तेवढे वावरत होते. एक मोठा प्रासाद होता—त्याचे मोठमोठे सुळके असलेले खांब दुरून नजरेला येत होते—त्या घरांच्या गर्दींत तो प्रासाद पर्वताच्या शिखरासारखा नजरेंत भरत होता.

पण त्याचें दार बंद होतें. या भयाण घरांत मध्यान्हीच्या काळोखांत, कुठल्या तरी आंतल्या एका खोलींत निशिगंधाच्या फुलाच्या जोडीसारखें एक दाम्पत्य बसलें होतें. तें दाम्पत्य विचारांत पडलें होतें. त्यांच्या नजरेसमोर दुष्काळाची छाया दिसत होती.

१७६८ सालीं, पिक चांगलेंसें आलें नव्हतें, त्यामुळें १७६९ सालीं जिकडे तिकडे महागाई झाली. लोक त्रस्त झाले, पण राजा मात्र दमडी दुगाणीनें कर वसूल करीत होता. हा कर देण्याच्या पायीं गरिबांना एक वेळ जेवणावर भागवावें लागत होतें.

१७६९ सालीं पाऊस बरा पडला. लोकांना वाटलें, देवानें कृपा केली. सारे आनंदांत होते. आश्विन महिन्यांत अचानक देवाची अवकृपा झाली. पाऊस थांबला. शेतांतलें धान्य वाळून त्याचें गवत झालें. लोकांना उपास पडूं लागले. महसूल मंत्री होता महमद रेझाखान. त्याला वाटलें, आपली प्रतिष्ठा राखायची वेळ हीच. त्यानें शेंकडा १० टक्के खंड वाढवला. बंगाल्यांत जिकडे तिकडे हलकल्लोळ माजला.

लोकांना उपास पडत होते. पुढें रोगानें गांठलें. होतें नव्हतें तें सारें विकून झाल्यावर मग ते मुलगे विकूं लागले. त्यानंतर बायकांची विक्री सुरू झाली. सारेच विक्रीसाठीं तळमळत होते पण गिऱ्हाईक नव्हतें.

अन्न मिळत नाहीं म्हणून झाडाचा पाला खायची सुरवात झाली. कुणी गवत खाऊं लागले. कुणी लव्हाळे खाऊं लागले. क्षुद्र आणि जंगली लोक उंदीर, मांजरें आणि कुत्रे खाऊं लागले.

रोगाला हीच संधी मिळाली. ताप, पटकी, क्षय, आणि देवीच्या सांथी सुरू झाल्या. कोण कुणाला औषधोपचार करीत नव्हता कीं ढुंकून पहातही नव्हता. मेल्यावर मुडदा जाळायलाही कुणी नव्हता. बड्या बड्या घरांत मेलेले मुडदे कुजून सडून जात होते.

महेन्द्रसिंह पदचिन्ह गांवांतला मोठा श्रीमंत माणूस. पण आज गरीब आणि श्रीमंत माणसाचा दर एकच झाला होता. त्या भल्या मोठ्या घरांत तो, त्याची बायको आणि एक छोटी मुलगी एवढींच माणसें होतीं. त्याची बायको कल्याणी काळजीचा बोजा दूर झुगारून गोठ्यांत जाऊन स्वतः दूध पिळून आणीत होती. दूध तापवून मुलीला पाजायचें आणि गाईला गवत पाणी द्यायचें, हा नित्यक्रम आटोपून ती आली तेव्हां महेन्द्र म्हणाला, “ असं आतां किती दिवस चालवणार ? ”

कल्याणी म्हणाली, “ जितके दिवस चालेल तितके दिवस चालवायचा मी प्रयत्न करतें आहें. त्यानंतर मुलीला घेऊन तुम्ही शहरांत जा. ”

महेन्द्र म्हणाला, “ शहरांत जर जायचं होतं तर इतके दिवस तुला कां हे कष्ट करूं दिले असते ! आतां याचवेळीं सर्वांनीच कां जाऊं नये ! ”

उभयतांनीं बराच वेळ चर्चा केली. ती म्हणाली, "शहरांत गेल्यानं कांहीं विशेष होईल का? मुर्शिदाबाद, कासिमबझार किंवा कालिकात्याला गेलं तर कदाचित् जगतां येईल. आतां हा गांव सोडल्यावांचून गत्यंतर नाहीं."

महेन्द्रानें विचारलें, "पायीं प्रवास तुला झेपेल का? डोलीवाले सारे मरून गेले. बैल असले तर गाडी नाहीं आणि गाडी असेल तर बैल नाहीं."

"तुम्ही कांहीं काळजी करूं नका. मी पायीं चालत येईन." कल्याणी म्हणाली. तिनें आपल्या मनाशीं ठरवलें होते कीं पायीं चालायचें झेपलें नाहीं तर वाटेंत पडून मरेन. पण हीं दोघें तर जगतील!

दुसरे दिवशीं सकाळींच त्यानीं थोडाबहुत पैसा बरोबर घेतला. घरादाराला टाळें लावलें. गुरें, वासरें सोडून दिलीं. रस्ता धोक्याचा असल्यामुळें बंदूक दारूगोळा बरोबर घेतला आणि मुलीला कडेवर घेऊन तीं दोघे राजधानीच्या वाटेला लागलीं.

त्यानें बंदूक बरोबर घेतली असें पाहून कल्याणी म्हणाली, "आतां मलाही माझं हत्यार बरोबर घेतलं पाहिजे. क्षणभर या मुलीला संभाळा." असें म्हणून मुलीला महेंद्राच्या हातीं देऊन कल्याणी घरांत गेली.

एक विषाची कुपी आपल्या वस्त्रांत लपवून घेऊन कल्याणी आली. संकटाचे दिवस, केव्हां काय होईल याचा नेम नाहीं, असा विचार करून पूर्वींच तिनें ही कुपी आणून ठेवली होती.

ज्येष्ठाचा महिना. उन्हाचा तडाखा जबर होता. जमीन नुसती पेटत होती. वाऱ्याबरोबर आगीच्या झळा येत होत्या. कल्याणी घामाघूम झाली. केव्हां बाभळीच्या तर केव्हां खजुरीच्या झाडाखालीं ती बसत होती, पण तिथें सांवली कुठें होती! वाळलेल्या तलावांतलें चिखलपाणी फडक्यांत गाळून पिऊन तहान भागवीत ती कशीबशी चालायचा प्रयत्न करीत होती. महेंद्रानें मुलगी कडेवर घेतली होती.

वाटेंत एक घनदाट जंगल लागलें, त्याच्या छायेंत बसून दोघांनींही कांहीं वेळ विश्रांति घेतली. शेजारच्या डबक्यांतल्या पाण्यांत आपलें वस्त्र भिजवून आणून त्यानें कल्याणीच्या तोंडाकपाळावर आणि हातापायांवर सिंचन केलें.

कल्याणीला थोडासा थंडावा वाटला खरा, पण दोघांच्याही पोटांत भुकेचा डोंब उठला होता. त्यांनीं तो सहन केला, पण एवढेंसें मूल भूकतहान कशी आवरणार होतें ? पुन्हां दोघेंही वाट चालूं लागलीं. त्या आगीच्या ज्वाळांतून पायपीट करीत काळोख व्हायच्यापूर्वींच तीं एका धर्मशाळेंत आलीं. तिथें बायकोमुलीच्या तोंडीं थोडं थंड पाणी घालतां येईल आणि जीव जगवण्यासाठीं दोन घांस अन्न मिळेल अशी महेंद्राची अपेक्षा होती. पण कुठें होतें तें ? धर्मशाळेंत एक चिटपांखरूंसुद्धां नव्हतें. बाहेर येऊन त्यानें हांकाहांकी केली, पण कुणीच उत्तर दिलें नाहीं.

महेंद्र कल्याणीला म्हणाला, " जिवाचा घडा करून तूं इथं एकटीच रहा. गांवांत जर एकादी गाय दिसली, गोपालकृष्णाची कृपा झाली, तर मी दूध घेऊन येतों. "

तिथें मातीचीं मडकीं पडलीं होतीं, त्यांतलें एक मडकें घेऊन महेन्द्र तिथून बाहेर पडला.

## — २ —

महेन्द्र निघून गेला. त्या निर्जन जागीं, जवळ जवळ काळोख्या खोलींत कल्याणी आपल्या मुलीला घेऊन चोंहीकडे नजर फिरवीत होती. ती घाबरून गेली होती. तिथें कुणीच नव्हतें. माणसाचा शब्दसुद्धां ऐकूं येत नव्हता. आवाज ऐकूं येत होते ते कोल्ह्याकुत्र्यांचे. चारी बाजूचीं दारें बंद करून बसायचें असें तिनें ठरवलें, पण एकही दाराला कडीकोयंडे नव्हते. क्वचित् दारांना फळ्याही नव्हत्या.

चोंहीबाजूला नजर फेंकीत ती बसलेली असतांना समोरच्या दारांत छायेसारखें कांहीं दिसलें. मनुष्याकृति असावी पण मनुष्यच म्हणतां येत नव्हतें अतिशय सुकलेली, काळीकुट्ट, जीर्ण, अर्धीनागवी अशी भयानक मनुष्यासारखी आकृति दारांत उभी राहिलेली दिसत होती. त्या आकृतीनें थोड्या वेळानें आपला हात उचलला. तो हात म्हणजे नुसतें हाडावर कातडें होतें. सुकलेल्या लांबलचक हाताच्या तशाच लांबलांब बोटांनीं ती आकृति कुणाला तरी खुणावीत होती.

कल्याणीचा जीव डोळ्यांत आला. त्याचवेळीं तशीच एक सुकलेली, काळी, लांबटांगी, अर्धीनागवी छाया त्या पहिल्या छायेच्या शेजारीं येऊन उभी राहिली आणखी एक आली. त्यानंतर एक शब्दसुद्धां न काढतां त्या खोलींत शिरूं लागल्या. त्या साऱ्या भुतासारख्या मूर्ति कल्याणी आणि तिची मुलगी यांना घेरून उभ्या राहिल्या.

कल्याणीला मूर्च्छा येऊं लागली होती. त्या भुतासारख्या माणसांनी कल्याणी आणि तिची मुलगी यांना धरून ओढून खोलीबाहेर काढल आणि रस्ता पार होऊन त्यांनीं जंगलांत प्रवेश केला.

कांहीं वेळानें दुधाचें भांडें घेऊन महेंद्र तिथें आला. पहातों तर तिथें कुणीच नव्हतें. त्यानें इकडे तिकडे पुष्कळ शोधून पाहिलें. मुलीच्या नांवानें हांका मारल्या. कुठूनच उत्तर आलें नाहीं, कीं त्यांचा पत्ताही लागला नाहीं.

— ३ —

ज्या जंगलांत ते डाकू लोक कल्याणीला घेऊन आले होते तें अत्यंत सुंदर होतें. तेथें प्रकाश नव्हता. गांवांत खायला अन्न असो वा नसो, या जंगलांत फुलें होतीं. त्या फुलांच्या मधुर सुवासामुळें काळोखांत देखील प्रकाश पडत होता. हिरवळीनें सुशोभित दिसणाऱ्या त्या जमिनीवर त्यांनीं कल्याणी आणि तिच्या मुलीला आणून ठेवलें. ते त्यांना घेऊन बसले होते. आतां यांचें काय करायचें याबद्दल त्यांच्यांत चर्चा सुरू झाली. कल्याणीजवळचे दागिने त्यांनीं आधींच काढून घेतले होते. त्या दागिन्यांची वांटणी झाल्यावर एकजण म्हणाला, " तांदूळ द्या. तांदूळ द्या. हें सोनंरुपं नको आम्हाला. भुकेनं प्राण चालले आहेत. "

सारेच आरडाओरडा करूं लागले. त्यांचा म्होरक्या त्यांना गप्प करायचा प्रयत्न करीत होता. कुणीच त्याचें ऐकत नव्हता. शब्दाशब्दी, शिवीगाळ सुरू होऊन शेवटीं मारामारीला सुरवात झाली. म्होरक्यानें एका दोघांच्या अंगावर हात टाकला तेव्हां सारेच चवताळून त्याच्यावर तुटून पडले. उपासानें जर्जर झालेला तो म्होरक्या एक दोन फटके बसतांच जमिनीवर मरून पडला. तो

मेलेला पाहतांच एकजण म्हणाला, "भुकेनं प्राण जातो म्हणून आजवर कोल्ह्याकुत्र्याचं मांस खाल्लं—आतां आज याच वेट्याचं मांस खाऊं या."

त्यावेळीं सर्वांनीं एकच आरोळी ठोकली, "जय काली! बोम् काली! आज आम्हीं नरमांस खाणार!" असें म्हणून ते मोठमोठ्यानें हंसूं लागले. टाळ्या देऊन नाचूं लागले.

म्होरक्याचा मुडदा भाजण्यासाठीं त्यांतल्या एकानें विस्तव पेटवायला सुरवात केली. विस्तव तयार झाला. एकजण त्या मुडद्याचे पाय धरून आगींत फेकायला सरसावला, तोंच दूसरा एक म्हणाला, "अरे राहूं दे! राहूं दे! महामांस खाऊनच जर जीव जगवायचा तर या म्हाताऱ्याची सुकलेली चामडी कशाला खातां? आतां आणलेल्या त्या कोवळ्या पोरीला भाजून खाऊं या."

सर्वांच्या तोंडाला पाणी सुटलें. कल्याणी मुलीला घेऊन ज्या जागीं झोंपी गेली होती तिथें ते एकच गिल्ला करून आले. पहातात तों तिथें कुणीच नव्हतें. ते आपसांत भांडत असल्याची संधि साधून मुलीला कवटाळून ती जंगलांत पळून गेली होती.

हातची शिकार निसटली असें पाहून 'मारा मारा' असें ओरडत ती भुतावळ चाऱ्ही वाटांनीं धांवत सुटली. तसाच प्रसंग आला कीं माणूस हिंस्त्र पशु बनतो तो हा असा.

— ४ —

त्या जंगलाला काळोखानें ग्रासून टाकलें होतें. कल्याणीला रस्ता सांपडत नव्हता. कांट्याकुट्यांतून रस्ता काढतांना ती आणि तिची मुलगी रक्तबंबाळ झालीं होतीं. तशीच ती जंगलांत दूरदूर घुसत होती.

थोड्या वेळानें चंद्र उगवला. ती भुतावळ आरडाओरड करीत चोहों-बाजूनें तिला घेरायला येत होती. मुलगी घाबरून रडूं लागली. किंचाळ्या फोडूं लागली. कल्याणी आतां पूर्णपणें थकून गेली होती. पळण्याइतकें त्राण तिच्या पायांत राहिलें नव्हतें. एका भल्या मोठ्या झाडाखालच्या गवताळ जागेंत कांटे नाहींत असें पाहून तिनें तिथेंच बैठक मारली. मुलीला हृदयाशीं कवटाळून ती

करुणा भाकीत होती. भक्तिभाव उचंबळल्यामुळें जगाची जाणीव नाहींशी होऊन ती थकून पडलेली असतांना अंतरीक्षांत सुरू झालेलें स्वर्गीय गीत तिला ऐकूं येऊं लागलें:—

**हरे मुरारे मधुकैटभारे। गोपाल गोविंद मुकुंद शौरे।**

लहानपणीं पुराणांतली ऐकलेली गोष्ट तिला आठवली. देवर्षि नारद हातीं वीणा घेऊन हरिनामाचें गायन करीत आकाशांतून चोंहीकडे भ्रमण करीत असतात असें तिनें ऐकलें होते. आतां तीच गोष्ट तिला आठवली.

तो गायनाचा आवाज हळूहळू जवळ येऊं लागला—स्पष्ट येऊं लागला—अगदीं स्वच्छ ऐकूं येऊं लागला—

**हरे मुरारे मधुकैटभारे।**

कल्याणीनें डोळे उघडले. जंगलांतल्या त्या चांदण्यामुळें उजळलेल्या अर्धवट प्रकाशांत तिनें पाहिलें, तिच्यासमोर गौरवर्ण, शुभ्र केश, शुभ्र दाढीमिशी, शुभ्र वसन धारण केलेली मूर्ती उभी राहिली. कल्याणी हळुहळु भानावर आली. तिला वाटलें, या दिव्य पुरुषाला नमस्कार करावा, पण तें तिच्याकरवीं घडलें नाहीं. त्यांच्यासमोर मस्तक वांकण्यासाठीं ती सरसावली तोंच मूर्च्छा येऊन ती खालीं पडली.

या जंगलांत एका प्रशस्त भूमिखंडावर खडकांनीं वेढलेला असा एक मठ आहे. संशोधकांनीं हा मठ पाहिला असता तर तो पूर्वी बौद्धांचा विहार होता असें मत त्यांनीं दिलें असतें. त्यानंतर हा हिंदूचा मठ झाला.

ही इमारत दोन मजली होती. तिच्या मध्यभागीं बरीचशीं देवळें आणि त्यांच्यासमोर सभामंडप होता. या सर्वांच्या समोवार एक भली मोठी आणि उंच अशी भिंत होती आणि त्या भिंतीलाही झांकून टाकतील असे मोठमोठे गर्द छायेचे वृक्ष तिच्या सभोंवार असल्यामुळें अगदीं जवळ येणाऱ्या माणसालासुद्धां या मठाचा पत्ता लागला नसता.

ही इमारत बऱ्याच ठिकाणीं मोडतोड झालेली होती. त्या मोडतोडीची आतां दुरुस्ती केलेली असावी असें दिसून येत होतें. या दुर्भेद्य स्थानांत आतां मनुष्य-वस्ती झालेली असल्याच्या खुणा पटत होत्या. या मठाच्या एका खोलींत एक मोठी शेगडी पेटत होती. कल्याणी तिथेंच होती.

ती शुद्धीवर आली त्यावेळीं समोर तो शुभ्र वेषधारी महापुरुष उभा असल्याचें तिला दिसून आलें. चकित मुद्रेनें ती त्याच्याकडे पहात होती. अजून तिच्या मेंदूला चालना मिळाली नव्हती. महापुरुष म्हणाला, " मुली, ही देवाची भूमी आहे. कांहीं शंका मनांत आणूं नकोस. इथं हें दूध आहे तें थोडंसं पिऊन घे. मग जें काय बोलायचं तें मी बोलेन."

तें भाषण तिच्या मस्तकांत शिरतच नव्हतें. कांहीं वेळ ती वेड्यासारखी पहात राहिली होती. थोड्या वेळानें ती शुद्धीवर आली त्यावेळीं तिनें गळ्यांत पदर घेऊन त्यांना प्रणाम केला. महापुरुषानें तिला आशिर्वाद दिला.

आंतल्या एका खोलींतून एक मातीचें भांडें घेऊन जवळच्या शेगडीवर त्या महापुरुषानें दूध तापवलें आणि तें कल्याणीच्या हातीं देत म्हटलें, " मुली, तुझ्या मुलीला यांतलं थोडं दूध पाज. थोडं तूंही पी. मग आपण स्वस्थपणें बोलूं."

मोठ्या उल्हासानें कल्याणीनें मुलीला दूध भरवायला सुरवात केली. तो महापुरुष म्हणाला, " मी थोडा वेळ जाऊन येतों. तूं कांहीं काळजी करूं नकोस."

तो निघून गेला.

कांहीं वेळानें तो पुन्हां आला त्यावेळीं त्याला दिसून आलें, कीं कल्याणीनें मुलीला दूध पाजलें होतें, पण तिनें स्वतः दूधाला स्पर्शही केला नव्हता. दूध तसेंच पडून राहिलें होतें. त्यांतलें फारच थोडें संपलें होतें. तो महापुरुष म्हणाला, " तूं दूध घेतलं नाहींस मुली? मीं पुन्हां बाहेर जातोंय. तूं दूध घेतलं नाहींस तर मी फिरून परत येणार नाहीं." असें म्हणून तो ऋषितुल्य पुरुष बाहेर जायला निघाला होता त्याला कल्याणीनें पुन्हां नमस्कार केला आणि हात जोडून ती उभी राहिली. तो वनवासी म्हणाला, " तुझं काय म्हणणं आहे?"

कल्याणी म्हणाली, " मला दूध घ्यायचा आग्रह करूं नका. माझा कांहीं नेमधर्म आहे. मीं दूध पीणार नाहीं."

तो वनवासी तिला आर्जवून म्हणाला, " कसला नेमधर्म आहे? मला सांग ना. कांहीं खाल्लं नाहींस तर जीव कसा धरून ठेवतां येईल?"

कल्याणीचे डोळे भरून आले होते. ती म्हणाली, "आपण देवासारखे— आपल्याखेरीज कुणाला सांगू !—माझे पती अजूनपर्यंत उपासपोटीं आहेत. त्यांची भेट झाली नाहीं, त्यांचं भोजन झाल्याचं मला कळलं नाहीं तर मी अन्नग्रहण कसं करूं ! "

ब्रह्मचाऱ्यानें विचारलें, " तुझा पति कुठं आहे ? "

कल्याणी म्हणाली, " तेंच तर मला माहित नाहीं. मुलीसाठीं दूध आणायला ते बाहेर गेले होते, त्याचवेळीं त्या दरोडेखोरांनीं मला तिथून उचलून नेलं. "

एक एक प्रश्न विचारीत त्या ब्रह्मचाऱ्यानें तिच्याकडून सारी हकिकत ऐकून घेतली. कल्याणीनें नवऱ्याचें नांव सांगितलें नव्हतें. नवऱ्याचें नांव तिला घेतां येत नव्हतें, पण इकडले तिकडले प्रश्न केल्यावर ब्रह्मचाऱ्याला अंदाज आला. त्यानें विचारलें, " महेंद्राची तूं पत्नी का ? "

कल्याणीनें उत्तर दिलें नाहीं. खालीं मान घालून ज्या शेगडीवर दूध तापत होतें तींत तिनें लांकडाच्या ढलप्या टाकल्या.

ब्रह्मचारी म्हणाला, " तूं माझी आज्ञा पाळ. हें दूध पी. तुझ्या पतीची खबर काढून मी तुला कळवतों. तूं हें दूध घेतलं नाहींस तर मी इथून जाणार नाहीं. "

कल्याणीनें विचारलें, " इथं थोडं पाणी आहे का ? "

ब्रह्मचाऱ्यानें तिला पाण्याचें भांडें दाखवून दिलें. कल्याणीनें ओंजळ केली. ब्रह्मचाऱ्यानें त्या ओंजळींत पाणी ओतलें. कल्याणीनें ती पाणी भरलेली ओंजळ ब्रह्मचाऱ्याच्या पायाजवळ धरून म्हटलें, " आंत आपली पायधूळ द्या. "

ब्रह्मचाऱ्यानें त्या पाण्याला आपल्या आंगठ्याचा स्पर्श केला तेव्हां तें पाणी पिऊन ती म्हणाली, " मी हें अमृतपान केलंय. मीं आतां कांहीं खाणार नाहीं. पिणार नाहीं. माझ्या पतीची खबर कळल्याशिवाय मी अन्नग्रहण करणार नाहीं."

ब्रह्मचारी म्हणाला, " तूं निर्वेघपणें देवळांत रहा. मी तुझ्या पतीची खबर घेऊन येतों."

## — ६ —

रात्र उलटून गेली होती—माथ्यावर चंद्र आला होता.

त्या रस्त्याच्या बाजूला एक लहानशी टेंकडी होती. त्या टेंकडीच्या वर चढून जाऊन ब्रह्मचारी शिखरावर उभा राहिला आणि कानोसा घेऊं लागला. त्या टेकडीच्या एका बाजूला एक मोठें जंगल होतें. वर टेंकडी, खालीं राजरस्ता आणि मध्यें जंगल असलेल्या त्या जागीं कसला आवाज झाला कोण जाणे—ब्रह्मचारी त्या बाजूला वळला. त्या घनदाट जंगलांत त्यानें प्रवेश केला. झाडाच्या सांवलींत बरींच माणसें बसलेलीं होतीं. त्यांचीं शरीरें मजबूत होतीं. त्यांचा वर्ण काळा होता. त्यांच्या हातांत शस्त्रें होतीं. झाडांच्या फांद्यांच्या फटींतून जो प्रकाश येत होता त्यामुळें त्यांचीं तीं हत्यारें चकाकत होतीं.

असे दोनशें लोक तिथें बसले होते. ते एक शब्दसुद्धां बोलत नव्हते. ब्रह्मचारी त्यांच्या मध्यभागीं जाऊन उभा राहिला. त्यानें कसली तरी खूण केली. कुणीही वर उठला नाहीं, कुणीं बोलला नाहीं, कीं कुणी कसलीही हालचाल केली नाहीं.

तो सर्वांच्या समोरून जात होता. प्रत्येकाला पहात होता. त्या काळोखांत प्रत्येकाचा चेहरा न्याहाळीत होता. त्याला कुणीतरी माणूस पाहिजे होता आणि तो सांपडला नव्हता.

शोधतां शोधतां एका माणसाला ओळखून त्यानें खूण करून बोलावलें. ती खूण पाहतांच तो उठला. त्याला बरोबर घेऊन ब्रह्मचारी दूर जाऊन उभा राहिला. तो माणूस तरुण होता. भरगच्च दाढीमिशीनें त्याचा चेहरा झांकलेला होता. तो तालिमबाज असावा—मोठा देखणा होता तो पुरुष. त्याच्या अंगावर भगवीं वस्त्रें होतीं. सर्वांगावर चंदन माखलें होतें. ब्रह्मचाऱ्यानें त्याला विचारलें, "भवानंद, महेन्द्रसिंहावर तुझी नजर आहे का ?"

भवानंद म्हणाला, "आज सकाळींच बायको आणि मुलीला घेऊन महेन्द्रसिंह घर सोडून निघाला होता. धर्मशाळेंत—"

त्याला थांबवून ब्रह्मचारी म्हणाला, "धर्मशाळेंत काय झालं तें मला माहीत आहे. कोण होते ते ?"

भवानंद म्हणाला, "ते गांवचे शेतकरी असावेत. अलिकडे साऱ्या गांवातले सारे शेतकरी पोटाच्या आगीपायीं दरोडेखोर बनले आहेत."

ब्रह्मचारी म्हणाला, "चोरांच्या हातून महेन्द्राची बायको आणि मुलगी मी सोडवून आणली आहे. त्यांना आतां मठांत ठेवून आलों आहें. आतां महेन्द्राला शोधून काढून त्याची बायको आणि मुलगी त्याच्या स्वाधीन करण्याचा भार तुझ्यावर आहे. इथं जीवानंद असला तर तो इथलीं कामं उरकील."

भवानंदानें कबुली दिली. ब्रह्मचारी तिथून निघून गेला.

धर्मशाळेंत बसण्यांत कांहींच हरकत नाहीं असें वाटल्यामुळें महेंद्र तिथून उठला. गांवांत जावें आणि नगररक्षकांच्या मदतीनें बायको आणि मुलीचा शोध करावा असा विचार करून तो तिकडेच वळला होता. थोडेंसें पुढें जातांच वाटेंत बरेचसे शिपाई कांहीं बैलगाड्यांना वेढा घालून जात असलेले त्याला दिसले.

१७७० सालीं बंगाल इंग्रजांच्या अंमलाखालीं आला नव्हता. इंग्रज त्यावेळीं बंगालचे दिवाण होते. ते कर वसुली करीत होते खरे, पण बंगाली लोकांचें जीवित आणि संपत्ति रक्षण करायचा भार त्यांनीं अजून घेतला नव्हता. वसुली करायची जबाबदारी इंग्रजांवर होती आणि नगररक्षणाची जबाबदारी विश्वासघातकी, पापी, नराधम, मानव कुलकलंक मिरजाफरवर होती. मिरजाफर जिथें स्वतःचेंच रक्षण करायला असमर्थ होता तिथें बंगालचें रक्षण कशा प्रकारें करणार होता ? मिरजाफर अफीण खाऊन झोपून राही. इंग्रज पैसा वसुली करीत होते आणि 'डिस्पॅच' लिहीत होते. बंगाली रडत होते आणि स्वतःचा सत्यानाश करून घेत होते.

अतएव बंगालच्या करावर मालकी होती इंग्रजांची—पण राज्यकारभाराचा भार होता नबाबावर. इंग्रज जिथें जिथें कर वसुली करीत, तिथें तिथें एक कलेक्टर नेमीत. पैसा वसूल झाला, कीं तो कलकत्त्याला जात असे. लोक उपासपोटीं मेले तरी करवसुली थांबत नव्हती.

तरी पण ही वसुली मोठ्या प्रमाणांत होत नव्हती. कारण जिथें भूमाता कांहीं धान्यच देत नव्हती तिथें धन कुठून निर्माण होणार होतें ?

कांहीं का असेना, जी कांहीं वसुली होत असे, ती गाडींत घालून शिपायांच्या पहाऱ्यांत कालिकात्यांतल्या कंपनीसरकारच्या तिजोरींत नेऊन ठेवली जात असे. आजकाल चोरादरोडेखोरांची भीति फार वाढल्यामुळें पन्नास पन्नास सशस्त्र शिपायांच्या खड्या पहाऱ्यांत हा खजिना पाठवला जात होता. त्यांचा प्रमुख एक गोरा साहिब होता. तो घोड्यावर बसून सर्वांच्या मागें जात होता. उन्हाळा कडक असल्यामुळें हा प्रवास दिवसा न होतां रात्रीं होई. शिपाई असलेली खजिन्याची गाडी रस्त्यांतून येत असल्यामुळें महेंद्राचा रस्ता अडला. बैलगाडी घेऊन शिपाई लोक येत असल्यामुळें रस्ता अडल्याचें पाहून तो रस्त्याच्या बाजूला उभा राहिला. तरीही शिपाई त्याला धक्की मारून जात होते. वाद घालीत बसायचा हा प्रसंग नव्हे असें वाटल्यामुळें तो रस्त्याच्या बाजूच्या जंगलांत जाऊन उभा राहिला. त्याला पाहून एक शिपाई म्हणाला, " वह देखो, एकठो डाकू भागता है. "

महेंद्राच्या हातांत बंदूक असल्यामुळें इतरांना तें खरेंच वाटलें. त्यांनीं धांवत जाऊन महेंद्राचा गळा पकडला आणि ' साला चोर—' म्हणून त्याला एक ठोसा लगावून त्यांनीं त्याची बंदूक काढून घेतली. हात मोकळा होतांच महेंद्रानें त्यालाही उलट एक ठोसा लगावला. महेंद्राचा स्वभाव बराच संतापी होता. त्याचा तो जबरदस्त ठोसा बसल्यामुळें शिपाई मूर्च्छा येऊन जमिनीवर पडला.

त्यावेळीं तीन चार शिपायांनीं जोर करून महेंद्राला पकडलें आणि ते त्याला सेनापतीसाहेबांकडे घेऊन गेले. त्यांनीं साहेबाला सांगितलें, कीं या माणसानें एका शिपायाचा खून केला.

साहेब पाईप ओढत होता. दारूचा नशाही त्याला थोडा अधिकच चढला होता. तो म्हणाला, " सालेको पकड लेके शादी करो. "

बंदुकवाल्या डाकूला पकडून त्याचें लग्न कसें लावायचें तें शिपायांना कळेना. नशा उतरल्यावर साहेबाचें मत बदलेल असा विचार करून तिघाचौघां शिपायांनीं बैलांच्या दोऱ्या घेऊन महेंद्राचे हातपाय बांधले आणि त्याला गाडींत ठेवून दिलें. इतक्या लोकांशीं झगडा करण्यांत अर्थ नाहीं, जबरदस्ती

करून आपली मोकळीक होणार नाहीं असा पोक्त विचार करून महेंद्र स्वस्थ राहिला. बायको आणि मुलगी नाहींशीं झाल्यामुळें तो आधींच खचला होता. आतां तो जिवावर उदार झाला होता. शिपायांनीं महेंद्राला गाडीच्या चाकांना बांधलें. पुन्हां सारे शिपाई खजिना घेऊन पूर्वीच्या सारखेच ऐषआरामांत चालूं लागले.

— ७ —

ब्रह्मचाऱ्याची आज्ञा होतांच भवानंद हरिनामाचा जप करीत करीत महेंद्र ज्या धर्मशाळेंत उतरला होता तिकडे जायला निघाला. तिथेंच महेंद्राचा पत्ता लागेल अशी त्याची कल्पना होती.

वाटेंत त्याला शिपायांनीं अडकवलें. भवानंद तालपहाड इथून ज्या धर्मशाळेच्या दिशेनें चालला होता तीही दक्षिणोत्तरच होती. जातां जातां अर्थातच त्याची आणि शिपायांच्या टोळीची गांठ पडली. या रस्त्यानें जातांना दरोडेखोर आपल्यावर हल्ला करतील असें या शिपायांना साहजिकच वाटत होतें. वाटेंत एका दरोडेखोराला त्यांनीं गिरफदार केलें होतेंच. रात्रीच्या वेळीं अंग चुकवून जात आहे असें पाहिल्यामुळें अर्थातच त्यांना वाटलें, कीं हाही डाकूच असावा. शिपायांनीं त्याला एकदम पकडलें.

भवानंद उगीच थोडेंसें हंसून म्हणाला, " कां रे बाबांनो मला पकडतां ? "

शिपाई म्हणाला, " तुम साला डाकू हो. "

भवानंदानें विचारलें, " भगवे कपडेवाला ब्रह्मचारी मी. दिसतंय ना तुला ?—मी डाकू कसा असेन ? "

शिपाई म्हणाला, " बरेच साले ब्रह्मचारी संन्याशी डाकाइती करतात. "

त्या शिपायानें भवानंदाची गचांडी धरून त्याला ओढीत नेलें. त्या काळोखांत भवानंदाच्या डोळ्यांतून आगीच्या ठिणग्या उडत होत्या, पण अधिक कांहीं न बोलतां तो नम्रपणानें म्हणाला, " हुजूर, मला काय तो हुकूम करा. "

भवानंदाच्या विनयी भाषणानें खूष होऊन शिपाई म्हणाला, " घे साल्या, डोक्यावर ही एक मोट घे."

" अरे नको तो बोजासकट पळून जाईल ! एका साल्याला तिथं बांधून ठेवलाय या साल्यालाही तिथंच गाडीवर बांधून ठेवूं या. "

गाडीवर कुणाला बांधून ठेवलें आहे हें कळायची जिज्ञासा भवानंदाच्या ठायीं निर्माण झाली. त्यानें डोक्यावरचा बोजा फेंकून दिला आणि ज्या शिपायानें तो बोजा त्याच्या डोक्यावर चढवला होता त्याच्या गालावर एक सडकून थप्पड दिली. अर्थातच शिपायानें भवानंदाला दोरीनें बांधून गाडींत महेन्द्राच्या शेजारीं नेऊन ठेवलें. तो महेन्द्रसिंहच आहे हें भवानंदानें ओळखलें.

शिपाई आरडत ओरडत व्यवस्थितपणें गाडीबरोबर चालले होते. बैलगाडीच्या चाकांचा कचकच आवाज होत होता. महेन्द्राच्या कानाला लागून भवानंद हळूच म्हणाला, " महेन्द्रसिंह, मी तुला ओळखतों. तुलाच मदत मदत करायची म्हणून मी इकडे आलों होतों. सध्यां माझी ओळख द्यायची जरूरी नाहीं. मी जें कांहीं सांगतों तें मुकाट्यानं कर. बांधलेली दोरी गाडीच्या चाकावर धर. "

महेंद्र आश्चर्यचकित झाला. एक शब्दसुद्धां न बोलतां त्यानें भवानंदाच्या सांगण्याप्रमाणें केलें. काळोख असल्यामुळें कांहीं दिसत नव्हतें. तो गाडीच्या चाकाच्या बाजूला सरकला आणि त्यानें हाताला बांधलेल्या दोऱ्या चाकावर घांसल्या. चाकावर घांसल्यामुळें थोड्याच वेळांत दोऱ्या तुटल्या. त्यानंतर त्यानें पायाच्या दोऱ्याही तशाच सोडवल्या. अशा रीतीनें हातपाय मोकळे झाल्यावर तो भवानंदाच्या सांगण्याप्रमाणें गाडींत गुपचूप पडून राहिला. भवानंदानेंही त्याच प्रकारें आपल्या दोऱ्या सोडवून घेतल्या होत्या. दोघेही गुपचूप पडून राहिले होते.

जंगलाच्या बाजूला ज्या जागीं रस्त्यावर उभा राहून ब्रह्मचारी कांहीं वेळापूर्वीं चौंहीकडे नजर टाकीत होता, त्याच रस्त्यानें ते चालले होते. त्या टेकडीच्या शेजारीं शिपाई पोंचले त्यावेळीं टेकडीखालच्या एका उंचवट्यावर एक माणूस उभा असलेला त्यांना दिसला. चांदण्याच्या प्रकाशांत त्याची काळी सावली दिसतांच हवालदार म्हणाला, " अरे तो पहा, तो आणखी एक साला उभा आहे तिथं. त्याला पकडून आणा —त्याच्या डोक्यावर बोजे—"

एक शिपाई त्याला पकडायला गेला. शिपाई धरायला आला तरीही तो स्वस्थ उभा होता—हालला नाहीं. शिपायानें त्याला पकडलें, तरीही तो बोलला नाहीं. त्याला धरून हवालदारासमोर आणलें, तरीही तो बोलला नाहीं. हवालदार म्हणाला, 'त्याच्या माथ्यावर बोजा द्या.' शिपायानें त्याच्या माथ्यावर बोजा दिला आणि त्यानें तो घेतला. हवालदार मागें वळून गाडीबरोबर चालूं लागला. तितक्यांत पिस्तुलाचा आवाज झाला. डोक्याला गोळी लागून हवालदार जमिनीवर मरून पडला.

'त्या साल्यानं हवालदाराला मारलं.' असें म्हणून एका शिपायानें त्याचा हात धरला. त्या बोजेवाल्याच्या हातांत पिस्तुल होतें. माथ्यावरचा बोजा फेंकून देऊन त्यानें पिस्तुल उलटें करून शिपायाच्या कपाळावर हाणलें. शिपायाचें डोकें फुटलें. तो ओरडत पळाला.

याचवेळीं 'हरी! हरी! हरी!' असा जल्लोष करीत दोनशें हत्यारबंद लोक आले आणि त्यांनीं शिपायांना घेरलें. हल्ला झाला आहे असें कळतांच साहेबही धांवत आला आणि त्यानें गाडीपाशीं येऊन चतुष्कोण करायचा हुकूम दिला. साहेबाचा हुकूम होतांच त्यानीं बंदुका सरसावल्या. इतक्यांत कुणीतरी एकदम साहेबाच्या कमरेची तरवार काढून घेतली. लगेच एका फटक्यासरशीं त्याचा शिरच्छेद करण्यांत आला. साहेब घोड्यावरून मरून पडल्यामुळें 'फायर' करायचा हुकूम द्यायला कुणी राहिलें नाहीं. सारे पहात होते. एक-जण गाडीवर उभा राहून हातांत तरवार घेऊन 'हरी हरी' शब्दाचा जयघोष करीत 'मार शिपायांना, मार शिपायांना' असें म्हणत होता. तो भवानंद होता. सेनापती शिरच्छेद होऊन पडला, आतां आपल्याला कुणी नेता राहिलेला नाहीं असें पाहून शिपाई घाबरून गेले. त्यांना कांहीं सुचेना. त्या तेजस्वी हल्ले-खोरांनीं कित्येक शिपायांना मारलें, तर कित्येकांना जखमी केलें. गाडीजवळ येऊन त्यांनीं खजिन्याच्या पेट्या हस्तगत केल्या. उरले सुरले शिपाई पराभूत होऊन पळून गेले. उंचवट्यावर जी व्यक्ति उभी राहिली होती आणि शेवटीं या लढाईचें नेतृत्व जिनें ग्रहण केलें होतें, ती व्यक्ति भवानंदापाशीं आली. दोघांनीं एकमेकांना आलिंगन दिलें. भवानंद म्हणाला, "भाई जीवानंद, घेतलेल्या व्रताचं सार्थक केलंस."

जीवानंद म्हणाला, " भवानंद, तुझं नांव सार्थ होवो ! "

हस्तगत केलेला खजिना योग्य जागीं घेऊन जाण्याची तजवीज जीवानंदानें केली. आपले सर्व अनुयायी घेऊन तो तिथून निघून गेला. भवानंद एकटाच उभा राहिला होता.

— ८ —

गाडीखालीं उतरून महेन्द्र एका शिपायाचें हत्यार काढून घेऊन लढायला तयार होत होता, पण तितक्यांत त्याला दिसून आलें, कीं ते हल्लेखोर डाकू होते. तिजोरी लुटण्यासाठींच त्यांनीं शिपायावर हल्ला केला होता. पोक्त विचार करून त्या दंगलींत न मिसळतां तो बाजूला जाऊन उभा राहिला. दरोडेखोरांना मदत केल्याचा गुन्हा आपल्या हातून घडूं नये म्हणून तो बाजूला झाला होता. हातांतील तरवार फेंकून देऊन तो तिथून जायला निघत होता. भवानंद येऊन त्याच्यासमोर उभा राहिला. महेन्द्रानें त्याला विचारलें, " महाशय, आपण कोण ? "

भवानंद म्हणाला. " तुला त्याची काय जरूरी ? "

महेन्द्र म्हणाला, " मला तें कळायला हवं. तुमच्याच कृपेनं माझी आज सुटका झाली. "

भवानंद म्हणाला, " खरोखरच तुला तसं वाटल्याचा पुरावा कुठं दिसला नाहीं. हातांत हत्यार घेऊन तूं बाजूला उभा राहिला होतात. जमीदाराचा मुलगा—दह्यादुधाचा काळ—पण वेळ आली कीं पालेखाऊ माकड—"

भवानंदाच्या तोंडचें वाक्य पुरें होण्याच्या पूर्वींच महेन्द्र चिडून म्हणाला. " हा गुन्हा होता. दरोडेखोरी होती. "

भवानंद म्हणाला, " दरोडेखोरी असली, तरी तुझ्यासाठीं आमच्याकरवीं कांहींतरी सत्कार्य झालं होतं. अजूनही तुझ्या उपयोगी पडावं अशी आमची इच्छा आहे. "

महेन्द्र म्हणाला, " तुमचे उपकार झाले आहेत यांत शंकाच नाहीं, पण यापेक्षां अधिक काय करणार आहां तुम्हीं ? दरोडेखोरांच्या उपकारांत राहण्या-पेक्षां अपकार झाला तरी पत्करला. "

भवानंद म्हणाला, " जशी तुझी इच्छा ! पण खरोखरच तुला कांहीं वाटत असेल तर आमच्याबरोबर चल. तुझ्या बायकोची आणि मुलीची भेट करवून देतों. "

महेन्द्र मागें वळून उभा राहिला आणि म्हणाला, " म्हणजे काय ? "

त्याच्या प्रश्नाचें उत्तर न देतां भवानंद चालूं लागला. महेन्द्रही त्याच्या मागोमाग निघाला. त्याला प्रश्न पडला होता, हे कोणत्या जातीचे दरोडेखोर !

— ९ —

चांदण्यानें उजळलेल्या त्या रात्रीं ते दोघे पठार ओलांडून चालले होते. महेन्द्र कांहीं बोलत नव्हता. प्रियजनांच्या विरहानें तो खचला होता. तो अभिमानी असला तरी त्याचें कुतूहल जागें झालें होतें.

भवानंदाचें स्वरूप एकदम बदललें. भवानंद हंसत होता, बोलत होता, गोडगोड बोलत होता, संभाषणाला अतिशय उत्सुक झाला होता. त्यानें आपणाकडून बराच प्रयत्न केला. पण महेन्द्र तोंड उघडीना—तसा भवानंद निरुपाय होऊन आपल्याशींच गाऊं लागला—

**वंदे मातरम् , सुजलाम सुफलाम्**
**मलयजशीतलाम् शस्यश्यामलाम् मातरम्**

तें गाणें ऐकून महेंद्र चकित झाला. त्याला तें कांहीं कळलें नाहीं. सुजला सुफला मलयजशीतला अशी ही माता कोण ? त्यानें विचारलें, " अशी ही माता कोण ? "

उत्तर न देतां भवानंद मल्हार रागांत गाऊं लागला :—

**शुभ्रज्योत्स्नापुलकित यामिनीम्**
**फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम्**
**सुहासिनीम् सुमधुरभाषिणीम्**
**सुखदाम् वरदाम् मातरम्**

महेंद्र म्हणाला, " हा तर आपला देश—ही माता नव्हे. "

भवानंद म्हणाला, " आम्हीं दुसरी कुठलीच माता मानीत नाहीं—जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी । आम्ही म्हणतों, जन्मभूमि म्हणजेच जननी. आम्हाला आई नाहीं, बाप नाहीं, भाऊ नाहीं, मित्र नाहीं, स्त्री नाहीं, पुत्र नाहीं, घर नाहीं, गांव नाहीं. आमची आहे ती केवळ एक सुजला, सुफला, मलयज समीरण शीतला शस्यश्यामला,—

आतां महेंद्राला कळलें. तो म्हणाला, " आतां पुन्हां गा. "

भवानंद पुन्हां गाऊं लागला :—

वंदे मातरम् सुजलाम् सुफलाम्
मलयजशीतलाम् शस्यश्यामलाम् मातरम्
शुभ्रज्योत्स्ना पुलकित यामिनीम्
फुल्लकुसुमित द्रुमदल शोभिनीम्
सुहासिनीम् सुमधुरभषिणीम्
सुखदाम् वरदाम्, मातरम्
सप्तकोटिकंठ कलकलनिनाद कराले
द्विसप्तकोटि भुजैर्धृत खरकरवाले
अबला कॅनोमां ॲतो बॉले
बहुबल धारिणीम् नमामि तारिणीम्
रिपुदलवारिणीम् मातरम्
तुमि विद्या, तुमि धर्म
तुमि हृदि, तुमि मर्म
त्वम्‌हि प्राणा: शरीरे
बाहुते तुमि मा शक्ति
हृदये तुमि मा भक्ति
तोमारई प्रतिमा गडी
मंदिरे मंदिरे
त्वम्‌हि दुर्गा दशप्रहरणधारिणी
कमला कमलदलविहारिणी

वाणी विद्यादायिनि नमामि त्वां
नमामि कमलाम् अमलाम् अतुलाम्
सुजलाम् सुफलाम् मातरम्
वंदे मातरम्
शामलाम् सरलाम्
सुस्मिताम् भूषिताम्
धरणीम् भरणीम् मातरम्

गात असतांना त्या दरोडेखोराच्या डोळ्यांतून आसवें वहात होतीं, तें पाहून महेन्द्र आश्चर्यचकित झाला त्यानें विचारलें, " तुम्ही कोण ? "

भवानंद म्हणाला, " आम्ही संतान. "

महेन्द्रानें विचारलें, " कसले संतान ? कुणाचे संतान ? "

भवानंद म्हणाला, " मातेचे संतान. "

" ठीक. " महेन्द्र म्हणाला, " हे संतान चोरी दरोडेखोरी करूनच का मातेची पूजा करता ? कसली ही मातृभक्ति ?

" आम्ही चोरी दरोडेखोरी करीत नाहीं. "

" आत्तांच तर ही गाडी लुटलीत ! "

" ती काय चोरी दरोडेखोरी ? कुणाचा पैसा लुटला आम्हीं ? "

" कां बरं ? " महेन्द्र म्हणाला, " राजाचा पैसा लुटलात तुम्हीं. "

" राजाचा ?" भवानंदानें विचारलें, " त्याला हा पैसा वसूल करायचा काय अधिकार ? "

महेन्द्र म्हणाला, " राजाचा राजभाग. "

" जो राजा प्रजेचं पालन करीत नाहीं, तो राजा कसला ? " भवानंद म्हणाला.

महेन्द्र म्हणाला, " एके दिवशीं तुम्हीं लोक शिपायांकरवीं तोफेच्या तोंडी उडून जाल खास ! "

" खूप शिपाई बघितले ! " भवानंद म्हणाला, " आजसुद्धां पाहिले कीं !"

"तसे अस्सल शिपाई भेटले नाहींत अजून तुम्हांला." महेन्द्र म्हणाला, "एके दिवशीं पहाल!"

"पाहूंही कदाचित्!" भवानंद म्हणाला, "मरण एकदांच येतं. कुणी दोन वेळ मरत नाहीं."

महेंद्र म्हणाला, "पण कळून सवरून मरण ओढवून घेता कां!"

भवानंद म्हणाला, "महेंद्रसिंह, तूं माणसासारखा माणूस असशील असं मला वाटलं होतं, पण आतां मला कळून आलं, जसे हे सारे लोक तसाच तूं. नुसता दुधातुपाचा काळ. असं पहा, साप जमिनीवर पोट घाशीत चालतो. त्याच्यापेक्षां दुसरा कुणी क्षुद्र जंतु नाहीं. त्या सापाच्या अंगावर पाय पडला तर तो फणा उभारून उठतो. तुला कधीं कशानं चीडच येत नाहीं का? पहा, इतके देश आहेत—मगध आहे, मिथिला आहे, काशी, कांची, दिल्ली, काश्मिर देश आहेत,—अन्न मिळत नाहीं म्हणून या देशांतले लोक कुणी गवत खाताहेत का? कांटे खाताहेत का? माती खाताहेत का? झाडपालं अन् वेली खाताहेत का? कुठल्या देशांतलीं माणसं कोल्हेकुत्रे खातात? —मुडदे खातात? पेटींत पैसा ठेवतांना कुठल्या देशांतल्या माणसाला सुरक्षितपणा वाटत नाहीं? देव्हाऱ्यांत शाळिग्राम ठेवतांना कुणाला स्वास्थ्य वाटत नाहीं? घरांत आई–बहिणी असल्या तरी स्वास्थ्य नाहीं, आई बहिणींच्या उदरांत मूल वाढत असलं, तरीहि स्वास्थ्य नाहीं—पोट चिरून पोर बाहेर काढलं जातं. राजाचा धर्म म्हणजे देशाचं संरक्षण करणं. आमचा हा मुसलमान राजा कुणाचं संरक्षण करतोय? धर्म गेला, जात गेली, मान गेला, कूळ गेलं अन् आतां तर प्राण देखील जाऊं लागले आहेत. या नशाखोर जबरदस्तांना जर हांकलून काढलं नाहीं तर हिंदूचं हिंदुत्व राहणार कसं?"

"कसं हांकून काढायचं यांना?" महेंद्रानें विचारलें.

"मारून!"

"तुम्हीं एकटे का त्याला मारणार? एक थप्पड मारून का?"

संन्याशी गाऊं लागला :—

**सप्तकोटि कंठ कलकल निनाद कराले**
**द्विसप्तकोटि भुजैर्धृत खरकरवाले**
**अबला कँनोमा पॅतो बॉले**

" पण तुम्हीं तर एकटेच दिसतां ? " महेन्द्र म्हणाला.

" कां बरं ? आत्तांच तर तूं दोनशें लोक पाहिलेस, " भवानंद म्हणाला.

महेन्द्रानें विचारलें, " ते सारे संतानच का ? "

" सारेच संतान ! "

" आणखी असे किती आहेत ? " महेन्द्रानें विचारलें.

" असे हजारों हजार आहेत. " भवानंद म्हणाला, " आणखीही येतील. "

" समजा, दहावीस हजार आले,—मुसलमानांना राज्यभ्रष्ट करायला समर्थ होतील का ते ? "

" पलाशीच्या लढाईंत इंग्रजांची फौज किती होती ? "

" इंग्रज आणि बंगाली सारखेच का ? " महेन्द्रानें विचारलें.

" कां नव्हे ? " भवानंदानें विचारलें, " मनगटांत जोर पाहिजे. त्या जोरावरच सारं कांहीं होतं. मनगटांत जोर असला, कीं काळयागोऱ्याचा प्रश्न नाहीं. "

" तर मग इंग्रज आणि मुसलमान यांच्यांत एवढा फरक कां ? " महेन्द्रानें विचारलें.

भवानंद म्हणालां, " एक, इंग्रज प्राण गेला तरी पळून जात नाहीं, मुसलमानाला नुसता धक्का लागला तरी तो पळतो, सरबत शोधीत हिंडतो !—एक गोळी पाहून दोनशें माणसं पळतात का ? आणि मुसलमान तर एक गोळी पाहतांच हजारांनीं पळून जातात—पण हजार गोळ्या आल्या तरीसुद्धां एक इंग्रज पळून जात नाहीं ! "

" हे सारे गुण तुम्हां लोकांत आहेत ? " महेन्द्रानें विचारलें.

" नाहींत. " भवानंद म्हणाला, " आम्ही संन्यासी. आमचा हा संन्यास या अभ्यासासाठींच आहे. अभ्यास संपला, कार्यभाग झाला, कीं पुन्हां आम्हीं गृहस्थ होऊं. आम्हांलाही बायकामुलं आहेत. "

" तुम्हीं त्यांना टाकलं आहे का ? त्यांची माया तोडतां आली तुम्हांला ? "

" संतानाला खोटं बोलणं वर्ज्य आहे. " भवानंद म्हणाला, " तुझ्यासमोर मी खोटी बढाई मारणार नाहीं. आम्हीं मायापाश तोडलेले नाहींत. आम्ही व्रतपालन करतों आहों. तुला संतान व्हायचं आहे का ? "

महेन्द्र म्हणाला, " माझ्या बायकोमुलीची खबर मिळाल्याशिवाय मला कांहींसुद्धां सांगतां यायचं नाहीं. "

" चल तर मग. " भवानंद म्हणाला, " तुला तुझी बायको नि मुलगी भेटवतों. "

ते दोघेही चालूं लागले. भवानंद पुन्हां ' वंदे मातरम् ' गाऊं लागला.

## — १० —

रात्र उलटून दिशा फांकूं लागल्या होत्या. सूर्योदय होऊं लागला तसे पक्षी कुजबुजूं लागले. सारें आनंदमय झालें. त्या आनंदमय प्रभातकाळीं त्या आनंदमय अरण्यांत आनंदमठांत सत्यानंद ठाकूर हरिणाच्या कातड्यावर बसून संध्यापूजा करीत होते. जीवानंद त्यांच्याजवळ बसला होता. इतक्यांत भवानंद तिथें हजर झाला. ब्रह्मचारी एकही शब्द न बोलतां आपलें नित्यकर्म करीत राहिले होते. यावेळीं कुणालाही तोंडातून शब्द काढायला धीर होत नव्हता.

त्यांचीं संध्यादि कर्मे संपूर्ण होतांच भवानंद आणि जीवानंद यांनीं त्यांना प्रणाम केला. त्यांचीं पायधूळ घेऊन ते विनीतभावानें उभे राहिले.

भवानंदाला खूण करून त्याला बोलावून सत्यानंद बाहेर गेले. त्यांचें तिकडे कांहीं बोलणें झालें. त्यानंतर दोघेही पुन्हां मंदिरांत आले. मोठ्या वात्सल्यानें हंसत ब्रह्मचाऱ्यानें महेंद्राला विचारलें, " बाबारे, तुझं दुःख पाहून मलाही फार वाईट वाटलं. त्या दीनबंधूच्या कृपेनं काल तुझ्या बायकोला आणि मुलीला मी बचावून आणलं आहे—" असें म्हणून त्यांनीं कल्याणीला सोडवून आणल्याची सर्व हकिकत त्याला सांगितली आणि म्हटलें, " चल, आतां तुला त्यांच्याकडे घेऊन जातों. "

ब्रह्मचारी पुढें चालला होता. महेन्द्र त्याच्या मागोमाग जात होता. दोघेही देवालयांत प्रवेश करते झाले. आंत प्रवेश करतांच तें स्थान अत्यंत विस्तृत आणि फारच उंच असल्याचें त्याला दिसून आलें. तिथें आंत येतांच महेंद्राला नीटसें कांहीं दिसेना. पुन्हां पुन्हां डोळे ताणून त्यानें पहायचा प्रयत्न केला तेव्हां त्याला दिसून आलें, कीं एक अत्यंत भव्य अशी शंखचक्र गदापद्मधारी, वक्षस्तलावर कौस्तुभ असलेली चतुर्भुज मूर्ति तिथें होती. समोर असलेलें सुदर्शन-चक्र जणूं काय फिरतें आहे असा भास होत होता. समोरच मधुकैठभ दैत्यांच्या दोन प्रचंड मूर्ति रक्तबंबाळ झालेल्या चितारल्या होत्या. डाव्या बाजूला पाठीवर केंस सोडलेली शतदलांची माला गळ्यांत घातलेली लक्ष्मी भ्यायल्यासारखी समोर उभी होती. उजव्या बाजूला सरस्वती, पुस्तक, वाद्ययंत्रें, मूर्तिमान् रागरागिणी त्यांना घेरून उभ्या असल्याचें दाखवण्यांत आलें होतें. विष्णूच्या अंकावर एक मोहक मूर्ती होती. लक्ष्मी सरस्वतीपेक्षां ती अधिक सुंदर होती. लक्ष्मी—सरस्वतीपेक्षां ती अधिक वैभवशाली होती. गंधर्वकिन्नर यक्षराक्षस आणि देव तिची पूजा करीत होते. ब्रह्मचाऱ्यानें अत्यंत गंभीर अशा वाणीनें महेन्द्राला विचारलें.

“ हें सारं दिसतंय का तुला ? ”

महेन्द्र म्हणाला, “ दिसतंय. ”

“ विष्णूच्या मांडीवर कोण आहे—पाहिलंस ? ”

महेन्द्र म्हणाला, “ पाहिलं. कोण ही ? ”

ब्रह्मचारी उत्तरला, “ आई ! ”

“ आई कोण ?”

ब्रह्मचारी म्हणाला, “ जिचे आम्ही संतान, तीच ही. ”

“ पण ही कोण ? “ महेन्द्रानें विचारलें.

ब्रह्मचारी म्हणाला, “ योग्य वेळीं तें तुला कळेल. आतां म्हण—वंदेमातरम्—आतां चल. तुला पुढं दाखवतों. ”

ब्रह्मचारी महेन्द्राला घेऊन दुसऱ्या दालनांत गेला. त्या जागीं नखशिखान्त अलंकार परिधान केलेली जगद्धात्रीची सर्वांगपरिपूर्ण मूर्ति होती.

महेन्द्रानें विचारलें, “ ही कोण ? ”

२८४५० का.वा. १५३२ १-४-६१

ब्रह्मचारी म्हणाला " ही आई—भूतकालची. "

" म्हणजे काय ? "

" हत्ती आणि सिंहासारखे जंगली पशू पायाखालीं तुडवून त्यांच्या निवासस्थानांत हिनं आपलं पद्मासन स्थापन केलं होतं. नखशिखान्त अलंकारांनीं खचलेली अशी ही हास्यमुखी सुंदरी होती. प्रभातकालच्या सूर्यासारखा वर्ण असलेली ही सर्व प्रकारच्या ऐश्वर्याची स्वामिनी होती. हिला प्रणाम कर. "

महेन्द्रानें भक्तिभावानें त्या जगद्धात्रीरूपी मातृमूर्तीला प्रणाम केला. त्यानंतर ब्रह्मचाऱ्यानें त्याला एका काळोखी भुयारापाशीं नेऊन म्हटलें, " या वाटेनं ये. "

स्वत: ब्रह्मचारी पुढें निघाला होता. महेन्द्र भीतभीत त्याच्यामागें चालला होता. जमिनींतल्या या काळोखी भुयारांतून कुठूनतरी थोडा बहुत प्रकाश आलेला दिसत होता. त्या अंधुक प्रकाशांत त्यानें ती कालीमूर्ती पाहिली.

ब्रह्मचारी म्हणाला, " पहा ही आई—**वर्तमानकालची.** "

महेन्द्र घाबरून उद्गारला, " काली ! "

ब्रह्मचारी म्हणाला, " होय. काली ! काळोखाचीं वेष्टनं पांघरलेली, कलंकित झालेली, सर्वस्व घालवून बसलेली आणि म्हणूनच ही अशी नग्न झाली आहे. आज देशांत जिकडे तिकडे स्मशानं झालीं आहेत, म्हणूनच आईच्या गळ्यांत या नरमुंडाच्या माला. आपलाच शिव—आपलंच कल्याण–आपल्याच पायाखालीं तुडवते आहे. हाय ग आई ! "

ब्रह्मचाऱ्याच्या डोळ्यांतून आसवांचा पाझर लागला होता. महेन्द्रानें विचारलें, " तिच्या हातांत हीं शस्त्रं कां ? "

ब्रह्मचारी म्हणाला " आम्ही संतान. आम्हीं आईच्या हातीं नुकतींच हीं शस्त्रें दिलीं आहेत. म्हण, वंदे मातरम्. "

' वंदे मातरम् ' म्हणून महेन्द्रानें कालीला प्रणाम केला. ब्रह्मचारी म्हणाला, " आतां या वाटेनं ये. "

दुसऱ्या भुयारांत त्या दोघांनीं प्रवेश केला. एकदम त्यांच्या नजरेसमोर प्रभातकालच्या सूर्याचीं किरणें चमकलीं. चारी दिशांतून पक्ष्यांचा समुदाय गोड गोड गाऊं लागला.

संगमरवरी मंदिरांत दशभुजा सुवर्णमूर्ति त्या सूर्यप्रकाशांत झगझगत हांसत असलेली त्याला दिसली. तिला प्रणाम करून तो म्हणाला, "ही आई— **भविष्यकालची.** दहा हात दशदिशांना पसरलेले, नाना प्रकारचीं आयुधं आणि नाना प्रकारच्या शक्तीनं शोभायमान झालेली, पायाखालीं शत्रू चिरडून टाकलेली, जिच्या पायाशीं आश्रय घेऊन बसलेला सिंह शत्रूचं नरडं फोडायला तयार झालेला आहे, ती ही दिक्‌भुजा—" बोलतां बोलतां सत्यानंदाचा गळा भरून आला. डोळ्यांतून आंसवें गाळीत सद्गदित कंठानें तो म्हणाला, "दिक्‌भुजा नाना प्रहरणधारिणी शत्रुविमर्दिनी—वीरेन्द्र पृष्ठविहारिणी—दक्षिणे लक्ष्मी भाग्यरूपिणी—वामे वाणी—विद्याविज्ञानदायिनी—पहा, तिच्या जोडीला प्रत्यक्ष बलस्वरूप कार्तिकेय आहे. कार्यसिद्धीरूपी गणेश आहे. ये, आपण दोघे जोडीनं आईला प्रणाम करूं."

दोघेही हात जोडून वर पहात एक मुखानें धांवा करीत होते—

**सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।**
**शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणि नमोऽस्तुते ॥**

दोघांनींही भक्तिभावानें प्रणाम केला. ते उठून उभे राहिले तेव्हां महेंद्रानें भरल्या गळ्यानें विचारलें, "आईची ही मूर्ति केव्हां दिसेल आम्हाला ?"

ब्रह्मचारी म्हणाला, "ज्या दिवशीं आईचीं सारीं संतानं आईला 'आई' म्हणून हांक मारतील त्याच दिवशीं ती प्रसन्न होईल."

महेंद्रानें एकदम मधेंच विचारलें, "माझी बायको अन् मुलगी कुठं आहे ?"

ब्रह्मचारी म्हणाला, "तुला दाखवतोंच आतां."

महेंद्र म्हणाला, "एकदांच त्यांना भेटतों आणि भेटल्यानंतर निरोप देतों."

ब्रह्मचारी म्हणाला, "निरोप कां देणार आहेस ?"

महेंद्र म्हणाला, "मी या महामंत्राची दीक्षा घेणार आहें."

ब्रह्मचारी म्हणाला, "त्यांना कुठं पाठवणार आहेस ?"

थोडा वेळ विचार करून महेंद्र म्हणाला, "माझ्या घरीं कुणी नाहीं. दुसऱ्या कुठं पाठवायला जागा नाहीं. या सांथीच्या दिवसांत आधार तरी कुठं मिळणार ?"

ब्रह्मचाऱ्यानें उत्तर दिलें, "ज्या वाटेनं इथं आलास, त्याच वाटेनं मंदिराच्या बाहेर जा. मंदिराच्या दारावरच तुझी पत्नी आणि मुलगी तुला भेटेल. ह्या वेळपर्यंत कल्याणी उपाशीं आहे. ती ज्या जागीं आहे त्याच जागीं खाण्याचे पदार्थही तुला सांपडतील. त्यांना जेवायला घाल आणि इच्छेला येईल तसं कर. आतां आमच्यापैकीं कुणीही तुला भेटणार नाहीं. तुझ्या आजच्या विचारांत जर बदल झाला तर योग्य वेळीं मी तुला भेटेन."

एकदम ब्रह्मचारी निघून गेला. तो कोणत्या वाटेनं गेला. तें महेंद्राला कळलें सुद्धां नाहीं. त्यानें सांगितल्याप्रमाणें तो बाहेर गेला, तिथें मुलीला घेऊन बसलेली कल्याणी त्याला सभामंडपांत भेटली.

इकडे सत्यानंद दुसऱ्याच भुयारांतून तळघरांतल्या एका प्रशस्त दालनांत गेला. तिथें जीवानंद आणि भवानंद रुपयांच्या बिट्ट्या लावीत होते. त्या जागीं सोनें, रुपें, तांबे, हिरे, माणकें, मोतीं थरायरानें ठेवलेलीं होतीं. गेल्या रात्रींच्या लुटींतला पैसा आतां ते नीट रचून ठेवीत होते.

त्या जागीं येतांच सत्यानंद म्हणाला, "जीवानंद, महेंद्र येणार. तो आल्यानं संतानांचं बरंच काम होणार आहे. त्याची वडिलोपार्जित संपत्ति भरपूर आहे, ती आईच्या सेवेला लागेल. पण जोपर्यंत तो अंतःकरणपूर्वक मातृभक्त झाला नाहीं तोपर्यंत त्याला आपल्यांत घेऊं नका."

अनेक क्लेश सहन केल्यानंतर महेंद्र आज कल्याणीला भेटत होता. त्याला पाहातांच कल्याणीला रडें कोसळलें. महेंद्रही रडूं लागला. त्यांचें रडणें ओसरल्यावर एकमेकांचे डोळे पुसायची सुरवात झाली.

या जंगलांत साधारण मनुष्याचा प्रवेश होणें दुर्धर होतें. या जागीं जीं कांहीं फळेंमुळें मिळत होतीं तीं उपाशीं माणसें येऊन खाऊन जात. बाहेरच्या माणसाला इथलीं हीं फळेंमुळें मिळणें शक्य नव्हतें. अर्थात् ब्रह्मचाऱ्याच्या माणसानें हीं जंगलचीं फळें आणि थोडेंसें दूध आणून त्याजागीं ठेवलें होतें. संन्याशांच्या या संसारांत कांहीं गाई होत्या, त्यांचेंच हें दूध त्यांनीं आणून ठेवलें होतें.

कल्याणीच्या आग्रहामुळें महेंद्रानें अल्पोपहार केला. जें कांहीं थोडें शिल्लक राहिलें होतें तें एका बाजूला बसून कल्याणीनें खाऊन घेतलें. दुधांतलें थोडेंसें दूध मुलीला देऊन बाकीचें तिला नंतर देण्यासाठीं ठेवून घेतलें.

दोघेंही थकून गेलीं होतीं. थोडीशी झोंप काढल्यावर तीं पुढील बेत करण्यासाठीं चर्चा करूं लागली. आतां जायचें कुठें ?

कल्याणी म्हणाली, " घरावर संकट आलं म्हणून घर टाकून आपण इकडे आलों. पण घरापेक्षां घराबाहेरच संकटं जास्त आहेत हें आतां कळून आलं. मला वाटतं आतां आपण पुन्हां घरीं जाऊं."

महेंद्राला देखील तें पटत होतें. कल्याणीला नेऊन घरीं पोंचवावें, कुणीतरी माणसें तिच्या सोबतीला ठेवून आपण परत यावें आणि अत्यंत उदात्त अशा या पवित्र मातृसेवेची दीक्षा घ्यावी असें महेंद्राला वाटत होतें. त्या योजनेला कल्याणीनेंही कबुली दिली. आतां ताजेतवाने झाल्यामुळें मुलीला कडेवर घेऊन ती महेंद्राबरोबर पदचिन्ह गांवीं जायला निघाली.

त्या दुर्भेद्य जंगलांतून पदचिन्ह गांवाकडे जायचा रस्ता त्यांना उमगेना. त्या जंगलांतून बाहेर पडल्यावर तो रस्ता सांपडेल असें त्यांना वाटत होतें, पण त्या जंगलाच्या बाहेर जायचा रस्ताच मुळीं त्यांना सांपडेना. कितीतरी वेळ तीं त्या जंगलांत घिरट्या घालीत होतीं. फिरतां फिरतां पुन्हां तीं मठापाशींच येऊन पोंचलीं. जंगलाबाहेर पडण्याचा रस्ता त्यांना सांपडत नव्हता.

समोरच एक वैष्णवाच्या वेषांत असलेला अपरिचित ब्रह्मचारी उभा राहून हंसत होता, तें पाहून महेंद्राला राग आला आणि तो म्हणाला, " गोसावीजी, हंसतांहां कां ! "

गोसाव्यानें विचारलें, " तुम्हीं या जंगलांत आलांत कसे ? "

महेंद्र म्हणाला, " कसे कां असेना, पण आलों खरे. "

गोसावी म्हणाला, " आंत जर स्वतःच आलांत तर बाहेर जायचा रस्ता तुम्हांला कसा सांपडत नाहीं ! " असें म्हणून तो पुन्हां हसूं लागला.

महेन्द्र चिडला आणि म्हणाला, " तूं हंसतोयस—तुला तरी बाहेर जायचा रस्ता माहित आहे का ? "

गोसावी म्हणाला, " चला माझ्याबरोबर. मी तुम्हाला रस्ता दाखवतों. कुणातरी संन्यासीब्रह्मचाऱ्याबरोबर आलां असाल तुम्हीं—नाहीं तर इथं यायचा आणि इथून बाहेर जायचा रस्ता दुसऱ्या कुणालाही माहित नाहीं. "

तें ऐकून महेन्द्र म्हणाला, "तुम्हीं संतान का ?"

गोसावी म्हणाला, "हो. मीही संतानच. चला माझ्याबरोबर. तुम्हाला बाहेरचा रस्ता दाखवण्यासाठींच मी इथं उभा राहिलों होतों."

महेन्द्रानें विचारलें, "तुमचे नांव काय ?"

गोसावी म्हणाला, "माझं नांव धीरानंद गोस्वामी."

धीरानंद पुढें निघाला. महेन्द्र आणि कल्याणी त्याच्या मागोमाग चालूं लागलीं. अत्यंत दुर्गम अशा वाटेंतून त्यांना बाहेर काढून धीरानंद पुन्हां त्या जंगलांत प्रवेश करता झाला.

आनंदारण्यांतून बाहेर आल्यावर त्यांना समोरच एक पठार दिसलें. त्या पठारावर झाडें भरपूर होतीं. त्या पठाराच्या बाजूबाजूनें राजरस्ता होता.

कल्याणी एका वृक्षाच्या छायेला बसली आणि तिनें महेन्द्रालाही जवळ बसवून घेतलें. नवऱ्याच्या कडेवरून मुलीला काढून घेऊन तिनें मांडीवर घेतलें आणि त्याचा हात धरून ती कांहीं वेळ स्वस्थपणें बसून राहिली.

तो कांहीं बोलत नाहीं असें पाहून ती म्हणाली, "असे काळजींत पडल्यासारखे कां दिसतां ? आपण संकटांत सांपडलों होतों. त्यांतून मोकळे झालों. आतां काळजीचं कारण काय ?"

एक मोठा सुस्कारा सोडून महेन्द्र म्हणाला. "आतां माझ्यावर स्वतःचा अधिकार राह्यला नाहीं. काय करावं तेंच मला कळेनासं झालं आहे."

"काय झालंय ?"

"तुझी माझी ताटातूट झाल्यावर जें जें कांहीं घडलं तें तें मीं तुला सांगतों—" असें म्हणून त्यानें घडलेली सर्व हकीकत तिला विस्तारानें सांगितली.

कल्याणी म्हणाली, "मला देखील भारीच हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या, त्या तुम्हांला कशाला ऐकवूं ? मनःस्थिति अत्यंत बिघडलेली असतांही मला कशी झोंप लागत होती तें माझं मला कळत नव्हतं. काल रात्रीं मीं झोपीं गेलें होतें. झोपेंत मी एक स्वप्न पाहिलं. कुठल्या पुण्याईच्या बळानं कोण जाणे, मी एका अपूर्व अशा जागीं गेल्याचं दिसलं. तिथं जमिन नव्हती. नुसताच प्रकाश होतां—अति शांत आणि शीतल असा फार मधुर प्रकाश होता.

तिथं माणसं नव्हतीं. ज्या मूर्ति दिसत होत्या त्या प्रकाशमय होत्या. तिथं शब्द नव्हता. कुठल्यातरी मधुर वाद्याचा आवाज दुरून ऐकूं येत होता. सारं कांहीं फुलून निघालं होतं. लाखों मल्लिका, मालती, गंधराजाचा सुवास दरवळत होता. तिथं अत्यंत उंच अशा जागीं कुणीतरी बसलेला होता. जणूं काय तो मंद तेवत असलेला निळा पर्वत आगीनं माखल्यासारखा दिसत होता. ती आकृति अस्पष्ट होती. जळजळता किरीट तिच्या मस्तकावर होता, त्याला चार हात असावेत. मला नीटसं ओळखतां आलं नाहीं, पण त्याच्या दोन्ही बाजूला स्त्रीमूर्ति असाव्यात. त्या अत्यंत रूपवान् होत्या. तिकडे पाहतांना मी कासावीस झालें होतें. त्या सर्वांकडे पहायचा मला धीर होत नव्हता, त्यामुळं तीं सारीं कोण होतीं तें मला कळलं नाहीं. त्या चतुर्भुज मूर्ती-समोर उभी राहिलेली आणखी एक स्त्रीमूर्ती होती. ती देखील ज्योतिर्मयीच होती, पण तिच्या सभोंवार मेघ डंवरलेले असल्यामुळं तिचं तेज फुटून बाहेर पडत नव्हतं. अगदीं अस्पष्टपणें दिसत होतं तें असं, कीं ती अगदीं जर्जर झालेली होती. एक अत्यंत रूपवती दुर्भागी स्त्री तिथं रडत होती. त्या वहात असलेला सुवासिक वाऱ्याच्या झोताबरोबर मी त्या चतुर्भुज मूर्तीच्या सिंहासनाच्या पायतळीं येऊन पडलें. मेघांनीं वेढलेली ती जर्जर झालेली स्त्री माझ्याकडे बोट करून म्हणाली, ‘ हीच ती ! हिच्यामुळंच महेन्द्र माझ्या आश्रयाला यायला हटतो आहे. ’ तितक्यांत अत्यंत स्वच्छ आणि मधुर अशा बांसरीसारखा आवाज ऐकूं आला. ती चतुर्भुज मूर्ति जणूं काय मला उद्देशून म्हणाली, “ पतीचा त्याग करून तूं माझ्यापाशीं ये. ही तुम्हां सर्वांची आई—तुझा पति मग हिची सेवा करील. तूं त्याच्यापाशीं असलीस तर त्याच्या करवीं तिची सेवा होणार नाहीं. चल तूं, निघून ये.’ मी रडकुंडीला आलें आणि म्हणालें, ‘पतीला सोडून मी कशीं येऊं !’ तेव्हां त्या बासरीचा पुन्हा आवाज झाला, ‘ मीच पति, मींच माता, मींच पिता, मींच पुत्र, मींच कन्या. माझ्यापाशीं ये. ” मी त्यावेळीं काय उत्तर दिलें तें मला आठवत नाहीं. मी एकदम जागी झालें.–” एवढेंच बोलून कल्याणी स्तब्ध होऊन बसली.

महेंद्र आश्चर्यचकित झाला होता. भयभीत झाल्यामुळें सुन्न होऊन त्याच्या तोंडून शब्द निघत नव्हता.

तीं दोघेंही मुग्ध होऊन मुकाट्यानें बसलीं होतीं. बराच वेळ गेला तेव्हां कल्याणीनें विचारलें, "कसला विचार करताहांत ?"

महेंद्र म्हणाला, "पुढं काय करायचं त्याचा विचार करतोंय. स्वप्न म्हणजे नुसती फसवणूक. आपल्याच मनांत लहर उठते आणि आपोआप नाहींशी होते. जीवनाचं प्रतिबिंब असतं तें !—चल आपण घरीं जाऊं."

"देवतेनं तुम्हाला जिकडे जायला सांगितलं आहे तिकडेच जा." असें म्हणून कल्याणीनें मुलीला त्याच्या हातीं दिलें.

मुलीला जवळ घेऊन महेंद्रानें विचारलें, "आणि तूं—तूं कुठं जाणार आहेस ?"

दोन्ही डोळे झांकून दोन्ही हातांनीं मस्तक दाबून धरून कल्याणी म्हणाली, "देवतेनं जिथं जायला सांगितलं आहे तिथंच मी जाणार आहें."

महेंद्र दचकला आणि म्हणाला, "म्हणजे कुठं ? कशी जाणार आहेस तूं ?"

कल्याणीनें आपल्याजवळची विषाची कुपी त्याला दाखविली. महेंद्र आश्चर्यचकित होऊन म्हणाला, "काय तें ? विष ? विष घेणार आहेस का तूं ?"

"विष घ्यावं असं वाटलं होतं, पण—" असें म्हणून कल्याणी विचार करूं लागली. महेंद्र तिच्या तोंडाकडे टक लावून पहात होता. प्रत्येक क्षण त्याला युगासारखा वाटत होता. कल्याणीनें आपलें वाक्य पुरें केलें नाहीं असें पाहून महेंद्रानें विचारलें, "पण काय ? काय सांगत होतीस तूं ?"

कल्याणी म्हणाली, "विष घ्यावं असं माझ्या मनांत आलं होतं, पण तुम्हांला टाकून, या सुकुमारीला टाकून वैकुंठाला सुद्धां जावंसं मला वाटायचं नाहीं. मी जीव देणार नाहीं." असें बोलून कल्याणीनें विषाची कुपी खालीं ठेवून दिली.

झाल्या गेल्या गोष्टी आणि पुढल्या अपेक्षित घटनांबद्दल तीं दोघें चर्चा करीत बसलीं होतीं. बोलतां बोलतां त्यांचें दुर्लक्ष झालें. एवढ्या वेळांत बाजूला खेळत असलेल्या मुलीनें विषाची कुपी उचलून घेतली, तें दोघांच्याही नजरेला आलें नाहीं.

सुकुमारीला वाटलें, बरें मिळालें हें खेळणें ! डाव्या हातांत कुपी घेऊन तिनें ती उजव्या हातानें थोपटली. पुन्हां उजव्या हातांत घेऊन डाव्या हातानें

थोपटली. त्यानंतर ती दोन्हीं हातांत धरून ती उघडायचा प्रयत्न करूं लागली. चटकन् कुपीं उघडली गेली आणि वडी खालीं पडली.

महेंद्राच्या धोतराच्या एका कोपऱ्यावर ती गोळी पडली होती. सुकुमारीनें ती पाहिली. तिला वाटलें, "हेंहि एक खेळणें आहे. तिनें ती कुपी फेकून दिली आणि गोळी उचलून घेतली. तिनें कुपीं तोंडांत घालायचा प्रयत्न केला नव्हता, पण गोळी पाहतांच तिला ती संवेदना झाली. हातीं मिळालें कीं तोंडांत घालायचें हें मुलांचें धोरण—सुकुमारीनें गोळी तोंडांत घातली आणि त्याचवेळीं तिच्या आईची नजर तिकडे गेली.

"काय खाल्लं ! काय खाल्लं ! घात झाला !" असें म्हणून कल्याणीनें मुलीच्या तोंडांत बोट घातलें. रिकामी झालेली विषाची कुपी तितक्यांत दोघांनाही दिसली. हा आणखी कांहींतरी खेळच चालला आहे असें वाटून त्या मुलीनें आईच्या बोटाचा कडकडून चावा घेतला. बोटावर दांतांचे वण उठले. आईच्या तोंडाकडे पाहून ती हंसूं लागली.

तितक्यांत तोंडांतल्या वडीचा स्वाद कसासाच वाटल्यामुळें तिनें आपोआप दांत उघडले. कल्याणीनें तिच्या तोंडांतून वडी काढून बाहेर फेंकून दिली. मुलगी रडूं लागली. वडी तिथेंच जमिनीवर पडली होती.

कल्याणीनें नदीवर जाऊन साडीचा पदर पाण्यांत भिजवून आणला आणि तो मुलीच्या तोंडांत पिळला. घाबरीघुबरी होऊन तिनें महेन्द्राला विचारलें, "पोटांत थोडं विष तर गेलं नाहीं ना !"

आईबापांच्या मनांत चटकन् वाईट तेवढें येत असतें. जिथें प्रेम अधिक तिथें भीतीही तितकीच वाढतें. ती वडी केवढी मोठी होती तें महेन्द्रानें आधीं पाहिलें नव्हतें. त्यानें वडी हातांत घेऊन बराच वेळ निरखून पाहून म्हटलें, "बरीचशी गेलीय वाटतं पोटांत !"

अर्थात् कल्याणीलाही तें खरें वाटलें. ती वडी हातीं घेऊन बराच वेळपर्यंत ती निरखून पहात होती. मुलीनें एकदोन आंवढे गिळले होते त्यामुळें तीही बरीचशी अस्वस्थ झाली होती, तडफडूं लागली होती, रडूं लागली होती—शेवटीं ती निपचित पडली, तें पाहून कल्याणी नवऱ्याला म्हणाली, "आतां पहायचं काय ! देवानं हांक मारली त्याच वाटेनं सुकुमारी जायला निघालीय. मलाही

त्याच वाटेनं गेलं पाहिजे." असें म्हणून कल्याणीनें वडी तोंडांत टाकली आणि पाहतां पाहतां गिळून टाकली.

"काय केलंस ? कल्याणी, हें काय केलंस !" असें म्हणत महेन्द्र रडूं लागला.

त्याच्या प्रश्नाला तिनें उत्तर दिलें नाहीं. त्याची पायधूळ मस्तकाला लावून ती म्हणाली, "बोलण्यानं बोलणं वाढतं.—मी चाललें !"

"कल्याणी, हें काय केलंस ?" असें म्हणत हंबरडा फोडून तो रडूं लागला.

कल्याणी शांतपणें म्हणाली, "मी केलं तें योग्यच केलं. एका यःकश्चित् स्त्रीसाठीं तुम्ही देवाच्या कार्यापासून पारखे होत होतां. देवाची आज्ञा मी पाळली नाहीं, म्हणून माझी मुलगी गेली. मीं त्या आज्ञेची अशीच हेटाळणी केली असती तर तुम्हांलाही घालवून बसलें असतें."

महेंद्र रडत रडत म्हणाला, "तुला कुठं तरी ठेवून आलों असतों. आमचं काम पुरं झालं, कीं तुला पुन्हां आणून सुखानं राहिलों असतों. कल्याणी, तूं माझं सर्वस्व, कां हें असं केलंस ! ज्या हातीं मीं समशेर धरणार होतों, तो हातच असा कापलास ! तूं नसलीस तर माझी काय किंमत ?"

कल्याणी म्हणाली, "मला कुठं नेऊन ठेवणार होतां ? अशी जागा आहे कुठं ? मी मरत्येंय तेंच बरं. मला आशिर्वाद द्या—त्या प्रकाशमय लोकांत गेल्यावर तिथं तुमची पुन्हां भेट होईल, एवढाच आशिर्वाद द्या मला." असें म्हणून तिनें पुन्हां महेंद्राची पायधूळ घेतली.

महेंद्र यावर उत्तर देणार होता ? तो पुन्हां रडूं लागला असें पाहून कल्याणी म्हणाली, "असं पहा, देवाच्या मर्जीविरुद्ध कुणाला जातां येत नाहीं. मला देवानं बोलावणं धाडलं. मला वाटलं कीं मी इथं राहीन—आपण होऊन मी जर जीव दिला नसता तर कुणीतरी मला मारून टाकलं असतं. म्हणून जें आतां मी केलं तेंच ठीक झालंय. तुम्ही जें हें व्रत घेतलं आहे, तें जीव तोडून पुरं करा. तुम्हाला पुण्य लागेल अन् मलाही स्वर्ग लाभेल. पुढें दोघंही सुखानं स्वर्गांत राहूं."

इकडे त्या मुलीनें आधीं प्यायलेलें दूध ओकून टाकलें होतें. तिच्या पोटांत गेलेल्या विषाचा अंश फार थोडा होता, तो पुरेसा प्राणघातक नव्हता, पण

यावेळीं महेंद्राचें तिकडे लक्ष नव्हतें. त्यानें मुलीला कल्याणीजवळ दिलें आणि दोघेंही एकमेकांना कवटाळून सारखीं रडूं लागलीं.

त्याचवेळीं त्या अरण्यांतून मेघांच्या कडकडाटासारखा आवाज ऐकूं आला—

**हरे मुरारे मधुकैठभारे। गोपाल गोविंद मुकुन्द शौरे॥**

कल्याणीवर त्यावेळीं विषाचा अंमल चढला होता. हळूहळू शुद्धि जात चालली होती. त्या तंद्रींत तिनें तो गजर ऐकला. तिला वाटलें, स्वप्नांत ऐकलेला तो वैकुंठांतला अपूर्व बांसरीचा आवाज आपल्याला ऐकूं येत आहे— त्या मधुर आवाजानें ती तन्मय होऊन हांक मारूं लागली, ' हरे मुरारे मधुकैठ-भारे. ' ती महेंद्राला म्हणाली, " बोला हरे मुरारे मधुकैठभारे. "

त्या अरण्यांतून येणाऱ्या आवाजांत कल्याणीचा गोड आवाज मिसळून गेल्यामुळें त्या स्वरलहरींनीं मुग्ध होऊन महेन्द्र देवाला आळवण्यासाठीं काकुळतवाणीनें हांक फोडूं लागला, ' हरे मुरारे मधुकैठभारे ! '

कल्याणीचा आवाज आतां हळूहळू क्षीण होत आला होता, तरीही ती हांक मारीत होती, ' हरे मुरारे मधुकैठभारे, '

हळूहळू तिचा आवाज ओसरत चालला. तोंडावाटे शब्द बाहेर फुटेनासा झाला. डोळे मिटूं लागले. शरीर थंडावूं लागलें. ' हरे मुरारे ' अशी हांक फोडीत कल्याणी वैकुंठाच्या मार्गाला लागली आहे असें महेन्द्राला कळून चुकलें.

तेव्हां पागल होऊन तो मोठमोठ्यानें हांक फोडून ' हरे मुरारे ' चा घोष करूं लागला. त्याच्या त्या गर्जनेनें जंगलांतले पशुपक्षी देखील दचकून पळूं लागले होते.

तितक्यांत कुणीतरी येऊन त्याला कवटाळलें. त्याच्या आवाजांत आवाज मिसळून कुणीतरी गर्जना करीत होतें—' हरे मुरारे मधुकैठभारे. '

महेन्द्राला हृदयाशीं कवटाळून धरून सत्यानंद बसला होता.

## — ११ —

इकडे राजधानींत भयंकर गडबड उडाली होती. राज्यसरकारकडून कलिकात्याला जो खजिना जात होता तो संन्याशांनीं लुटून नेल्याची बातमी सर्वांना

कळली होती. राजाज्ञेनें संन्याशांना पकडण्यासाठीं बरकंदाज शिपाई चारी दिशांना धावूं लागले होते. जरूरी पडेल त्यावेळीं हे संतान, संन्यासी वेष धारण करीत, आणि कामाच्या वेळीं तो वेष टाकून देत. आज परिस्थिति भडकलेली पाहून बऱ्याच संन्याशांनीं आपला वेष टाकून दिला होता. राजाचे बुभुक्षित शिपाई, संन्यासी कुठें सांपडत नाहींत असें पाहून गृहस्थांचीं हंडी-मडकीं फोडून राजधानीकडे अर्धपोटीं परतत होते.

भगवीं वस्त्रें टाकून दिलीं नाहींत अशी एकच व्यक्ति होती—सत्यानंद.

त्या झुळझुळ वाहणाऱ्या छोट्याशा नदीच्या कांठीं रस्त्याच्या कडेला झाडांच्या छायेंत कल्याणी पडली होती. महेंद्र आणि सत्यानंद एकमेकांना कवटाळून आसवें भरलेल्या डोळ्यांनीं देवाचा धावा करीत होते, अशावेळीं नजरद्दी जमादार आपले शिपाई घेऊन तिथें येऊन पोंचला.

सत्यानंदाची मानगुटी पकडून तो ओरडला, 'हा पहा साला संन्यासी!'

तितक्यांत दुसऱ्या एकानें महेंद्रालाही पकडलें आणि म्हटलें, 'हाही दिस-तोय संन्याशाचा सोबती. हाही संन्यासीच असेल कदाचित.'

तिथल्या गवतावर आडव्या पडलेल्या कल्याणीला आणखी एकजण पकडा-यला जात होता. ती जिवंत नाहीं असें पाहून तो बाजूला सरला. त्याच घोरणानें त्यानें तिथें पडलेल्या त्या मुलीलाही पाहिलें नाहीं.

जास्त कांहीं न बोलतां त्या दोघांनाही धरून बांधून घेऊन ते शिपाई निघाले. कल्याणीचा मृतदेह आणि ती मुलगी तशींच तिथें झाडाखाली निरा-धार पडून राहिलीं.

शोकविव्हल झालेला महेंद्र ईश्वरप्रेमाच्या उद्रेकानें उन्मत्त होऊन पहिल्यानें सुन्न होऊन गेला होता. काय झालें आणि काय होत आहे, याची शुद्ध नसल्यामुळें ते शिपाई त्याला बांधूं लागले त्यावेळीं त्यानें प्रतिकार केला नाहीं. थोडी वाट चालून गेल्यावर आपल्याला बांधून नेताहेत याची त्याला जाणीव झाली. कल्याणीचा देह तिथेंच पडला होता, तिचा 'सत्कार' झाला नव्हता. मुलगीही पडून राहिली होती. कदाचित इतक्यांत ती जंगली जनावरांच्या भक्ष्यस्थानींही पडली असेल, ही कल्पना मनांत जागी झाल्याबरोबर महेन्द्रानें दोन्ही हातांना बांधलेल्या दोरीशीं झटापट करायला सुरवात केली. हाताला बांधलेली दोरी तुटल्या

बरोबर त्यानें एक लाथ मारून जमादाराला खालीं पाडलें. दुसऱ्या एका शिपायावर हल्ला करण्यासाठीं तो सरसावत होता तोंच दोघे शिपाई गिल्ला करून त्याच्या-वर आले. त्यांनीं त्याला नामोहरम करून पुन्हां बांधून टाकलें, त्यावेळीं काकुळत-वाणीनें तो सत्यानंदाला म्हणाला, ' तुम्ही थोडासा हातभार लावला असता तर या पांचही दुरात्म्यांचा खात्मा करतां आला असता. '

सत्यानंद म्हणाला, ' मी हा असा दुबळा म्हातारा—मीं ज्याला साद घालीत होतों, त्याच्याखेरीज दुसरी कुठलीच शक्ति माझ्या पाठीशीं नाहीं. जें कांहीं होतं आहे तें होऊं दे. त्यांना विरोध करूं नकोस. या पांच जणांना नामोहरम करण्याइतकी ताकद आपल्याठायीं नाहीं. मुकाट्यानं चल. ते आप-ल्याला कुठं नेताहेत तें तरी पाहूं. जगदीश्वर आपला पाठिराखा आहे. '

त्यांच्या तडाक्यांतून सुटून जायचा पुन्हा प्रयत्न न करतां ते दोघेही त्यांच्या मागोमाग चालूं लागले. थोडीशी वाट चालून गेल्यावर सत्यानंद शिपायांना म्हणाला, ' बाबांनो, आम्हीं हरिनामसंकीर्तन करीत असतों–त्याला तुमचा विरोध आहे का ? '

शिपायांना वाटलें, हा माणूस बरा दिसतो, उगीच गडबड करीत नाहीं. ते म्हणाले, ' चालूं दे तुझं भजन. आम्हीं नको म्हणत नाहीं. तूं म्हातारा आहेस, कदाचित तुला सोडून द्यायचाही हुकूम होईल–हा बदमाष मात्र फांसावर चढेल.'

ब्रह्मचारी गाऊं लागलाः—

> **धीर समीरे तटिनीतीरे ।**
> **वसति वने वरनारी ॥**
> **माकुरु धनुर्धर गमन विलंबन ।**
> **अति विधुरा सुकुमारी ॥**

शहरांत पोंचल्यावर त्यांना कोतवालासमोर उभें करण्यांत आलें. सरकारला वर्दी देऊन कोतवालानें ब्रह्मचारी आणि महेन्द्राला तात्पुरतें कोठडींत ठेवलें. ती कोठडी फार भयंकर होती. जो एकदां आंत जाई तो बहुधा बाहेर येत नसे, कारण त्याचा खटलाच कुणासमोर येत नसे. तो इंग्रजांचा ' जेल ' नव्हता—इथें इंग्रजांचीं न्यायालयें नव्हतीं. आज कायद्याचा काल आहे—तो काल होता

बेकायदा व्यवहाराचा. त्या कायदेशीर आणि बेकायदेशीर राहणीची तुलना कशी करायची ?

रात्र झाली होती. कोठडींत कोंडलेला सत्यानंद महेंद्राला म्हणाला, ' आज मोठा आनंदाचा दिवस आहे. पहा आपण आज तुरुंगांत पडलों आहों. बोल, हरे मुरारे !'

महेंद्र केविलवाणेपणानें म्हणाला, ' हरे मुरारे ! '

सत्यानंद म्हणाला, ' असा विवळतोस कां रे बाबा ? हें महाव्रत तूं घेतलं असतंस तर तुला बायकोमुलीला टाकावं लागलं असतंच कीं नाहीं ? मग त्यांचा तुझा कसला संबंध राहाणार होता ? '

महेंद्र म्हणाला, ' स्वेच्छेचा त्याग वेगळा आणि सक्ति वेगळी. ज्या शक्तीच्या जोरावर मी हें व्रत ग्रहण करणार होतों, ती शक्ति माझ्या बायकोमुलीबरोबरच निघून गेली आहे. '

' शक्ति येईल ! ' सत्यानंद म्हणाला, ' मी तुला शक्ति देईन. महामंत्राची दीक्षा घे—महाव्रत धारण कर. '

महेन्द्र त्रासून म्हणाला, ' कोल्ह्याकुत्र्यांनीं माझी बायको मुलगी खाऊन टाकली असेल. आतां कुठल्याही व्रताची गोष्ट माझ्याकडे काढूं नका. '

सत्यानंद म्हणाला, ' त्याची काळजी तुला नको. आमच्या संतानांनीं तुझ्या बायकोची उत्तरक्रिया केली आहे आणि मुलीला सुरक्षित जागीं नेली आहे. '

महेन्द्र चकित झाला. त्याला तें खरें वाटलें नाहीं. तो म्हणाला, ' तुम्हांला कसं कळलं हें ? तुम्ही तर सारखे माझ्याबरोबर आहां. '

सत्यानंद म्हणाला, ' आम्हीं महाव्रताचे दीक्षाधारी. देवदेवता आमच्या पाठीशीं आहेत. आज रात्रींच तुला त्यांची खबर कळेल. आज रात्रींच तूं या तुरुंगांतून मोकळा होशील. '

यावर महेन्द्र कांहीं बोलला नाहीं. आपलें भाषण महेन्द्राला खरें वाटलें नाहीं हें सत्यानंदाला कळून चुकलें. तेव्हां सत्यानंद म्हणाला, ' तुला खरं वाटत नसेल तर याची परीक्षा पहा. '

सत्यानंद उठून कोठडीच्या दारापाशीं गेला. त्यानें तेथें काय केलें तें काळोखामुळें महेन्द्राला दिसलें नाहीं, पण तो कुणाशीं तरी बोलला असावा असें त्याला वाटलें.

तो पुन्हां येऊन बसला त्यावेळीं महेन्द्रानें विचारलें, ' परीक्षा कसली ? '

' आत्तांच तूं या कोठडींतून मोकळा होऊन बाहेर पडशील. ' सत्यानंद म्हणाला. तो असें बोलत आहे तोंच कोठडीचा दरवाजा उघडला. एकजण आंत आला आणि म्हणाला, ' महेन्द्रसिंह कुणाचं नांव ? '

महेन्द्र म्हणाला, ' मींच तो. '

येणारा माणूस म्हणाला, ' तुला सोडून द्यायचा हुकूम झालाय. तूं खुशाल निघून जा. ' महेन्द्र पहिल्यानें चकित झाला–पण नंतर त्याला वाटलें कीं हें खोटें असावें. परीक्षा पाहण्यासाठीं तो कोठडीच्या बाहेर पडला. त्याला कुणीही अडवलें नाहीं. महेन्द्र राजरस्त्यापर्यंत निघून गेला.

एवढ्या वेळांत तो आलेला माणूस सत्यानंदाला म्हणाला, ' महाराज, तुम्हींसुद्धां कां जात नाहीं ? मी तुमच्यासाठींच आलों होतों. '

' कोण तूं ? ' सत्यानंदानें विचारलें, ' धीरानंद गोसावी का ? '

धीरानंदानें होकार दिला तेव्हां सत्यानंद म्हणाला, ' तूं पहारेवाला कसा बनलास ? '

' भवानंदानं मला इकडे पाठवलं. ' धीरानंद म्हणाला, ' मी शहरांत आलों तेव्हां आपल्याला या कोठडींत कोंडलं आहे असं मला कळलं. येतांना मी धोतरा घातलेली भांग आणली होती. इथं पहाऱ्यावर जे खाँसाहेब होते त्यांना मी ती दिली. त्यांनीं तीं खाऊन टाकतांच ते जमिनीवर आडवे पडले. मी अंगावर जे हे कपडे चढवले आहेत, ते त्यांचेच. '

' हे कपडे असेच ठेवून तूं गांवाबाहेर निघून जा. ' सत्यानंद म्हणाला, ' अशा प्रकारें मी इथून जाणार नाहीं. '

' कां ? ' धीरानंद म्हणाला, ' काय म्हणून ? '

' आज संतानांची कसोटी आहे. ' सत्यानंद म्हणाला.

तितक्यांत महेन्द्र परत आला. त्याला सत्यानंदानें विचारलें, ' परतसा आलास ? '

' खरोखरच आपण कुणी सिद्धपुरुष आहांत.' महेन्द्र म्हणाला, 'मीं तुम्हांला सोडून जाणार नाहीं. '

'तर मग रहा इथंच.' सत्यानंद म्हणाला, 'आज रात्रीं आपण दोघेही वेगळ्याच प्रकारें मोकळे होऊं.'

धीरानंद निघून गेला. सत्यानंद आणि महेन्द्र त्या अंधारकोठडींत बसून राहिले.

## – १३ –

ब्रह्मचाऱ्याचें तें गाणें पुष्कळांच्या कानीं गेलें होतें, त्यांतच तें जीवानंदानेंही ऐकलें. महेन्द्राच्या पाठीशीं राहण्याचा आदेश त्याला पूर्वीच देण्यांत आला होता. येत असतांना त्याला दिसून आलें, कीं प्रभूंना मुसलमान धरून नेत होते. प्रभू गात गात जात होते.

महाप्रभू सत्यानंदाचा तो संकेत त्याला चट्कन कळला—'धीर समीरे तटिनी तीरे वसति वने वरनारी.' नदी किनाऱ्याला एक कुठली तरी सटवी उपासपोटीं पडली होती का ?

तो नदीच्या कांठाकांठानें चालला होता. तिथें नदीच्या कांठीं झाडाखालीं एक बाई मरून पडली होती आणि तिची छोटीशी मुलगी जिवंत असल्याचें त्याला दिसून आलें. महेन्द्राच्या पत्नीला किंवा मुलीला जीवानंदानें यापूर्वी मुळींच पाहिलें नव्हतें. कदाचित ही महेन्द्राची बायको-मुलगीच असेल अशी शंका त्याच्या मनांत आली. कारण महेन्द्रही प्रभूंच्याबरोबरच गिरफदार झाला होता.

कांहीं का असेना–त्याला प्रश्न पडला, काय करावें ? आई मेली होती, मुलगी जिवंत होती, जिवंत असणाऱ्या जीवाचें आधीं संरक्षण केलें नसतें तर वाघ कोल्ह्यांनीं तिला खाऊन टाकलें असतें. भवानंद कुठेंतरी आजूबाजूला असावा तसा त्याचा अंदाज होता. तो या जागीं आला तर त्या बाईची उत्तर-क्रिया करील अशी कल्पना करून मुलीला कडेवर घेऊन तो चालूं लागला, तो एका घनदाट जंगलांतून वाट काढीत एका लहानशा गांवांत आला.

त्या गांवाचें नांव भैरवीपूर. लोक म्हणत, भरुईपूर. भरुईपूर गांवांत कित्येक सामान्य लोकांची वस्ती होती.

एका भल्यामोठ्या आंबराईत एक लहानसें घर होतें. त्या घराच्या भिंती मातीच्या होत्या आणि त्याच्या चार कोपऱ्यांना चार खोल्या होत्या. दारांत

एक गाय होती, शेळी होती, एक मोर होता, एक मैना होती आणि एक पोपटही होता. पण घरांत फारशीं माणसें नव्हतीं. मुलीला कडेवर घेऊन जीवानंद त्या घरांत गेला.

तो घरांत गेला त्यावेळीं तिथें कुणी नाहीं असें पाहून चरखा चालवीत बसला. चरख्याचा शब्द त्या मुलीनें कधीं ऐकला नव्हता. तिला आईकडून आणल्यापासून ती मधून मधून सारखी रडत होती. चरख्याचा शब्द ऐकतांच ती आवाज अधिकच चढवून रडत सुटली.

त्या मुलीच्या रडण्याचा आवाज ऐकून एक सतरा अठरा वर्षांची तरुणी बाहेर आली. बाहेर येतांक्षणींच आश्चर्यचकित होऊन खालीं वांकून पाहात ती म्हणाली, 'अरे, हें आहे काय! चरखासा चालवतोयस दादा! अन् ही मुलगी कुठं मिळवलीस? तुला मुलगी झालीय का रे दादा? पुन्हां केव्हां लग्न केलंस?'

जीवानंदानें मुलीला उचलून तिच्या हातीं दिलें आणि तिला एक चापटी मारून म्हटलें, 'वांदरी, मला कुठली ग झालीय मुलगी? मीं अगदीं नांवनसता आहें असं का वाटलं तुला?—घरांत दूध आहे!'

ती म्हणाली, 'दूध आहे तर! हवंय तुला?'

'हो. मला हवंय.' जीवानंद म्हणाला.

ती धांवत धांवत घरांत गेली आणि तिनें चुलीवर दूध ठेवलें. ती येईपर्यंत जीवानंद चरखा फिरवीत बसला होता.

त्या मुलीला तिनें कडेवर घेतल्याबरोबर ती रडायची थांबली होती. ती आपली आई आहे असें कदाचित तिला वाटलें असावें.

ती त्या मुलीला घेऊन चुलीजवळ बसली होती. त्या चुलीची आंच लागल्यामुळें मुलगी रडूं लागली. तें ऐकतांच जीवानंद ओरडून म्हणाला, 'ए निमी, ए काळतोंडे! माकडे! तुझं दूध तापलं कीं नाहीं अजून?'

'तापलं हं दूध.' असें म्हणून ती दगडी वाटींतून दूध घेऊन जीवानंदासमोर आली. जीवानंद रागाचें खोटें अवसान आणून म्हणाला, 'असं वाटतंय, कीं ही तापल्या दुधाची वाटी घ्यावी अन् तुझ्या अंगावर ओतावी!—काय वाटलं ग तुला? दूध मला हवं असं वाटलं?'

‘ मग कुणाला तर ? ’ निमीनें विचारलें.

‘ या मुलीला पाज तें दूध. ’ जीवानंद म्हणाला, ‘ दिसत नाहीं तुला ? ती भुकेपायीं रडतेय. ’

आसनमांडी घालून निमी बसली आणि त्या मुलीला मांडीवर घेऊन बोंडल्यानें दूध पाजूं लागली. चट्कन् तिच्या डोळ्यांतून दोन थेंब पाणी पडलें. तिला एक मुलगा होऊन गेला होता, त्याचेंच होतें तें बोंडलें.

मनगटानें डोळे पुसून तिनें हांसत हांसत जीवानंदाला विचारलें, ‘ काय रे दादा, ही कुणाची मुलगी ? ’

‘ तुला काय करायचंय ग त्याच्याशीं काळतोंडे ? ’ जीवानंद म्हणाला.

निमी म्हणाली, ‘ मला देतोस ही मुलगी ? ’

‘ मुलगी घेऊन काय करणार आहेत तूं ? ’ जीवानंदानें विचारलें.

निमी म्हणाली, ‘ मीं दूध पाजीन, कडेखांद्यावर खेळवीन, लहानाची मोठी करीन. ’ बोलतां बोलतां त्या बिचारीच्या डोळ्यांतून पुन्हां आसवें पाझरलीं–पुन्हां तिनें तीं मनगटानें पुसलीं आणि पुन्हां ती हंसूं लागली.

‘ ही मुलगी कशाला हवी तुला ? ’ जीवानंद म्हणाला, ‘ तुला होतील कीं खूपशीं पोरं. ’

“ होतील तेव्हां होतील. ’ निमी म्हणाली, ‘ पण आतां ही मुलगी मला दे. याउपर द्यायचीच नसली तर घेऊन जा तिला. ’ –

‘ बरं बरं, घे, ’ जीवानंद म्हणाला, ‘ घे ही मुलगी आणि मर एकदांची. मी मधून मधून येऊन तिला बघून जाईन. कायस्थाची मुलगी आहे बरं का ती. मी आतां जातों. ’

‘ हें रे काय दादा ? ’ निमी म्हणाली, ‘ जेवायचं नाहीं ! उशीर झालाय–माझी शपथ आहे तुला, दोन घांस खाऊन जा. ’

जीवानंद म्हणाला, ‘ बरं बरं. म्हणतेस तर खाऊन जातों दोन घांस ’

मुलीला कडेवर घेऊन ती वाढायच्या तयारीला लागली. निमीनें जागा सारवून घेऊन ताटपाट मांडले आणि वाढायला सुरवात केली. तिनें त्याच्या ताटांत मल्लिकेच्या कळ्यासारखा सुंदर तांदळाचा भात, कच्च्या वालांची उसळ, जंगली उंबराची कोशिंबीर, परसवांतल्या तळ्यांतल्या रुई माशाची आमटी वाढली आणि दुधाची वाटी ताटाशेजारीं ठेवली.

जेवायला बसल्यावर जीवानंद म्हणाले, ' इथं दुष्काळ आहे म्हणून कोण म्हणेल ग निमी ! तुझ्या गांवांत दुष्काळ आला नाहीं वाटतं ? '

' दुष्काळ आला नाहीं कसा, ' निमी म्हणाली ' दुष्काळ तर आहेच; पण या घरांत आम्हीं दोन माणसं. घरांत जें आहे तें चार लोकांच्या मुखीं घालतों अन् आम्हीही खातों. आमच्या गांवांत यंदा पाऊस चांगला झाला होता तें ध्यानांत नाहीं का तुझ्या ? तूंच म्हणाला होतास ना, कीं जंगल असलं कीं पाऊस पडतो म्हणून ? आमच्या गांवांत थोडंथोडं भात पिकलं होतं. बाकी-च्यांनीं नेऊन शहरांत विकलं, पण आम्हीं विकलं नाहीं. '

जीवानंदानें विचारलें, ' मेहुणेमहाराज कुठंयत ? '

निमी मान खालीं घालून हळूच म्हणाली, ' दोनतीन शेर तांदूळ घेऊन कुठं गेलेयत वाटतं ! कुणीतरी मागितले होते वाटतं ? '

बरेच दिवसांत जीवानंदाच्या नशिबीं असलें सुग्रास अन्न मिळायचा योग आला नव्हता. बोलण्यांत उगीच वेळ न घालवतां गपागप टपाटप तो भुरके मारमारीत जेवीत होता. पहातां पहातां त्यानें सारें ताट साफ करून टाकलें.

त्या दिवशीं श्रीमती निमाईमणीनें फक्त आपण आणि आपला नवरा यांच्या पुरताच सैंपाक केला होता. आपल्या वांट्याचें अन्न तिनें दादाला वाढलें होतें, पण त्याचें ताट साफ झाल्याचें पाहून नवऱ्यासाठीं ठेवलेली भात आमटी तिनें त्याच्या ताटांत ओतली. एवढासुद्धां विचार न करतां त्यानें तेही जिन्नस उदररूपी गिरिगव्हरांत झपाट्यासरशीं कोंबून टाकले. तेव्हां निमी म्हणाली, ' आणखीं कांहीं हवं का रे दादा ? '

जीवानंदानें विचारलें, ' आणखी कांहीं आहे ?

' एक पिकलेला फणस आहे. ' निमी म्हणाली.

निमीनें एक पिकलेला फणस आणून त्याच्यासमोर ठेवला. एक शब्दसुद्धां न बोलतां जीवानंद गोस्वामी यांनीं तो फणस देखील पहातां पहातां फस्त केला. तें पाहून निमी हंसली आणि म्हणाली, ' आतां कांहीं नाहीं बरं का दादा ! '

दादा म्हणाला, ' तर मग जा आतां. असाच केव्हांतरी येईन आणि तुझ्या सैंपाकाचा समाचार घेईन. '

जेवण उरकून तो बाहेर आल्यावर निमी आंचवण्यासाठीं त्याच्या हातावर पाणी घालीत होती. पाणी घालतांघालतां ती म्हणाली, ' माझं एक ऐकशील दादा ? '

त्यानें विचारलें, ' काय ? '

ती म्हणाली, ' माझी शपथ आहे तुला ! '

तो म्हणाला, ' काय तें बोल ना काळतोंडे. '

ती म्हणाली, ' माझं एक ऐकशील ? '

तो म्हणाला, ' काय तें आधीं सांग ना. '

ती म्हणाली, ' माझ्या गळ्याची शपथ आहे तुला—मीं तुझ्या पायां पडतें—'

जीवानंद म्हणाला, ' मीं तुझा गळाही मुरगळतों आणि तूं माझ्या पायावरही डोकं आपटून घे—पण काय तें बोलशील आधीं ? '

निमीनें त्यावेळीं एका हातावर दुसऱ्या हाताचा आंगठा टेकला, मान खालीं करून तो पाहून घेतला, एकदां जीवानंदाच्या तोंडाकडे पाहिलें आणि पुन्हां तिनें जमिनीकडे नजर फिरवली. शेवटीं मोठ्या आणीबाणीनें तोंड उघडून ती म्हणाली, ' एकदां वहिनीला बोलावूं का ? '

तिच्या हातचा आंचवायच्या पाण्याचा तांब्या काढून घेऊन तिच्यावर मारायचा आवेश आणीत तो म्हणाला, ' माझी मुलगी तूं मला परत दे. तुझे डाळ तांदूळ, मासे, फणस केव्हांतरी एक दिवशीं आणून परत देईन. अग माकडे, भद्रकपाळे, जें बोलूं नये तें बोलतेस माझ्यासमोर ! '

निमी म्हणाली, ' कबूल—मीं माकडी आहें ! भद्रकपाळी आहे ! चांडाळीण आहें !—आतां बोलावूं का वहिनीला ! '

' मीं चाललों ! ' असें म्हणून जीवानंद दणदण पाय आपटीत बाहेर जायला निघाला होता. निमी धांवत दाराशीं गेली आणि तिनें दार बंद करून घेतलें. दाराशीं पाठ लावून उभी राहून ती म्हणाली, ' आधीं माझा जीव घे आणि मग कुठं जायचं असेल तिकडे जा. वहिनीला भेटल्याशिवाय मीं तुला जाऊंच द्यायची नाहीं मुळीं. '

'मीं किती लोकांचे मुडदे पाडलेयत, तें माहित आहे तुला ?'

आतां निमी खरोखरच रागावली. ती म्हणाली, 'मोठे झेंडेच लावलेस कीं नाहीं! बायकोला टाकून द्यायची अन् माणसं मारायचीं! तुला मी भीतेंय होय! तूं ज्या बापाचा लेक, त्याच बापाची लेक मींही आहें. माणसं मारणं म्हणजे मोठी बढाईची गोष्ट असली, तर मला मार आणि मग सांग आपली बढाई.'

जीवानंद हंसला आणि म्हणाला, 'तर मग जा—कुठल्या कुणा चांडाळणीला बोलावून आणणार आहेस, तिला बोलाव. पण तुला सांगून ठेवतों, पुन्हां असं कांहीं बोललीस, तर तुला बोललों कीं न बोललों, तरी त्या साल्या माझ्या साल्याला आणून त्याची गुळगुळीत हजामत करीन आणि त्याच्या डोक्यावर ताक ओतून गाढवावर उलटा बसवून त्याची गांवांतून धिंड काढीन.'

निमी आपल्याशींच म्हणाली, 'बरं होईल तसं झालं तर!'

हंसत हंसत निमी जी बाहेर निघाली, ती जवळच एका पर्णकुटींत गेली. त्या झोपडींत सतरा ठिगळें लावलेली साडी नेसून एक भरडे केंस झालेली बाई चरखा फिरवीत बसली होती. निमी धांवतच तिच्यापाशीं आली आणि म्हणाली, 'चल लौकर! चल लौकर!"

तिची वहिनी म्हणाली, 'लौकर कां ग? जांवईबुवांनीं तुला बडवलं वाटतं? पाठीला तेल चोळायला बोलावतेयस होय?'

'जवळजवळ तसंच.' निमी म्हणाली, 'तेल आहे घरांत?'

ती तेलाचें भांडें घेऊन बाहेर आली. निमीनें घाईघाईनें ओंजळींत तेल घेऊन तिच्या भरड झालेल्या केंसांना चोळलें. घाईघाईनें तिनें तिच्या केंसांचा खोपा बांधला. त्यानंतर तिला हळूच एक ढुसणी मारून ती म्हणाली, 'तुझी ती ढाक्याची साडी कुठंय ग?'

तिनें आश्चर्यचकित होऊन विचारलें, 'तुला झालंय तरी काय? वेड का लागलंय तुला?'

निमीनें दुम् करून तिच्या पाठींत एक गुद्दा मारला आणि म्हटलें, 'आधीं साडी बाहेर काढ.'

हंसत हंसत तिनें ढाक्याची साडी बाहेर काढली. तें दृसूं पाहायला कोण होतें तिथें? ती म्हणाली, 'काय ग निमे, आतां काय करायचं?' तेव्हां निमीनें तिच्या नाजुक गळ्याभोंवती आपले दोन्ही गोंडस हात टाकले आणि म्हटलें, 'दादा आलाय. तुला बोलावलंय त्यानं.'

निमी म्हणाली, 'तूं आतां ही साडी नेसायची.'

ती म्हणाली 'कशाला साडी नेसायची?'

'मला बोलावलंय? मग ढाक्याची साडी कशाला? चल अशीच येतें.'

निमीनें तिच्या गालावर एक चापटी मारली. निमीच्या खांद्यावर हात ठेवून ती झोपडीच्या बाहेर निघाली. ती म्हणाली, 'चल, हें जुनेरं नेसूनच त्यांना भेटणार आहें मीं.'

साडी बदलायचें तिनें साफ नाकारलें. शेवटीं निमी कबूल झाली.

तिला बरोबर घेऊन निमी आपल्या घराच्या दारापर्यंत आली, तिनें तिला आंत लोटलें आणि दार बंद केलें. निमी दारापाशींच उभी राहिली होती.

## — १४ —

त्या स्त्रीचें वय सुमारें पंचवीस वर्षांचें होतें, पण ती निमीपेक्षां वयानें मोठी असेल असें वाटत नव्हतें. सतरा ठिगळें लावलेलें वस्त्र नेसून तिनें घरांत प्रवेश केला त्यासरशीं घर उजळल्यासारखें वाटलें. पानानें झांकलेल्या एकाद्या झाडावरच्या फुलाची कळी असावी आणि ती चटकन उचलावी असेंच त्यावेळीं वाटलें.

ती सुंदरी आंत येतांक्षणींच घरांत इकडे तिकडे शोधून पाहूं लागली, पण तिचा नवरा तिच्या दृष्टीला पडला नाहीं. दाराच्या अंगणांत एक लहानसें आंब्याचें झाड होतें, त्याच्या बुंधाला डोकें टेकून जीवानंद आसवें गाळीत बसला होता. ती हळूच त्याच्याजवळ गेली आणि तिनें त्याचा हात धरला. तिच्या डोळ्यांना पाणी आलें नव्हतें. एका ईश्वरालाच माहीत, कीं तिच्या डोळ्यांत जो झरा सांठवलेला होता तो जर बाहेर पडला असता, तर त्यांत जीवानंद वाहून गेला असता. तिनें डोळ्यांवाटे एक टिपूसही येऊं दिलें नाहीं.

जीवानंदाचा हात आपल्या हातीं धरून ती म्हणाली, ‘ छेः काय हें ! असे रडूं नका. माझ्यापायीं तुम्हांला रडूं कोसळतंय तें मला कळतं. माझ्यासाठीं दुःख करूं नका. तुम्हीं ज्या प्रकारें मला ठेवलंय, त्यांतच मला सौख्य आहे.’

जीवानंदानें वर पाहिलें आणि डोळे पुसून घेतल्यावर तिला विचारलें, ‘ शांती, तुझ्या अंगावर हें हजार ठिगळांचं जुनेरं कां ! अन्नवस्त्राची कांहीं तुला ददात नाहीं ! ’

शांती म्हणाली, ‘ तुमचा पैसा आहे तो तुमच्यासाठीं. मी पैसा घेऊन काय करूं ? जेव्हां तुम्हीं परत याल त्याचवेळीं पुन्हां माझा स्वीकार कराल—’

जीवानंद म्हणाला, ‘ स्वीकार करीन म्हणजे काय शांती ! मीं काय तुझा त्याग केलाय ? ’

‘ त्याग नव्हे,’ शांती म्हणाली, ‘ पण जेव्हां तुमच्या या व्रताची सांगता होईल तेव्हांच पुन्हां तुमचं प्रेम मला लाभेल—’ तिच्या तोंडचें वाक्य पुरें होण्यापूर्वीच जीवानंदानें शांतीला धरून कवटाळलें.

तिच्या खांद्यावर डोकें टेकून तो बराच वेळ स्वस्थ पडून होता. एक मोठा सुस्कारा सोडून तो शेवटीं म्हणाला, ‘ कां तुला भेटलों मी ? ’

‘ कां भेटलांत ? ’ शांती म्हणाली, ‘ कां असा व्रतभंग केलात ? ’

जीवानंद म्हणाला, ‘ होईना कां व्रतभंग—त्याला प्रायश्चित्त आहे. मला त्याची पर्वा नाहीं. पण एकदां तुला भेटल्यावर परत जाणं कठीण होतंय मला. तुला भेटायचं नाहीं असं निमीला म्हणत होतों तें एवढ्यासाठींच. तुला पाहिल्यावर परत जाणं अशक्य ! माझा देश म्हणजेच शांती !—देश घेऊन मी काय करूं ? देशांतली एक काठी जमीन मिळाली तर तुला घेऊन मी तिथं स्वर्ग उभारीन. हे सारे संतान पृथ्वी आपलीशी करतील कीं नाहीं, पण तूं माझी आहेस—माझ्या ताब्यांत आहेस—या पृथ्वीपेक्षांही तूं मोठी आहेस. तूंच माझा स्वर्ग आहेस. चल आपण घरीं जाऊं. मीं आतां तिकडे जाणार नाहीं. ’

शांती कांहीं वेळपर्यंत एक शब्दसुद्धां न बोलतां स्वस्थ बसली होती. तिच्यानें बोलवत नव्हतें. तरीही ती म्हणाली, ‘ छेःछेः काय हें ? तुम्ही वीर. तुमच्यामुळं मला वीरपत्नी म्हणवून घ्यायला मिळतंय हें माझं केवढं भाग्य ! एका क्षुल्लक स्त्रीसाठीं का वीरधर्माचा त्याग करणार ? नसेना कां तुमचं प्रेम !—मला

सुखाची पर्वा नाहीं—पण तुम्हीं आपला वीरधर्म केव्हांही सोडूं नका. आतां मला एकच गोष्ट सांगून जा,व्रतभंगाचं प्रायश्चित काय ? '

जीवानंद म्हणाला, ' प्रायश्चित्त—दान ! मरेपर्यंत उपास.'

शांती उगीच थोडीशी हंसली. ती म्हणाली, ' या प्रायश्चित्ताची, मला कल्पना होती. एका गुन्ह्यासाठीं जें प्रायश्चित्त, शंभर गुन्ह्यांनांही तेंच कां ! '

जीवानंद चकित झाला. विषण्ण होऊन त्यानें विचारलें, ' हें सारं कशाला विचारतेयस तूं ? '

' एक भिक्षा घाला मला.' शांती म्हणाली ' पुन्हां माझी भेट घेतल्या-शिवाय प्रायश्चित्त घ्यायचं नाहीं.'

तें ऐकून जीवानंद हंसला आणि म्हणाला, ' या बाबतींत तूं निश्चिंत रहा. तुला भेटल्याशिवाय मीं जीव देणार नाहीं. मीं आतां जातों, पण माझं एक सांगणं आहे, हा वेष टाकून दे आणि माझ्या वाडवडिलांच्या घरांत जाऊन सुखानं रहा.'

शांतीनें विचारलें, ' इथून तुम्ही कुठं जाणार ? '

जीवानंद म्हणाला, ' इथून मला मठांत ब्रह्मचाऱ्यांच्या व्यवस्थेसाठीं गेलं पाहिजे. ज्या प्रकारें त्यांना शहरांत नेण्यांत आलं आहे तें पाहून मला काळजी लागली आहे. मंदिरांत त्यांचा पत्ता लागला नाहीं, तर मला शहरांत जावं लागेल. '

## — १५ —

मठांत बसून भवानंद हरिगुणगायन करीत होता, त्यावेळीं विषण्ण मुद्रेनें ज्ञानानंद नांवाचा एक तेजस्वी संतान त्याच्यासमोर उभा राहिला. भवानंदानें विचारलें, ' तुझा चेहेरा असा उतरलेला कां ? '

ज्ञानानंद म्हणाला, ' कांहींतरी भयंकर भानगड झालीय. कालच्या प्रकारामुळं शिपाई लोक भगव्या कपड्याचा माणूस दिसला कीं त्याला पकडून नेताहेत. आज साऱ्या संतानांनीं भगवे कपडे उतरून ठेवले आहेत. फक्त सत्यानंदप्रभु मात्र भगवीं वस्त्रं घालून राहिले आहेत, आणि ते शहराकडे गेले आहेत. ते मुसलमानांच्या हातीं कदाचित सांपडतील अशी भीति वाटतेय मला. '

'त्यांना अटकावून धरील असा मुसलमान या बंगाल्यांत नाहीं!' भवानंद म्हणाला, 'धीरानंद त्यांच्यामागोमाग गेला आहे तें मला माहीत आहे. तरीपण मीं शहरांत एकदां फेरी मारून येतों. तूं मठाचें रक्षण कर.'

भवानंद तिथून उठला तो एका गुप्त खोलींत गेला. एक मोठी पेटी उघडून त्यानें कांहीं कपडे बाहेर काढले. भगवे कपडे टाकून त्यानें वेषांतर केलें. भरपूर दाढीमिशी असल्यामुळें त्याला पाहिल्याबरोबर तो मोगल जातीचा एकादा देखणा जवान असल्याचा भास होत होता.

अशाप्रकारें मोंगलाचा वेष घेऊन सशस्त्र होऊन तो बाहेर निघाला. तिथून सुमारें एक कोसावर दोन ठेंगणेसे डोंगर होते. त्या डोंगरावर घनदाट जंगल होतें. त्या दोन डोंगरामधें एका गुप्त स्थानांत घोड्यांच्या पागा होत्या. त्यांतला एक घोडा सोडून घेऊन भवानंद त्याच्यावर स्वार झाला आणि शहराच्या बाजूकडे दौडत निघाला.

जातां जातां वाटेंत त्याला थांबावें लागलें. रस्त्याच्या कडेला नदीतीरी आकाशांतून निखळून पडलेल्या चांदणीसारखी एक स्त्री जमिनीवर पडलेली त्याला दिसली. त्यानें तपासून पाहिलें. जिवंतपणाचें लक्षण तिच्या ठायीं दिसत नव्हतें. विषाची रिकामी कुपी तिच्या शेजारीं पडली होती. भवानंद अचंबित झाला—घाबरून थोडा अस्वस्थ झाला. जीवानंदाप्रमाणेंच भवानंदानेंही महेन्द्राच्या बायकोला आणि मुलीला पाहिलें नव्हतें. विषाची रिकामी कुपी बाजूला दिसल्यामुळें ती बाई विष खाऊन मेली असावी असें त्याला वाटलें.

भवानंद त्या मृतदेहाशेजारी बसला. तिच्या कपाळावर हात ठेवून कांहीं वेळ तो विचार करीत होता. तिचें मस्तक, बगल, हातपाय त्यानें नीट तपासून पाहिले. सर्वसाधारण माणसाला जो अंदाज आला नसता तो त्यानें आपल्या पद्धतीनें पाहून घेऊन निदान ठरवलें. त्याला वाटलें, अजूनही वेळ गेली नाहीं. अजूनही हिला वांचवतां येईल.

बराच वेळ भवानंद विचार करीत होता. मनाचा निश्चय ठरवून तो जंगलांत गेला आणि कसला तरी वनस्पतीचा पाला घेऊन आला. हातावर चुरडून त्यानें त्या पानांचा रस काढला आणि तिची दांतखिळी उघडून तो तिच्या तोंडांत घातला. त्यानें तिच्या नाकांतही तो रस पिळला, आणि अंगालाही त्यानें त्या रसाचें मर्दन केलें.

हळूहळू श्वास वाढूं लागला. त्यानें नाडी तपासून पाहिली, तीही चालू झाली होती. थोड्या वेळानें प्रभातकालीं फुलणाऱ्या कमळासारखे कल्याणीचे डोळे हळूहळू उघडूं लागले. तें पाहून भवानंदानें तिला घोड्यावर घेतलें आणि दौड करीत तो शहराकडे निघाला.

## — १६ —

सत्यानंद ब्रह्मचारी आणि महेंद्र या दोघांनाही पकडून शहरांत तुरुंगांत नेऊन ठेवल्याची बातमी संध्याकाळ व्हायच्यापूर्वीच संतान संप्रदायांत फैलावली. ती ऐकतांच एक एक, दोन दोन, दहा दहा, शेकड्यांनीं संतानसंप्रदायांतील लोक येऊन त्यांनीं देवालय वेढलें आणि सारें जंगल भरून टाकलें. सारेच सशस्त्र होते. त्यांचे डोळे संतापानें धगधगत होते. अभिमानपूर्वक ते प्रतिज्ञा उच्चारून दाखवीत होते. पहिल्यानें शंभर आले, नंतर हजार झाले, नंतर दोन हजार झाले. ती लोकसंख्या अशा रीतीनें सारखी वाढूं लागली होती.

मठाच्या दारांत हातीं तरवार घेऊन ज्ञानानंद खड्या आवाजांत बोलत होता. ' आज कित्येक दिवस आमची इच्छा होती, कीं या बड्या लोकांची घरं कोसळून घालावीं आणि या यमपुरीचा विध्वंस करून ती नदीच्या पाण्यांत फेंकून द्यावीं. भाई हो, आज तो दिवस आला आहे. आमचे अनंतज्ञानमय, सर्वदा शुद्धाचारी, लोकहितैषी आणि देशहितैषी असे गुरूंचे गुरू, परमगुरू— सनातन धर्माचा पुनरुद्धार करण्यासाठीं देह सांडायची ज्यांनीं प्रतिज्ञा केली आहे, ज्यांना आपण विष्णूचे अवतार म्हणून मानतों, आमच्या देशाच्या उद्धाराचे जे एकच आधार, ते आज मुसलमानांच्या तुरुंगांत कैदी होऊन पडले आहेत. चला ! आम्हीं त्या यवनपुरीचा धुव्वा उडवूं या. त्या डुकरांच्या खुराड्याला आगींत भाजून काढून नदीच्या पाण्यांत फेंकून देऊं या. बोला—हरे मुरारे मधुकैटभारे !—'

त्या जंगलांत हजारों हजार कंठांतून दशदिशा दणाणून टाकणारा आवाज उठला;—' हरे मुरारे मधुकैटभारे. ' हजारों समशेरींचा झणत्कार एकाच वेळीं ऐकूं आला. हजारों भाल्यांचे फाळ झगझगूं लागले. हजारों बाहूंच्या संघर्षानें वज्रनिनाद होऊं लागला. लढवय्यांच्या पाठीवरच्या हजारों ढालींचा

कड्कड् असा कर्कश शब्द ऐकूं येऊं लागला. त्या भयंकर कल्लोळानें जंगली जनावरें घाबरून पळून जाऊं लागलीं. आकाशांतले पक्षी कलकलाट करीत चौफेर उडून जाऊं लागले. हजारों डंक्यांच्या दणदणाटानें सारें जंगल दणाणून गेलें.

'हरे मुरारे मधुकैटभारे' म्हणत जयघोष करीत तें संतानांचें सैन्य श्रेणीबद्ध होऊन बाहेर निघालें. धीरगंभीर पदविक्षेप करीत आणि तोंडानें खड्या आवाजांत हरिनामाचा घोष करीत त्या अंधारांतून ते शहराकडे चालले.

अकस्मात हा हल्ला आल्याचें पाहून गांवचे लोक कुठें पळून गेले तें कळलें सुद्धां नाहीं. नगररक्षक हतबुद्ध होऊन स्वस्थ बसून राहिला.

संतानांनीं पहिला मोर्चा लावला तो सरकारी तुरुंगावर. तुरुंग फोडून तोडून तिथल्या पाहरेकऱ्यांना त्यांनीं कंठस्नान घातलें. सत्यानंद आणि महेन्द्राला मस्तकावर उचलून घेऊन ते नाचूं लागले. हरिनामाच्या जयघोषाची त्यावेळीं पराकाष्ठा झाली होती.

सत्यानंद आणि महेन्द्र यांना सोडवल्याबरोबर त्यांनीं मुसलमानाचें घर दिसलें कीं त्याला आग लावायला सुरवात केली, त्यावेळीं सत्यानंद म्हणाले, 'चला आतां परत जाऊं. निरर्थक अनिष्टसाधन करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.'

संतानांच्या या दंग्याची बातमी देशाच्या अधिकारीवर्गांच्या कानीं गेली त्यावेळीं त्यांचा पाडाव करण्यासाठीं त्यांनीं एक परगणा—शिपायांची तुकडी पाठवली. त्यांच्यापाशीं बंदुका तर होत्याच, पण एक तोफही होती.

हा हल्ला आलेला कळतांच आनंदकाननांतून बाहेर येऊन संतानांच्या सेनेनें लढाईला तोंड दिलें. पण बंदुका आणि तोफा यांच्यासमोर भाले, लाठ्यांचें सामर्थ्य कसें पुरें पडावें !

पराजित होऊन संतानांच्या सैन्यानें पळायला सुरवात केली.

# द्वितीय खंड

## — १ —

अगदींच लहान वयांत शांतीची आई मरण पावली होती. शांतीच्या जीवनावर पुढल्या काळांत जो परिणाम झाला त्यांत हें एक महत्त्वाचें कारण होतें. तिचा बाप एक अध्यापक ब्राह्मण होता. त्याच्या घरांत दुसरी कुणीच स्त्री नव्हती.

पाठशाळेंत शांतीचा बाप विद्यार्थ्यांना ज्यावेळीं शिकवीत असे त्यावेळीं शांती जाऊन शेजारी बसे. त्यांचे कांहीं शिष्य पाठशाळेचे रहिवासी होऊन राहिले होते, शांती त्यांच्याशीं खेळत असे, त्यांच्या अंगाखांद्यावर चढत असे, तेही शांतीला मोठ्या प्रेमानें वागवीत असत.

लहानपणापासून पुरुषांच्याच सहवासांत राहिल्याचा तिच्यावर परिणाम झाला. शांती बायकांच्यासारखा पेहेराव करायला शिकली नाहीं—किंवा शिकवूनही तिनें तो पेहेराव टाकून दिला. ती पुरुषांप्रमाणेंच काचा मारून धोतर नेसत असे. कुणी तिला साडी नेसवली तर ती फेंकून देऊन ती धोतर नेसून काचा मारीत असे. विद्यार्थी कपाळाला चंदनाचा टिळा लावीत, शांतीही तसाच टिळा लावी. गळ्यांत जानवें घालतां येत नाहीं म्हणून शांती हट्ट धरून रडे. पण संध्या आह्निकाच्या वेळीं त्या विद्यार्थ्यांच्या रांगेंत बसून तीही त्यांचें सहीसही अनुकरण करी.

अध्यापकाच्या गैरहजेरींत कित्येक विद्यार्थी संस्कृत भाषेंतील अश्लील श्लोक म्हणत, श्रृंगारिक गोष्टी सांगत, पोपटाप्रमाणें शांतीलाही ते मुखोद्गत झाले होते—अगदीं पोपटासारखेंच—त्यांचा अर्थ तिला मुळींच कळत नसे.

दुसरा परिणाम असा झाला, कीं शांती थोडीशी मोठी झाल्याबरोबर विद्यार्थी जें जें कांहीं पठण करीत, त्यांच्याबरोबर तीही तें पाठ करूं लागली. व्याकरणातलें एक अक्षरसुद्धां जरी तिला कळत नव्हतें, तरीही ती भट्टि, रघु, कुमार, नैषधादि काव्यांतले श्लोक व्याख्येसह भडाभड म्हणून दाखवीत असे.

काय होईल तें होवो असा विचार करून शांतीच्या बापानें तिला मुग्धबोधे व्याकरण शिकवायला सुरवात केली. शांती पहातां पहातां प्रवीण होऊं लागली. अध्यापकाला आश्चर्य वाटलें. व्याकरणाबरोबरच त्यांनीं तिला साहित्यशास्त्रही शिकविलें.

त्यानंतर मात्र सगळीच उलथापालथ झाली. तिचा बाप कैलासवासी झाला.

शांती आतां निराधार होती. पाठशाळा बंद पडली. विद्यार्थी निघून गेले. पण शांतीबद्दल ज्यांना खरोखरच लोभ वाटत होता, अशा व्यक्तींनीं तिला टाकून दिलें नाहीं. तिचा कळवळा येऊन एकानें तिला आपल्या घरीं नेलें. हाच माणूस पुढें संतानसंप्रदायांत प्रवेश करून ‘ जीवानंद ’ नांवानें प्रसिद्धी पावला होता.

त्यावेळीं जीवानंदाचे आईबाप हयात होते. शांतीला घेऊन तो त्यांच्यापाशीं आला, तेव्हां त्यांनीं विचारलें, ‘ ही परक्याची मुलगी—हिचा भार आतां कोण घेणार ? ’

जीवानंद म्हणाला, ‘ मीं तिला आणली आहे—तिचा भार आतां मलाच घेतला पाहिजे.’

त्याच्या आईबापांनीं म्हटलें, ‘ जशी तुझी मर्जी ! ’

जीवानंद अविवाहित होता. शांती उपवर झालेली होती. जीवानंदानें तिच्याशीं विवाह केला.

या विवाहानंतर सर्वांवर पश्चात्ताप करायची पाळी आली. सर्वांनाच कळून चुकलें, कीं झालें हें बरें झालें नाहीं. कांही केल्या शांती साडी नेसेना कीं केंसाचा आंबाडा बांधीना.

ती मुळीं घरांतच रहात नसे. आजूबाजूचीं मुलें गोळा करून धुडगुस घालीत असे. जीवानंदाच्या घराशेजारींच एक जंगल होतें. शांती एकटीच त्या जंगलांत जाई आणि कुठें मोर, कुठें हरीण, कुठें दुर्मिळ अशी फळेंफुलें शोधीत

भटकत राही. सासूसासऱ्यानीं पहिल्यानें तिला समजावून सांगितलें, नंतर छेडलें, नंतर मारून पाहिलें, शेवटीं खोलींत घालून बाहेरून कडी घालून तिला बंद करून ठेवायला सुरवात केली.

वडील माणसांच्या या छळामुळें ती भडकून उठली. एके दिवशीं दार उघडें आहे अशी संधी साधून कुणाला कांहीं न कळवतां ती घर सोडून चालती झाली.

ती जंगलांत गेली. तिथें कांहीं फुलें काढून तिनें माळा करून गळ्यांत घातल्या आणि अंगावरचे कपडे रंगवून ती गोसावी बनली. यावेळीं साऱ्या बंगाल देशांत गोसावी लोक टोळ्या करून फिरत असत. ते एक प्रकारचे राजद्रोहीच लोक असत. राजाचें राजस्व लुटून चरितार्थ करीत. एकादें धडधाकट मूल दिसलें, कीं ते त्याला पळवून नेत आणि त्याला शिक्षण देऊन आपल्या संप्रदायांत सामील करून घेत. त्यामुळें त्यांना ' बालक—चोर ' म्हणत असत.

शांति बालगोसाव्याच्या वेषांत अशाच एका संप्रदायांत सामील झाली. ती नाजुक दिसत असल्यामुळें पहिल्यानें ते तिला आपल्या संप्रदायांत सामील करून घ्यायला तयार नव्हते; पण तिची प्रखर बुद्धि, चातुर्य आणि कर्मदक्षता पाहून शेवटीं त्यांनीं तिला आपल्यांत घेतलें. त्या लोकांत मिळूनमिसळून राहून ती व्यायाम करी, हत्यार चालवायला शिके, अशाप्रकारें ती वाटेल त्या परिस्थितीला तोंड द्यायला समर्थ झाली होती.

त्या गोसाव्यांच्या टोळींत राहून तिनें पुष्कळ देश पालथे घातले, अनेक लढाया लढवल्या आणि पुष्कळशीं नवींनवीं कामें करायला ती शिकली.

हळूहळू तिच्या ठायीं यौवनाची लक्षणें दिसूं लागलीं. बऱ्याच संन्याशांना कळून चुकलें, कीं ही पुरुषवेषधारी स्त्री आहे. त्यांतले बहुतेक संन्यासी जितेंद्रिय होते, त्यांनीं त्या गोष्टीची वाच्यता केली नाहीं.

त्या संन्याशांच्या टोळींत बरेच पंडीत होते. संस्कृत भाषेच्या अभ्यासांत शांतीनें थोडीफार प्रगति केलेली आहे असें दिसून आल्यामुळें, एका संन्यासी पंडीतानें तिला शिकवायला सुरवात केली. ते सारेच संन्यासी जसे पंडीत नव्हते, तसे सारेच जितेंद्रियही नव्हतें. तारुण्याचा विकास झाल्यामुळें शांतीचें

सौंदर्य आतां फुटून पडूं लागलें होतें, त्यामुळें कित्येकांची बुद्धि चळूं लागली होती.

तो पंडित या आपल्या शिष्येला शृंगाररसात्मक काव्यें शिकवूं लागला. शृंगारिका कविता घेऊन त्यांच्या अश्राव्य व्याख्या ऐकवूं लागला. त्यामुळें शांतीच्या मनावर दुष्परिणाम व्हायच्याऐवजीं उलट सुपरिणामच होऊं लागला. लाजलज्जा कशाला म्हणतात, याची शांतीला ओळखसुद्धां नव्हती, ती स्त्रीजातीच्या स्वाभाविक भावनेनें आतां लाजूं लागली होती. आधीं तिचा पुरुषी थाट होता. त्या मर्दानी वृत्तीवर स्त्रीचरित्राचा अपूर्व प्रभाव पडून शांती विशेष बलवान होऊं लागली होती.

शांतीनें आतां शिक्षण सोडून दिलें.

पारधी ज्याप्रमाणें हरिणीच्या मागें लागतो त्याप्रमाणें शांतीचा तो अध्यापक तिचा पाठपुरावा करूं लागला होता. उत्तम प्रकारचा व्यायाम करून ती कोणत्याही पहिलवानाइतकी बलवान झालेली असल्यामुळें तो अध्यापक आंगलटीला आला कीं त्याला गुद्दे लगावून ती त्याची पूजा करी—आणि तिचे ते गुद्दे कांहीं अगदींच नाजुक नसत.

एके दिवशीं शांतीला एकांतांत गांठून त्या संन्याशानें जोराचें अवसान आणून तिचा हात पकडला. शांतीला तो सोडवतां येईना दुर्दैवानें त्या संन्याशानें तिचा डावा हात पकडला होता. उजव्या हातानें तिनें त्याच्या मस्तकावर एवढ्या मोठ्या जोरानें गुद्दा मारला, कीं तो संन्यासी मूर्च्छित होऊन खालीं पडला.

संन्यासीसंप्रदाय सोडून शांती पळून गेली.

शांतीला भीतीची ओळखच नव्हती. ती एकटीच आपला गांव शोधीत निघाली. आपल्या धाडसी बाहुबलाच्या जोरावर ती निर्विघ्नरीत्या प्रवास करीत होती. केव्हां ती भिक्षा मागे, तर केव्हां जंगली फळमुळांवर आपली भूक भागवी. तसाच प्रसंग आला तर मारामारी करायला मागेंपुढें पहात नसे.

शेवटीं एकदांची ती आपल्या सासुरवाडीला आली. तिचे सासरे स्वर्गस्थ झाले होते. गांवचे लोक वाळींत टाकतील या भीतीनें सासू तिला घरांत घेईना. शांती घराबाहेर निघाली. जीवानंद त्यावेळीं घरांत होता. त्याला ती बातमी

कळतांच तो तिच्या मागोमाग निघाला. वाटेंत त्यानें तिला गांठलें आणि विचारलें, ' तूं घर टाकून कां गेली होतीस ? इतके दिवस कुठं होतीस ? '

शांतीनें सारी खरीखरी हकिकत त्याला सांगितली. खऱ्याखोट्यांतला फरक जीवानंदाला कळत होता. जीवानंदाला शांतीचें म्हणणें पटलें.

तिच्या प्रस्फुटित यौवनाचा जीवानंदाच्या मनावर परिणाम झाला. तो म्हणाला, ' मीं तुला टाकून देणार नाहीं. मीं जरा जाऊन येतों, तोंपर्यंत तूं इथंच उभी रहा. '

शांती म्हणाली, ' तुम्हीं परत येणार आहांत ना ? ' तिला कांहीं उत्तर न देतां जीवानंद तिथून चालता झाला. आईची समजूत घालून तो तिचा निरोप घेऊन निघाला. त्याची बहीण निमाईमणी हिचें आतां लग्न होऊन गेलें होतें. तिचें सासर भैरवीपूरला होतें. जीवानंदाचा आणि तिच्या नवऱ्याचा लोभाचा ऋणानुबंध होता. शांतीला घेऊन जीवानंद भैरवीपूरला गेला. त्याच्या मेहुण्यानें आपल्या जमिनींतून थोडीशी जमीन त्याला तोडून दिली. जीवानंदानें तिथें एक झोंपडी बांधली आणि शांतीला घेऊन तो त्या झोंपडींत सुखाचा संसार थाटून राहिला.

नवऱ्याच्या सहवासामुळें शांतीच्या स्वभावांतली पुरुषी वृत्ति दिवसेंदिवस नाहींशी होऊं लागली—कदाचित ती प्रच्छन्न होऊन राहिली असावी. सुख-स्वप्नाप्रमाणें त्यांचें जीवन मोठ्या आनंदांत जात होतें.

पण एकाएकीं त्या सुखस्वप्नाचा भंग झाला. सत्यानंदाची गांठ पडल्यामुळें जीवानंदानें संतानधर्माचा स्वीकार केला आणि शांतीला टाकून तो निघून गेला. या त्यांच्या ताटातुटीनंतर त्या पतिपत्नींची पहिली भेट झाली ती निमाईमणीच्या कौशल्यामुळें.

## — २ —

जीवानंद निघून गेल्यावर शांती निमीच्या पडवींत येऊन बसली. मुलीला मांडीवर घेऊन निमीही तिच्या शेजारीं येऊन बसली.

शांतीच्या डोळ्यांत एवढासुद्धां ओलावा नव्हता. केव्हांच डोळे पुसून घेऊन ती मुद्रा खुलवून घेऊन आली होती. थोडीथोडी हांसत होती देखील.

तरीपण ती थोडीशी चिंताकुल आणि जराशी विचुक झाली होती. त्या तिच्या मनःस्थितीचा अंदाज येऊन निमी म्हणाली, ' कसं कां असेना, भेट तर झाली ! '

शांतीनें उत्तर दिलें नाहीं. ती मुकाट बसली होती. निमीला कळून चुकलें, कीं आपल्या मनांतली गोष्ट शांती यावेळीं बोलून दाखवणार नाहीं. मनांतली गोष्ट बोलून दाखवायची पूर्वीपासूनच तिला आवड नव्हती हें निमीला माहीत होतें. अर्थात् तिनें दुसराच विषय काढला. ती म्हणाली, ' बघ बघ वहिनी, किती सुंदर छबडी आहे ही ! '

' कुठं मिळवलीस ही मुलगी ? ' शांती म्हणाली, ' तुला मुलगी कधीं झाली ग ?

' आतां काय म्हणावं तुला ? ' निमी म्हणाली, 'तूं अगदींच बावळट आहेस. ही आहे दादाची मुलगी.'

शांतीला चिडवण्यासाठीं कांहीं ती तसें बोलली नव्हती. दादाची मुलगी म्हणजे दादानें आणून दिलेली मुलगी. शांतीला तें कळलें नाहीं. तिला वाटलें, निमी आपल्याला उगींच सुई टोंचून पहाते आहे. ती म्हणाली, ' मीं मुलीच्या बापाची चौकशी केली नाहीं—आई कोण म्हणून विचारतेंय.'

या उत्तरानें निमीची खोड मोडली होती. ती ओशाळून, ' कुणाची मुलगी कोणजाणे, दादानं कुठून तरी हुडकून आणलीय ही. मुलगी भारी सुंदर दिसली. गोडगोड नाजूकसं चंद्रासारखं रूपडं पाहून दादाच्याकडून मीं मागून घेतली हिला.'

बराच वेळपर्यंत त्या दोघीही अशाच इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलत बसल्या होत्या. निमीचा नवरा घरीं आला असें पाहून शांती उठून आपल्या झोंपडींत गेली.

घरांत आल्याबरोबर तिनें दार आंतून बंद करून घेतलें. चुलींतली बरीचशी राख तिनें बाहेर काढून ठेवली. राहिलेल्या राखेंत तिनें चुलीवरचें जेवण ओतून टाकलें.

केलेला सैंपाक तिनें चुलींत फेंकून दिलाच होता. पलीकडे जंगलांत जाऊन तिनें चार फळें तोडून आणलीं आणि तेवढ्यावरच जेवण उरकलें. ज्या तिच्या

ढाक्याच्या साडीवर निमीची एवढी नजर होती, ती तिनें बाहेर काढली आणि तिचे कांठ फाडून टाकले. शिल्लक राहिलेलें कापड तिनें कावेंत भिजवलें. रंगवलेला कपडा वाळेपर्यंत संध्याकाळ झाली.

काळोख पडल्याबरोबर तिनें दार बंद करून घेतलें. तिनें एक विलक्षण उद्योग आरंभिला होता. माथ्याचे सडक लांबलचक केंस कात्रीनें बरेचसे कापून तिनें ते बाजुला ठेवून दिले. माथ्यावर शिल्लक राहिलेल्या केंसांच्या तिनें जटा वळल्या. त्या केंसांना फार दिवस तेल लागलेलें नसल्यामुळें त्या जटाही शोभून दिसल्या. भगव्या रंगानें रंगवलेलें तें वस्त्र मधून फाडून तिनें गळ्यांत घातलें. शिल्लक राहिलेला तुकडा तिनें छातीवर घट्ट बांधून घेतला.

खोलींत एक लहानसा आरसा कुठेंतरी पडून राहिला होता, तो बाहेर काढून शांतीनें आपला वेष नीट पाहून घेतला. पहात असतांना ती आपल्याशींच उद्गारली, ' कांय करतेंय मीं हें ! '

तिनें आरसा फेंकून दिला. कापून ठेवलेल्या केंसांच्या तिनें दाढीमिशा तयार केल्या, पण तें तिला नीटसें जमलें नाहीं.

त्यानंतर ती घरांत गेली आणि एक हरणाचें कातडें घेऊन आली. त्याची गांठ तिनें गळ्याला बांधली आणि गळ्यापासून गुडघ्यापर्यंत सारा देह तिनें झांकून घेतला.

दोन प्रहर रात्र झाल्यानंतर दरवाजा उघडून ती बाहेर आली. त्या संन्यासी वेषांत ती एकटीच त्या घनदाट जंगलांत प्रवेश करती झाली.

## — ३ —

दुसरे दिवशीं आनंदमठाच्या एका अंतर्भागांत बसून खचून गेलेले संतानांचे तीन पुढारी आपसांत चर्चा करीत होते. जीवानंदानें सत्यानंदांना विचारलें, ' महाराज, आमच्यावर देवाचा असा कोप कां झाला ? कोणत्या दोषांमुळें मुसलमानांच्या हातून आम्हीं पराभूत झालों ? '

सत्यानंद म्हणाला, ' हा देवतांचा दोष नव्हे. लढाईंत जय आहे तसाच पराजयही आहे. त्या दिवशीं आम्हीं विजयी झालों, आज पराभूत झालों—शेवटीं आमचा जय होणारच. ज्या शंखचक्रगदापद्मधारी वनमालीनें

इतके दिवस आमच्यावर पाखर घातली तोच यापुढंही आमचा पाठीराखा राहील, असा माझा दृढ विश्वास आहे. आमच्या पराभवाचं कारण एकच—आम्हीं निशस्त्र होतों. दारूगोळा, बंदुक—तोफा यांच्यासमोर लाठी—सोटे अन् भाल्यांचा टिकाव कसा लागणार ? पुरुषार्थाच्या या उणीवेमुळंच आम्हांला पराभव पदरीं घ्यावा लागला. आतां हीं शस्त्रास्त्र भरपूर मिळवणं हेंच आपलं पहिलं कर्तव्य ! '

' तें तर मोठं कठीण काम आहे. ' जीवानंद म्हणाला.

' कठीण काम म्हणतोस जीवानंद ' सत्यानंद म्हणाला, ' संतान असून ह शब्द तुझ्या तोंडून कसा आला ? संतानाच्या लेखीं कठीण असं काय आहे ? '

जीवानंद म्हणाला, ' ती सामुग्री कशी मिळवायची तेंच आतां सांगा. '

सत्यानंद म्हणाला, ' याच कामासाठीं, मीं आज रात्रीं तीर्थयात्रेला निघणार आहें. मी परत येईपर्यंत कोणत्याही जोखमीच्या कामाला हात घालूं नका. फक्त संतानांचं ऐक्य राखलंत कीं झालं. त्यांच्या खाण्यापिण्याची नीट व्यवस्था ठेवा आणि आईच्या रणजयासाठीं खजिना भरपूर करून घ्या. ही जबाबदारी मीं तुम्हां दोघांवर टाकतों आहें.'

' तीर्थयात्रा करून तें सारं कांहीं मिळणार कसं ? ' भवानंदानें विचारलें, ' दारूगोळा आणि बंदुक, तोफा विकत घेऊन इकडे पाठवायच्या म्हणजे मोठं भानगडीचं काम आहे. अन् त्या मिळणार तरी कुठं ? त्या विकणार कोण ? अन् इथं आणणार तरी कोण ? '

' या वस्तु विकत आणून काम चालू करणं शक्य नाहीं.' सत्यानंद म्हणाला ' मी कारागीर पाठवून देतों—हीं हत्यारं इथंच तयार केलीं पाहिजेत.'

' म्हणतां काय ? ' जीवानंद म्हणाला, ' या आनंदमठांत ? '

' तसं कसं होईल ? ' सत्यानंद म्हणाला, ' बरेच दिवसपर्यंत मी या गोष्टी-वर विचार करतों आहें. देवाच्या दयेनं हा सुयोग आज साधला आहे. तुम्ही म्हणतांहां, कीं ईश्वर आम्हांला प्रतिकूल आहे; पण मला स्पष्ट दिसतंय, कीं तो अनुकूलच आहे आम्हांला.'

भवानंदानें विचारलें, ' कुठं उघडायचा हा कारखाना ? '

‘ पदचिन्ह गांवीं.’ सत्यानंद म्हणाला.

‘ म्हणतां काय ! ’ जीवानंद म्हणाला, ‘ हा कारखाना तिथं कसा उघडतां येईल !

सत्यानंद म्हणाला, ‘ नाहींतर मी महेंन्द्रसिंहाला या महाव्रताची दीक्षा देण्यासाठीं कां एवढी धडपड करतों आहें ? ’

‘ महेन्द्रानं हें व्रत घेतलं का ? ’ भवानंदानें विचारलें.

‘ व्रत घेतलं नाहीं,’ सत्यानंद म्हणाला, ‘ पण तो घेईल. आज रात्रीं त्याला ही दीक्षा मीं देणार आहें.’

जीवानंद म्हणाला, ‘ महेन्द्रसिंहानं या व्रताचीं दीक्षा घ्यावी म्हणून कोणती खटपट चालली आहे, तें आम्हांला तरी दिसून आलेलं नाहीं. त्याच्या बायकोमुलीचं काय झालं ? कुठं ठेवलंय त्यांना ! आज नदीकांठीं मला एक मुलगी सांपडली तिला मीं माझ्या बहिणीच्या हातीं देऊन आलोंय. तिच्या शेजारींच एक सुंदर स्त्री मरून पडलेली होती. तीच महेन्द्राची बायको आणि मुलगी तर नव्हे ? मला असाच संशय येतोय.’

‘ महेन्द्राची बायको मुलगी तीच.’ सत्यानंद म्हणाला.

भवानंद दचकला. आपल्याकडच्या औषधानें ज्या बाईला आज आपण पुन्हां जगवलें तीच महेन्द्राची स्त्री कल्याणी, हें त्याला आतां कळून आलें. पण ती गोष्ट यावेळीं उक्त करावी असें त्याला वाटलें नाहीं.

‘ महेन्द्राचीं बायको मेली कशी ? ’ जीवानंदानें विचारलें.

‘ विष खाऊन ! ’

‘ तिनं विष कां घेतलं ? ’

सत्यानंद म्हणाला, ‘ भगवंतानं तिला स्वप्नांत प्राणत्याग करायचा आदेश दिला.’

भवानंदानें विचारलें, ‘ संतानांच्या कार्यासाठींच का तिला स्वप्नांतून हा आदेश मिळाला ? ’

सत्यानंद म्हणाला, ‘ महेन्द्रानंच मला तसं सांगितलं. आतां संध्याकाळ होत आला आहे. मी माझी सायंकृत्यं उरकण्याठीं जातों. त्यानंतर नव्या संतानांचा दीक्षाविधि सुरू करायचा आहे.’

'संतानांचा ?' भवानंदानें विचारलें. 'महेन्द्राखेरीज दुसरा कुणी संतान व्हायच्या ईर्षेनं आला आहे का ?'

'हो. आणखी एक आला आहे.' सत्यानंद म्हणाला, 'त्याला मीं पूर्वी कधींच पाहिलं नव्हतं. आज पहिल्यानंच तो माझ्यापाशीं आला आहे. तो अगदींच तरुण आहे. त्याच्या एकंदर बोलण्याचालण्यावरून मीं त्याच्यावर भारी खूष झालोंय. अगदीं अस्सल बावनकशी सोनं असावंसं वाटतं. संतानांच्या कामाचं शिक्षण देण्यासाठीं मीं त्याला जीवानंदाच्या हातीं देणार आहें. कारण या कामीं माणसाला चट्कन आपलासा करून घ्यायला जीवानंदासारखा दुसरा कुणी नाहीं. मीं आतां जातों. आतां एकच गोष्ट सांगायची राहिली आहे. अगदीं कसून मन लावून ती ऐकून घ्या.'

त्या दोघांनींही हात जोडून म्हटलें, 'आतां आज्ञा व्हावी.'

सत्यानंद म्हणाला, 'तुम्हां दोघांपैकीं कुणाच्याही हातून जर कांहीं अपराध घडला असेल, किंवा मीं यायच्यापूर्वी तसा एकादा अपराध घडेल, तर त्याचं प्रायश्चित्त मीं येईपर्यंत करूं नका. मीं परत आलों म्हणजे तें प्रायश्चित्त द्यायची व्यवस्था करीन.' असें म्हणून सत्यानंद निघून गेला.

भवानंद आणि जीवानंद एकमेकांच्या तोंडाकडे पहात राहिले.

भवानंदानें विचारलें, 'तुला उद्देशून होतं का हें भाषण ?'

'असं वाटतं खरं.' जीवानंद म्हणाला, 'महेन्द्राची मुलगी घेऊन मीं माझ्या बहिणीच्या घरीं गेलों होतों.'

भवानंद म्हणाला, 'त्यांत कसला दोष ? बहिणीला भेटायला कांहीं निषेध नाहीं. ब्राह्मणीला भेटून आलास का ?'

जीवानंद म्हणाला, 'गुरुदेवांना तसंच वाटलं असावं असं दिसतं.'

## — ४ —

संध्याकाळचें आह्निक संपल्यावर सत्यानंदानें महेन्द्रला बोलावुन सांगितलें, 'तुझी मुलगी हयात आहे.'

'कुठंय् ती महाराज ?' महेन्द्रानें विचारलें.

'तूं मला महाराज कां म्हणतोस ?'

'सगळेच म्हणतात, तसा मीही म्हणतों. मठाच्या प्रमुखाला राजाच मानायचं असतं.—माझी मुलगी कुठंय महाराज ?'

सत्यानंद म्हणाला, 'त्यापूर्वी आधीं मला एक प्रश्नाचं उत्तर दे. तूं संतानधर्माची दीक्षा घेणार का ?'

'तें तर मीं आपल्या मनाशीं निश्चितच केलं आहे.' महेंद्र म्हणाला.

'तर मग मुलगी कुठं आहे हें विचारूं नकोस.'

'कां महाराज ?

सत्यानंद म्हणाला, 'जो हें व्रत ग्रहण करतो, त्यानं स्त्री—पुत्र—कन्या प्रभृति नात्यागोत्याच्या कुणाशींही संबंध ठेवायचा नाहीं असा नियम आहे.'

'हा भारी कठीण नियम कां केलाय प्रभू ?' महेन्द्रानें विचारलें.

'संतानांचं कार्यच मोठं कठीण आहे.' सत्यानंद म्हणाला, 'ज्यांना सर्वस्वाचा त्याग करतां येत नाहीं तो माणूस या कामाला योग्य नाहीं. मायेच्या दोरीनं जो बांधला जात असतो, तो दोरीनं बांधलेल्या पतंगासारखा स्वर्गातून शेवटीं जमिनीवर पडतो.'

'महाराज, मला हें नीटसं कळलं नाहीं.' महेन्द्र म्हणाला, 'स्त्रीपुत्रांचं मुखावलोकन करणारा माणूस या महान् कार्याला अनधिकारी कां ?'

'स्त्रीपुत्रांचं मुखावलोकन करणारा माणूस देवतांचं कार्य अगदीं सहज विसरतो.' सत्यानंद म्हणाला, 'संतानधर्माचा नियमच असा आहे, कीं जरूर पडेल त्यावेळीं त्यानं प्राणत्यागालाही तयार राहिलं पाहिजे."

महेन्द्र म्हणाला, 'सारेच संतान काय स्त्री—पुत्र विसरून का इथं आले आहेत ? तर मग संतानांची संख्या अगदींच थोडी असायला हवी.'

सत्यानंद म्हणाला, 'संतान दोन प्रकारचे आहेत. एक दीक्षा घेतलेले आणि एक दीक्षा न घेतलेले. दीक्षा न घेतलेले जे आहेत ते एक संसारी तरी आहेत, नाहींतर भिकारी तरी आहेत. ते केवळ लढाईच्या वेळीं हजर राहतात आणि लुटीचा भाग घेऊन किंवा इतर बक्षिसी घेऊन निघून जातात. जे दीक्षित आहेत ते सर्वत्यागी आहेत. तेच आहेत या संप्रदायाचे नेते. लढाईच्या कामासाठीं लाठीकाठीवाले पुष्कळ आहेत. तुझा समावेश त्यांच्यांत

व्हावा अशी माझी इच्छा नाहीं. दीक्षित झाल्याशिवाय संप्रदायाचं जोखमीचं काम तुला हातीं घेतां यायचं नाहीं.'

'ही दीक्षा कसली ?' महेन्द्रानें विचारलें, 'दीक्षा म्हणजे गुरूपदेश कां ? ही दीक्षा कां घ्यायची ? मीं तर यापूर्वीच गुरूपदेश घेतला आहे—गुरूमंत्र घेतला आहे.'

'तो गुरुमंत्र तुला टाकावा लागेल.' सत्यानंद म्हणाला, 'पुन्हां माझ्यापाशीं गुरुमंत्र घ्यावा लागेल.'

महेन्द्रानें विचारलें, 'तो मंत्र टाकायचा कोणत्या प्रकारें ?'

'ती पद्धति मीं तुला मागाहून सांगेन.'

'नवा गुरुमंत्र कां घ्यायला हवा ?'

सत्यानंद म्हणाला, 'संतान वैष्णव आहेत.'

'मोठं आश्चर्य आहे !' महेन्द्र म्हणाला, 'संतान वैष्णव कसे ? वैष्णवांचा परमधर्म म्हणजे अहिंसा.'

'ते वैष्णव चैतन्यदेवाच्या संप्रदायांतले.' सत्यानंद म्हणाला, 'नास्तिक बौद्धधर्माच्या अनुकरणानं जो अस्वाभाविक वैष्णवपंथ निर्माण झाला, त्याचं लक्षण आहे तें. चैतन्यदेवांचा विष्णु केवळ प्रेममय—संतानांचा विष्णु केवळ शक्तिमय. आम्हीं दोघेही वैष्णवच—पण दोघेही अर्धे वैष्णवच आहोंत !—आतां कळलं ?'

महेन्द्र म्हणाला, 'नाहीं. हें कांहींतरी नवंनवंचसं लागतंय मला. काशीमबाजारामध्यें एक पाद्री मीं पाहिला होता. तो असंच कांहींतरी बोलत असे—अर्थात् ईश्वर प्रेममय म्हणून—तुम्ही येशूवर प्रेम करा—असंच कांहींतरी तो बोलत होता !'

सत्यानंद म्हणाला, 'आमचे वाडवडील, ऋषिमुनि जें जें कांहीं सांगत आले आहेत तेंच मीं तुला सांगितलं. ईश्वर त्रिगुणात्मक आहे असं म्हटल्याचं ऐकलंयस् ना तूं ?'

महेंद्र म्हणाला, 'हो—सत्त्व, रज, तम हे तीन गुण.'

'ठीक आहे.' सत्यानंद म्हणाला, 'या तिन्ही गुणांच्या उपासना वेगवेगळ्या आहेत. सत्त्वगुणापासून दया—दाक्षिण्य प्रभृतींची उत्पत्ति, त्याची

उपासना भक्तिमार्गानं. तोच मार्ग चैतन्य संप्रदायाचा. रजोगुणापासून त्याच्या शक्तीची उत्पत्ति—ती उपासना युद्धाच्या मार्गानं—देवद्वेषी गणाचा संहार करून—तोच आमचा मार्ग. आणि तमोगुणाच्या प्रभावामुळं ईश्वर अवतार घेतो—इच्छेनुसार चतुर्भुजादि रूपं धारण करतो. षोडषोपचारानं त्या गुणाची पूजा करीत असतात—सर्वसाधारणांचा मार्ग तोच. आतां कळलं ? '

' कळलं ! ' महेन्द्र म्हणाला, ' म्हणजे संतान हे उपासकसंप्रदायाचे अनुयायी आहेत—होय ना ! '

' अगदीं बरोबर. ' सत्यानंद ' म्हणाला, ' आम्हांला राज्य नको आहे. मुसलमान भगवंताचे द्वेषी आहेत म्हणून त्यांचा सवंश निःपात करायचाय आम्हांला. '

ती चर्चा झाल्यानंतर महेन्द्राला घेऊन सत्यानंद मठांतल्या देवालयांत गेला. ज्या ठिकाणीं ती अपूर्वशोभामय अशी अत्यंत भव्य चतुर्भुज मूर्ति विराजित झाली होती, त्या मंदिरांत त्यांनीं प्रवेश केला. हें मंदिर यावेळीं उत्तम रीतीनें शृंगारलेलें होतें. सोन्या—रुप्याच्या दिव्यांनीं मंदिरांत रोषणाई केली होती. तिथें फुलांच्या नुसत्या राशी पडल्या होत्या, त्यामुळें सारें मंदिर सुगंधानें दरवळलें होतें.

मंदिरांत आणखी एकजण बसला होता आणि तो हळूहळू ' हरे मुरारे ' चें भजन करीत होता. सत्यानंदांनीं मंदिरांत प्रवेश करतांच तो उठला आणि त्यानें त्यांना प्रणाम केला.

सत्यानंदांनीं विचारलें, ' तूं दीक्षा घेणार आहेस. '

तो म्हणाला, ' माझ्यावर एवढा अनुग्रह व्हावा. ' त्यावेळीं त्यांनीं त्याला आणि महेन्द्राला उद्देशून प्रश्न केला, ' तुम्हीं यथाविधी स्नान केलं आहे ना ? संयम केला आहे ना ? उपास केला आहे ना ? '

त्यांनीं उत्तर दिलें, ' होय. '

त्यानंतर प्रश्नोत्तरें सुरू झाली. सत्यानंद प्रश्न करीत होते आणि ते दोघे उत्तरें देत होते.

' भगवंताच्या साक्षीनें तुम्हीं संतानधर्माचे सर्व नियम पाळायची प्रतिज्ञा करणार ना ? '

' होय महाराज. '

'जोंपर्यंत मातेचा उद्धार झाला नाहीं, तोंपर्यंत गृहधर्माचा परित्याग कराल ना ?'

'हो, करूं.'

'आई—बापांचा त्याग कराल ?'

'हो. करूं.'

'भाऊ—बहिणींचा ?'

'त्याग करूं.'

'बायको—मुलांचा ?'

'त्याग करूं.'

'आप्तस्वकीयांचा ? दासदासींचा ?'

'सर्वांचाही त्याग आम्हीं केला आहे.'

'धन—संपदा—भोग ?'

'सारीं टाकून दिलीं आहेत.'

'इंद्रियांचा जय कराल ? स्त्रीजातीच्या बरोबर एका आसनावरसुद्धां बसणार नाहीं ना ?'

'बसणार नाहीं. इंद्रियांचा जय करूं.'

'स्वतःसाठीं किंवा स्वजनांसाठीं अर्थोपार्जन करणार नाहीं अशी ईश्वरसाक्ष प्रतिज्ञा कराल ना ? जें कांहीं तुम्हीं मिळवाल तें सारं वैष्णवांच्या खजिन्यांत जमा कराल ना ?'

'जमा करूं.'

'सनातन धर्माच्या संरक्षणासाठीं हातीं शस्त्र धरून लढाई करालना ?'

'लढाई करूं.'

'लढाईच्या मैदानावर कधीं हटणार नाहीं ना ?'

'नाहीं.'

'आणि प्रतिज्ञाभंग झाला—तर ?'

'जळत्या खाईंत उडी घेऊं किंवा विष खाऊन प्राणत्याग करूं.'

आणखी एक गोष्टी—' सत्यानंद म्हणाला, ' जात.—तुमची जात कोणती? महेंद्र कायस्थ आहे तें मला माहीत आहे. मग तुझी जात कोणती?'

ती दुसरी व्यक्ति म्हणाली, ' मी ब्राह्मणकुमार.'

' उत्तम. तुमची जात टाकायची तयारी आहे का? साऱ्या संतानांची जात एक आहे. या महाव्रतांत ब्राह्मण शूद्र हा भेद नाहीं. काय म्हणणं आहे तुमचं?'

' तो भेद आम्ही मानणार नाहीं. आम्ही सारे एका मातेचे संतान.'

' तर मग आतां मी तुम्हांला दीक्षित करतों.' सत्यानंद म्हणाला, ' तुम्हीं आतां ज्या साऱ्या प्रतिज्ञा केल्या आहेत, त्या केव्हांही मोडूं नका. मुरारी स्वतः साक्षी आहे. प्रतिज्ञाभंग करणारांचा तो नाश करील—भयंकर नरकांत त्यांना लोटून देईल.'

ते दोघेही म्हणाले, ' तथास्तु!'

सत्यानंद म्हणाला, ' तर मग आतां गा—वंदे मातरम्.'

त्या दोघांनींही त्या मंदिरांत मातृगीत गायला सुरवात केली. गीत समाप्त झाल्यावर सत्यानंदानें त्या दोघांना यथाविधी दीक्षा दिली.

## — ६ —

दीक्षाविधि उरकल्यावर महेन्द्राला घेऊन सत्यानंद एका गुप्त जागीं गेले. दोघेही बसले तेव्हां सत्यानंदानें बोलायला सुरवात केली, ' असं पहा वत्सा, तूं या महाव्रताचा स्वीकार केलास ही भगवंताची आमच्यावर कृपाच झाली आहे. तुझ्याकरवीं मातेचं एक महान् कार्य संपादित होणार आहे. मीं आतां जें सांगतों, तें नीट लक्ष देऊन ऐक. जीवानंद—भवानंदांबरोबर वनारानांत फिरून तुला युद्ध करावं लागणार नाहीं. तूं फिरून आपल्या पदचिन्ह गांवी जा. स्वतःच्या घरीं राहून तुला संन्यासधर्म पाळावा लागेल.'

तें ऐकून महेन्द्राला जितकें आश्चर्य वाटलें तितकेंच दुःखही झालें. तो कांहीं बोलला नाहीं. ब्रह्मचारी बोलत होतां, '—सध्यांच्या प्रसंगीं आम्हांला आसरा नाहीं. बलाढ्य सैन्य आमच्यावर चालून आलं तर अन्नधान्याची बेगमी करून कवाडं बंद करून घेऊन निदान दहा दिवस तरी काढतां येतील, अशी

जागा आमच्यापाशीं नाहीं. आमचा एकादा किल्ला नाहीं. तुझं घर म्हणजे एक मोठा राजवाडाच आहे. तुझ्या गांवचा तूं मालक आहेस. तिथंच एक किल्ला बांधावा अशी आमची इच्छा आहे. पदचिन्ह गांवाला तटबंदी घालायची, सभोंवार खंदक खणायचा, मधून मधून मारगिऱ्या ठेवायच्या आणि तटबंदीवर तोफा चढवून मजबूत किल्ला अस्तित्वांत आणायचा, असा आमचा बेत आहे. तूं आपल्या घरीं जाऊन रहा. हळूहळू एक हजार संतान तिथं येऊन हजर होतील. त्यांच्या करवीं तटबंदी उभारायचं वगैरे काम तूं पुरं करून घ्यायचं. तसंच तिथं एक पोलादी घर तयार करायचं. त्या घरांत संतानांचा खजिना राहील. बहुमोल द्रव्याच्या पेट्या एक एक करून आम्हीं तिकडे पाठवून देऊं. त्यांतला पैसा खर्चीं घालून हीं सारीं कामं तूं पुरीं करून घ्यायचीं. मी वेगवेगळ्या जागीं जाऊन कुशल कारागीर मिळवून तिथं पाठवून देणार आहें. ते कारागीर तिथं आल्यावर पदचिन्ह गांवीं तूं एक कारखाना उभार. त्या कारखान्यांत दारूगोळा, बंदुका, तोफा वगैरे लढाईचीं साधनं तूं तयार करून घ्यायचीं. तुलां घरीं जायला मीं सांगितलं तें एवढ्यासाठींच.'

महेंद्रानें कबुली दिली.

## — ७ —

सत्यानंदांना प्रणाम करून महेंद्रानीं निरोप घेतला. त्या दिवशीं ज्या दुसऱ्या शिष्याला दीक्षा देण्यांत आली होती, त्यानें येऊन सत्यानंदांना प्रणाम केला. त्याला आशीर्वाद देऊन सत्यानंदानें शेजारच्या कृष्णाजिनावर त्याला बसवून घेतलें. पहिल्यानें सर्वसाधारण बोलणीं झाल्यावर सत्यानंदांनीं विचारलें, 'आतां सांग, कृष्णाच्या ठायीं तुझी पूर्ण भक्ति आहे ना ?'

शिष्य म्हणाला, 'तें कसं सांगूं ? मी जिला भक्ति म्हणून समजतों ती कदाचित ढोंगबाजी असेल, नाहीं तर आत्मप्रतारणा तरी असेल !'

सत्यानंद खूष होऊन म्हणाले, 'अगदीं बरोबर सांगितलंस. ज्या योगानं भक्ति दृढ होईल असंच अनुष्ठान करीत जा. तुझे प्रयत्न सफल होतील असा माझा तुला आशीर्वाद आहे. कारण तूं अगदींच तरुण आहेस !—वत्सा, तुला कोणत्या नांवानं हांक मारायची तें मीं विचारलंच नाहीं.'

तो नवा संतान म्हणाला, 'आपली इच्छा असेल तें नांव मला द्या. मीं वैष्णवांचा दासानुदास आहें.'

सत्यानंद म्हणाले, 'तूं अगदींच तरुण दिसतोयस म्हणून तुला नवीनानंद नांव द्यावं असं मला वाटतं. आजपासून याच नांवानं तुला ओळखतील. पण मीं तुला विचारतों, पूर्वी तुझं नांव काय होतं? तसं नांव सांगायला कांहीं अडचण असली तरीहीं मला सांग. मला जें सांगशील तें घट्‌कर्णी होणार नाहीं. संतानधर्माचं मर्म असं आहे, कीं एकादी सांगण्याजोगी गोष्ट नसली तरी ती गुरूपाशीं सांगितली पाहिजे. तशी सांगितल्यानं कसलंच नुकसान व्हायचं नाहीं.'

शिष्य म्हणाला, 'माझं नांव शांतिराम देव शर्मा.'

सत्यानंद म्हणाले, 'तुझं नांव शांतिमणी पापिष्टा!' त्यांनीं त्या शिष्याची दीड हात लांब काळी दाढी डाव्या हातानें धरून ओढली त्यासरशीं ती खोटी दाढी हातीं आली.

सत्यानंद म्हणाले, 'काय हें पोरी! माझ्याशीं प्रतारणा करतेस? मला फसवायचंच होतं, तर या वयांत ही दीड हात दाढी कशी शोभेल? अन् दाढी आंखुड केलीस तरी देखील आवाज, डोळ्यातली चमक काय लपवतां येते? मीं एवढा भोळा असतों तर कशाला एवढ्या मोठ्या कार्याला हात घातला असता?'

विचारी शांती दोन्ही हातांनीं डोळे झांकून घेऊन मान खालीं घालून बसली. थोड्या वेळानें तिनें हात खालीं घेतले आणि म्हाताऱ्याकडे पाहून म्हटलें, 'यांत माझी काय चूक झाली प्रभू? स्त्रीच्या मनगटांत काय ताकदच नसते?'

'गोष्पदांतल्या पाण्याइतकीच.' सत्यानंद म्हणाले.

शांतीनें विचारलें, 'संतानांच्या बाहुबलाची कधीं परीक्षा घेतां का तुम्ही?'

'हो, घेतों.' सत्यानंद म्हणाले. त्यांनी एक पोलादी धनुष्य आणि कांहीं लोखंडी बाण तिच्या हातीं दिले आणि म्हटलें,—'या पोलादी धनुष्यावर हे बाण चढवून धनुष्य खेंचून दाखव. खेंचायचं प्रमाण दोन हात. खेंचतांना धनुष्य जर हातचं सुटलं तर तें हातीं घेणाराला फटकावून उडवून देतं. जो प्रत्यंचा ओढील तोच खरा बलवान.'

शांतीनें धनुष्यबाण हातीं घेऊन नीट पारखून पाहिलें आणि म्हटलें, 'सारे संतान या परीक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत का?'

‘ नाहीं. ’ सत्यानंद म्हणाले, ‘ मी नुसता त्यांच्या शक्तीचा अंदाच घेतला आहे यावरून. ’

‘ कुणींच या परीक्षेंत उत्तीर्ण झाले नाहींत का ? ’

‘ फक्त चौघेजण. ’

‘ ते कोण तें मला कळेल का ’

‘ सांगायला कांहीं हरकत नाहीं. ’ सत्यानंद म्हणाला, ‘ एक मी— ’

‘ आणि बाकीचे ? ’

सत्यानंद म्हणाला, ‘ जीवानंद ’ भवानंद आणि ज्ञानानंद. ’

शांतीनें धनुष्य हातीं घेतलें आणि बाण लावून अगदीं लीलेनें प्रत्यंचा ओढली आणि तें सत्यानंदाच्या पायांशीं ठेवून दिलें.

सत्यानंद थक्क झाले—भ्याले—स्तंभित झाले. नंतर ते उद्गारले, ‘ हें काय ? तूं देवी कीं मानवी ? ’

शांती हात जोडून म्हणाली, ‘ मी एक सामान्य मानवी आहें—पण मी ब्रह्मचारिणी आहे. ’

‘ म्हणून काय झालं ? ’सत्यानंद म्हणाले, ‘ तूं बालविधवा आहेस का ? एकभुक्त राहणाऱ्या बालविधवेच्या अंगीं तरी एवढी ताकद कुठून येणार ?

‘ मी सधवा आहें. ’ शांती म्हणाली.

‘ तुझा नवरा नापत्ता झाला आहे का ? ’

‘ नाहीं. ’ शांती म्हणाली, ‘ मीं त्याच्याच मागावर आलें आहें. ’

सूर्याआडचे ढग बाजूला होतांच जसें कडक ऊन पडतें तसाच सत्यानंदाच्या मनांत प्रकाश पडला. तो म्हणाला, ‘ आतां आठवलं. जीवानंदाच्या बायकोचं नांव शांती—तूं जीवानंदाची ब्राह्मणी का ? ’

नवीनानंदानें मान खालीं घातली. तेव्हां सत्यानंद म्हणाला, ‘ हें पापाचरण कां केलंस ? ’

जटाभार पाठीवर मोकळा सोडून वर पाहून शांती म्हणाली, ‘ हें पापाचरण कसं प्रभू ? पत्नी पतीची अनुयायी झाली तर तें पापाचरण का ? संतानांच्या धर्मांत जर हें पापाचरण ठरत असेल तर संतानधर्म म्हणजे अधर्म आहे असं

मी म्हणेन. ते धर्माचरणाला प्रवृत्त झाले आहेत—मीं त्यांची सहधर्मिणी आहे—त्याच्या जोडीनं धर्माचरण करण्यासाठीं आलें आहें.'

शांतीची ती तेजस्वी वाणी आणि आसवांनीं भरलेले डोळे पाहून सत्यानंद खूष झाले. ते म्हणाले, 'तूं साध्वी आहेस! पण असं पहा मुली, पत्नी ही सहधर्मिणी असते ती गृहधर्मांत. वीरधर्मांत रमणीला जागा कुठं आहे?'

शांती म्हणाली, 'कुठला पत्निहीन महावीर झाला आहे? सीता नसती तर रामानं कसला पराक्रम गाजवला असता? अर्जुनानं किती विवाह केले होते! आपण सर्व जाणतांच—मीं काय सांगूं आपल्याला?'

'तें खरं आहे.' सत्यानंद म्हणाले, 'पण रणक्षेत्रांवर कुठला वीर कधीं आपली पत्नी घेऊन गेला आहे का?'

'कां बरं?' शांती म्हणाली, 'अर्जुनानं ज्यावेळीं यादवी सेनेबरोबर अंतरीक्ष युद्ध केलं त्यावेळीं द्रौपदीनंच ना त्याचा रथ हांकला होता? दशरथाला युद्धांत कैकेयीनं नाहीं कां मदत केली?'

'तें खरं आहे.' सत्यानंद म्हणाले, 'पण सामान्य माणसाचं मन स्त्रीच्या आसक्तीमुळं कार्यापासून चळतं म्हणूनच संतानांना हा नियम लावला आहे, कीं स्त्रीजातीबरोबर एका आसनावरसुद्धां बसायचं नाहीं. जीवानंद म्हणजे माझा उजवा हात—माझा हा उजवा हात तोडून टाकायला का तूं आली आहेस?'

'मीं आलें आहें ती आपल्या उजव्या हाताची शक्ति वाढवण्यासाठीं.' शांती म्हणाली, 'मीं ब्रह्मचारिणी आहें. मीं आपल्या लेखीं ब्रह्मचारिणीच राहीन. मीं आलें आहें ती केवळ धर्माचरणासाठीं—नवऱ्याला भेटण्यासाठीं नाहीं. मी विरहानं पोळलेली नाहीं, मग नवऱ्याच्या धर्मांत मी सहभागी कां होऊं नये? म्हणूनच मीं आलें आहें.'

'ठीक आहे.' सत्यानंद म्हणाले. 'कांहीं दिवस मीं तुझी कसोटी पहाणार आहें.'

शांती म्हणाली, 'मीं आनंदमठांत राहायला हरकत नाहीं ना?'

'आज आतां दुसऱ्या कुठं जाणार आहेस तूं?' सत्यानंद म्हणाले.

'पण यापुढं?' शांतीनें विचारलें.

'आई भवानीच्यासारखा तुझ्या ललाटावर अग्नि धगधगतो आहे.' सत्यानंद म्हणाले. 'या संतानसंप्रदायाला तूं जाळून का टाकणार आहेस?' असें म्हणून त्यांनीं तिला आशीर्वाद देऊन निरोप दिला.

शांती आपल्याशींच म्हणाली, 'जा रे बेट्या म्हाताऱ्या! म्हणे माझ्या कपाळी आग! तरी बरं, जळलं तुझं तोंड म्हणाला नाहींस! जळक्या तोंडाची मीं की तुझी आई?'

सत्यानंदाच्या उद्गारांचा तिनें विपर्यास केला होता. ते तिच्या नजरेंतल्या तेजाची वाखाणणी करीत होते—पण म्हाताऱ्यांची भाषा तरुणांना कुठें कळते!

## — ८ —

त्या रात्रीं शांतीला मठांतच राहायची परवानगी मिळाली होती, म्हणून ती खोल्या शोधीत निघाली. बऱ्याच खोल्या मोकळ्या होत्या. गोवर्धन नांवाचा एक दुय्यम दर्जाचा संतान तिथें नोकराचें काम करीत असे. तो हातांत दिवा घेऊन तिला खोल्या दाखवीत फिरत होता. कुठलीही खोली शांतीच्या पसंतीला उतरेना.

त्या नंतर शांती भवानंदाच्या खोलींत गेली. भवानंद छताकडे डोळे लावून कुणाचा तरी चेहेरा नजरेसमोर आणीत होता. तो चेहेरा मोठा सुंदर होता. तो चेहेरा पाहण्यांत तो मग्न झाला होता. कल्याणीच्या सौंदर्यानें तो विद्ध झाल्यामुळें शांतीकडे त्यानें ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं.

शांती तिथून बाहेर पडली आणि दुसऱ्या खोलीपाशीं गेली. तिनें विचारलें, 'ही कुणाची खोली?'

'जीवानंद ठाकुरांची.' गोवर्धन म्हणाला.

'हे आणखी कोण?' शांती उद्गारली, 'इथं तर कुणीच दिसत नाहीं!'

'कुठंतरी गेले आहेत वाटतं. इतक्यांत खास येतील.'

शांती म्हणाली, 'ही खोली सर्वांत उत्तम आहे.'

'पण ही खोली मिळायची नाहीं.' गोवर्धन म्हणाला.

'कां मिळायची नाहीं?' शांतीनें विचारलें.

'जीवानंद ठाकूर इथं राहातात.' गोवर्धन म्हणाला.

'त्यांना म्हणावं, तुम्हीं दुसरी खोली पहा.' शांती म्हणाली.

'असं कधीं झालंय ? ते याच खोलींत रहातात. या खोलीचे मालक आहेत ते. त्यांच्या शब्दाला फार मान आहे इथं.'

'बरं तर, जा तूं.' शांती म्हणाली, 'मला जागा मिळाली नाहीं तर मीं झाडाखालीं पडून राहीन.'

गोवर्धनला निरोप देऊन ती त्या खोलींत शिरली. जीवानंदाचें तिथें असलेलें कृष्णाजिन तिनें खालीं आंथरलें, दिव्यांतली वात सारली आणि जीवानंदाची एक पोथी घेऊन वाचायला सुरवात केली.

थोड्या वेळानें जीवानंद खोलींत आला. शांती पुरुषवेषांत होती तरीही तिला पाहिल्याबरोबर त्यानें ओळखलें. तो म्हणाला, 'हें काय हें ! शांती ?'

अगदीं शांतपणें पोथी खालीं ठेवून जीवानंदाच्या तोंडाकडे पहात ती म्हणाली, 'शांती कोण महाशय ?'

जीवानंदाची वाचा बसली–शेवटीं तो म्हणाला, 'काय म्हटलंस ? शांती कोण महाशय ! तूंच नाहींस का शांती !'

शांती फणकाऱ्यानें म्हणाली, 'मी नवीनानंद गोस्वामी.'

पुन्हां पोथी हातीं घेऊन ती वाचूं लागली.

जीवानंद मोठमोठ्यानें हसूं लागला. तो म्हणाला, 'हें बरं सोंग आणलंयस ! आणि म्हणे नवीनानंद ! कसला बेत योजून आलीस इथं ?'

शांती म्हणाली, 'पहिल्या भेटीला कुणालाही 'आपण' 'महाशय' असं कांहींतरी म्हणून बोलायचं अशी सभ्य माणसांची रीत आहे. मीं त्या रीतीचंच अनुकरण केलं. पण आपण कां मला 'तूं–तूं' म्हणतांहां ?'

'जशी आज्ञा.' असें म्हणून जीवानंदानें पदर पसरून हात जोडले आणि म्हटलें, 'या सेवकाचा आपल्याकडे अत्यंत विनयपूर्वक असा प्रश्न आहे, कीं कोणत्या कारणासाठीं भरुईपूर सोडून या दीनाच्या स्थानांत महाशयांचं शुभागमन झालं आहे ? आज्ञा व्हावी.'

शांती अत्यंत गंभीरपणें म्हणाली, 'थट्टा करायचं कारण नाहीं. भरुईपूर मला माहीत नाहीं. संतानधर्माचं व्रत घेऊन आज दीक्षित झालेली ही व्यक्ति तुमच्यासमोर आहे.'

'सत्यानाश झाला!' जीवानंद म्हणाला, 'खरं कीं काय?'

'सत्यानाश कां? आपणही दीक्षितच आहां.'

'पण तूं स्त्री आहेस!'

'कोण म्हणतं? कुणीं सांगितलं तुम्हांला?'

'मला वाटलं होतं,' जीवानंद म्हणाला, 'माझी पत्नी स्त्रीजातीची आहे.'

'पत्नी?' शांती उद्गारली, 'पत्नी आहे का आपल्याला?'

'एक होती खरी!' जीवानंद म्हणाला.

'मीं आपली पत्नी-असा का आपला समज झालाय?'

पुन्हां तसाच पदर पसरून जीवानंद मोठ्या आदबीनें म्हणाला, 'जी हां महाशय!'

'थट्टा करायची लहर आलीय वाटतं आपल्याला?' शांती म्हणाली, 'आपण काय करणार आहांत यापुढं?'

जीवानंद म्हणाला, 'आपल्या अंगावरचे कपडे जबरदस्तीनं काढून घेऊन आपली अधरसुधा चाखून पाहणार आहें.'

'कशाचं लक्षण हें? शांती म्हणाली, 'ही आपली स्वाभाविक दुष्ट बुद्धि, कीं भांग चढवायच्या बेफाम आवडीचा पुरावा? कुठल्याही स्त्रीबरोबर एका आसनावरसुद्धां बसणार नाहीं अशी शपथ केलीय ना आपण? मी स्त्री आहें असं खरोखरच जर आपल्याला वाटत असेल—दोरीला साप म्हणतात कुणीकुणी केव्हां केव्हां—तर आपण यावेळीं वेगळं आसन घेऊन खुशाल पलीकडे बसावं. आपल्याशीं बोलायची सुद्धां माझी इच्छा नाहीं.' असें म्हणून शांती पुन्हां पोथी वाचूं लागली.

जीवानंद मुकाट्यानें माघार घेऊन निराळा बिछाना टाकून झोंपी गेला.

♣

# तृतीय खंड

## — १ —

देवाच्या दयेनें १७७० साल संपलें. बंगालमधली सहा आणे लोकसंख्या—किती कोटी कोण जाणे—यमनगरीला पाठवून हें दुर्वत्सर कालाच्या उदरांत गेलें. १७७१ सालीं ईश्वर प्रसन्न झाला. पाऊस चांगला पडला, भूमीनें भरपूर धान्य दिलें. जे जिवंत राहिले होते त्यांनीं पोट भरून अन्न खाल्लें. जे कित्येक अर्धपोटीं किंवा उपासपोटीं होते त्यांना भरपूर अन्न पचलें नाहीं. कित्येक त्यामुळेंच मेले.

भूमीनें धनधान्य दिलें, पण लोकसंख्या थकली होती. गांवोगांवचीं घरें रिकामीं पडली होती आणि त्यांत कोल्ह्याकुत्र्यांनीं आसरा घेतला होता. गांवातली शेताजमीन नांगरण्यावांचून राहिली होती आणि त्यामुळें धान्याचें उत्पादन थकलें होतें—क्वचित त्या शेतांचें जंगल होऊन गेलें होतें.

बंगाल्यांत धान्य पिकत होतें, पण खायला माणसें नव्हतीं. माल होता, पण गिऱ्हाईक नव्हतें. शेती पिकत होती, पण शेतकऱ्याला पैसा मिळत नव्हता—जमीदाराचा खंड भरणें शेतकऱ्याला अशक्य झालें होतें आणि राजाचे कर देणें जमीदाराला अशक्य झालें होतें.

इकडे संतानसंप्रदाय रोज विष्णूची पूजा षोडशोपचारानें करीत होता. ज्याच्या घरीं बंदुक पिस्तुल सांपडे तिथून ते तें काढून घेऊन जात. भवानंदानें सांगितलें होतें, कीं एका बाजूला हिरेमाणकें, जडजवाहीर दिसलें आणि दुसऱ्या बाजूला एकादी मोडकी बंदूक दिसली, तर तें जडजवाहीर टाकून मोडकी बंदूक घेऊन या.

गांवोगांव त्यांचें हेर पाठवले गेले होते. ते गांवांत जात आणि हिंदू भेटला कीं त्याला विष्णुपूजा करायला सांगत. तिथलीं वीसपंचवीस माणसें गोळा करायची आणि मुसलमानांच्या घराला आगी घालायच्या, असें चाललें होतें. जिवाच्या भीतीनें मुसलमान पळत होते आणि संतान त्यांचें सर्वस्व लुटून विष्णुभक्तांना वांटून देत होते.

लुटीचा भाग मिळत असल्यामुळें गांवचे लोक खूष होऊन विष्णुमंदिरांत संतानधर्माची दीक्षा घेत होते. संतान होण्यांत लाभ आहे, असेंच सर्व लोकांना वाटूं लागलें होतें.

इतिहासांत प्रसिद्ध झालेला इंग्रज कुलांतला प्रातःसूर्य वॉरन हेस्टिंग्ससाहेब त्यावेळीं भारतवर्षाचा गव्हर्नर जनरल होता. कालिकत्यांत बसल्या बसल्या त्यानें एक लोखंडी सांखळी घडवली होती आणि त्या सांखळीनें सद्वीप, ससागरा भारतभूमी बांधून टाकायची त्यानें योजना केली होती. सिंहासनावर बसून जगदीश्वरानें एके दिवशीं खरोखरच त्याला 'तथास्तु' म्हटलें होतें कीं काय, कोण जाणे! तो काल अजून दूर होता. आजच्या काळांत मात्र संतानांच्या प्रचंड जयघोषानें वॉरन हेस्टिंग्सला कापरें भरलें होतें.

वॉरन हेस्टिंग्सनें पहिल्यानें फौजदारी सैन्य पाठवून तें बंड मोडायचा प्रयत्न केला. पण तें असें झालें, एखाद्या म्हातारीच्या तोंडचा देखील हरिनामाचा घोष ऐकला, तर फौजदारी शिपाई पळून जाऊं लागले. निरुपाय होऊन वॉरन हेस्टिंग्सनें कॅप्टन टॉमस नांवाच्या एका निष्णात सैनिकाला अधिनायक करून कंपनीचें एक भलेंमोठें सैन्य बंड मोडण्यासाठीं पाठवून दिलं.

मुक्कामावर आल्यावर कॅप्टन टॉमसनें बंड मोडण्याचे उपाय योजायला सुरवात केली. राजाचें सैन्य आणि जमीदाराचें सैन्य घेऊन कंपनीच्या सुशिक्षित आणि अत्यंत बलिष्ठ अशा हत्यारी सैन्यांत त्यानें सामील केलें. त्या साऱ्या सैन्याच्या वेगवेगळ्या तुकड्या पाडून त्या प्रत्येक तुकडीवर त्यानें अधिपति नेमले. या प्रत्येक तुकडीला देशाचा एकेक भाग नेमून दिलेला होता. त्या भागांत त्या तुकडीनें जायचें आणि तो तो भाग जाळें टाकणाऱ्या कोळ्याच्या युक्तीनें आपल्यां ताब्यांत घ्यायचा, असा त्याचा हुकूम होता. बंडखोर दिसला, कीं बेधडक कीडमुंगीसारखा चिरडून टाकायचा हुकूम त्यानें

दिला होता. कंपनीचे सैनिक कुणी गांजा, तर कुणी रम झोंकून बंदूक खांद्यावर टाकून संतानांची कत्तल करायला धावूं लागले होते.

पण यावेळीं संतानांची संख्या फारच मोठ्या प्रमाणांत वाढली होती. ते अजिंक्य झाले होते. शेतकरी कोयतीनें गवत कापीत जातो त्याचप्रमाणें टॉमसचें सैन्य ते सपासप कापून टाकीत होते. 'हरि हरि' च्या जयघोषानें टॉमसच्या कानठाळ्या बसत होत्या.

## – २ –

त्यावेळीं ईस्ट इंडिया कंपनीच्या बऱ्याचशा रेशमाच्या वखारी होत्या. शिवग्रामांत अशीच एक वखार होती. या वखारीचा अध्यक्ष डनीवर्थ नांवाचा एक साहेब होता. या वखारीच्या संरक्षणासाठीं भरपूर बंदोबस्त केलेला असल्यामुळें डनीवर्थ साहेब कसाबसा जीव धरून राहिला होता. त्याला आपलीं बायकामुलें कालिकत्याला पाठवून द्यावीं लागलीं होतीं आणि तो स्वतः संतानांपासून कसेंबसें आपलें रक्षण करीत होता.

या प्रदेशांत अशावेळीं कॅप्टन टॉमसाहेब दोनचार तुकड्या फौज घेऊन आला. या काळांत शूद्र, डोम प्रभृति खालच्या दर्जाचे संतान लूटमार करीत गाजत होते. त्यांनीं कॅप्टन टॉमसच्या रसदीवर हल्ला केला. कॅप्टन टॉमसच्या सैन्यासाठीं उत्तम तूप, मुरगी आणि तांदूळ, गाडी भरून जात असलेलें पाहून डोम, वागदी लोकांच्या या तुकडीच्या तोंडाला पाणी सुटलें. त्या गाडीवर त्यांनीं हल्ला केला. पण कॅप्टन टॉमसच्या शिपायांच्या हातच्या बंदुकांतल्या चारदोन गोळ्या खातांच ते पळून गेले.

कॅप्टन टॉमसनें लगेच कालिकत्याला रिपोर्ट पाठवला—आज आमच्या एकशेंसत्तावन शिपायांनीं चौदा हजार सातशें बंडखोरांचा पराभव केला. बंडखोरांपैकीं दोन हजार एकशें त्रेपन्न लोक मेले, एक हजार दोनशें तेहेतीस लोक जखमी झाले आणि सात जण कैद झाले.

यांतली शेवटचीच बाब काय ती खरी होती!

डनीवर्थसाहेबाच्या घरांत मटन मुर्गीची सुबत्ता होती; उत्तम प्रकारची दारू होती. नाना प्रकारचे शिकार केलेले पशुपक्षी त्याच्या जेवणाच्या टेबलावरच्या

पक्वान्नांत शोभा देत होते. भल्या मोठ्या मिशांचा बबर्जी प्रतिद्रौपदीच होता. अर्थात् मुळींच तक्रार न करतां कॅप्टन टॉमस साहेबांनीं त्याच्या घरीं ठाण मांडलें.

इकडे भवानंद: भयंकर चिडला होता. कॅप्टन टॉमससाहेबबहादुरांची मुंडी छाटून टाकायला केव्हां मिळेल असें त्याला झालें होतें. इंग्रज लोक आले होते ते भारतवर्षाच्या उद्धारासाठींच हें संतानांना त्यावेळीं पटलें नव्हतें. जिथें खुद्द कॅप्टन टॉमससाहेबांच्या समसामायिक जोडीदार इंग्रजांना याची कल्पना नव्हती, तिथें संतानांना तें कसें कळावें ?

साहेबबहादुरांना शिकारीची फार आवड होती. मधूनमधून शिवग्रामच्या शेजारच्या अरण्यांत ते शिकारीला जात असत. एके दिवशीं डनीवर्थसाहेबांबरोबर घोड्यावर बसून बरेचसे शिपाई बरोबर घेऊन कॅप्टन टॉमस शिकारीला निघाला होता. टॉमससाहेब जितका शूर, तितकाच धाडसी होता. इंग्रजांच्या जातींत त्याच्या तोडीचा शूर माणूस क्वचितच दिसून आला असता.

त्या घनदाट जंगलांत वाघ, अस्वल, रानरेडे भरपूर होते. शिकार करीत करीत तो बराच दूर गेला. पुढें जायला रस्ता नाहीं असें पाहून सारेच तिथें थांबले. डनीवर्थसाहेब एकदां याच जंगलांत एका भयंकर वाघाच्या तडाख्यांत सांपडणार होता, त्या आठवणीनें तोही पुढें जायला नाराज होता. सारेच परत जायला निघाले होते. 'तुम्ही जा हवे तर. मी येणार नाहीं.' असें म्हणून कॅप्टन टॉमस त्या घनदाट जंगलांत घुसला.

वस्तुतः त्या जंगलांत रस्ताच नव्हता. घोड्याला जायला वाटच नव्हती. घोड्यावरून खालीं उतरून साहेबानें खांद्यावर बंदूक टाकली आणि तो एकटाच जंगलांत घुसला. वाघाच्या शोधासाठीं तो इकडे तिकडे हिंडत होता, पण वाघ कुठेंच दिसून आला नाहीं.

त्यानें काय पाहिलें ! एका मोठ्या झाडाखालीं वेलींच्या झाळकींत तो कोण बसला होता !

तो एक तरुण संन्यासी होता. तो फार देखणा होता. कॅप्टन टॉमस चकित झाला—पण त्यांचवेळीं त्याला रागाचा झटका आला. त्याला देशी भाषा येत होती. त्यानें विचारलें, 'कोण तूं ?'

संन्यासी म्हणाला, 'मी संन्यासी आहे.'

कॅप्टन म्हणाला, ' तूं बंडखोर आहेस. '

' बंडखोर म्हणजे काय ? '

' मी तुला गोळी घालून ठार करीन. '

' खुशाल ठार कर. ' संन्यासी म्हणाला.

कॅप्टन क्षणभर साशंक झाला होता. गोळी घालावी कीं नाहीं असा विचार करीत असतांना त्या संन्याशानें त्याच्यावर विजेच्या वेगानें झडप घातली आणि त्याच्या हातची बंदूक काढून घेतली.

संन्याशानें आपल्या अंगावरचें हरणाचें कातडें फेकून दिलें. एका झटक्यासरशी जटा मोकळ्या करून पाठीवर केंस मोकळे सोडले. कॅप्टन टॉमसला दिसून आलें कीं ती अत्यंत सुंदर अशी स्त्री होती.

ती सुंदरी हंसत हंसत म्हणाली, ' साहेब, मी स्त्री आहे. मी कुणावरही हात टाकीत नाहीं. मी एक प्रश्न विचारतें, हिंदु मुसलमानांत मारामारी सुरू आहे, त्यांत तुम्ही मधें कां पडतां ? तुम्ही आपल्या घरीं निघून जा. '

' कोण आहेस तूं ? साहेबानें विचारलें.

शांती म्हणाली, ' मी संन्यासिनी आहें हें दिसतंय ना तुला ? ज्यांच्याबरोबर लढाई द्यायला तूं आला आहेस, त्यांतल्याच एकाची मी बायको आहे. '

साहेबानें विचारले, ' तूं माझ्या घरीं राहशील ? '

' घरीं म्हणजे कशी ? ' शांतीनें विचारलें, ' तुझी रखेली म्हणून ? '

साहेब म्हणाला, ' बायकोसारखं रहायचं—पण लग्न करायचं नाहीं. '

शांती म्हणाली, ' मलाही एक विचारायंचय—आमच्या घरीं एक माकड होतं. तें परवां मेलं. त्याचा पिंजरा मोकळा पडला. तुझ्या कंबरेला सांखळी बांधली तर तूं त्या पिंजऱ्यांत राहाशील ? तुला खूप केळीं खायला मिळतील. खूप मोठी केळ्यांची बाग आहे आमची. '

' तूं फार स्पिरिटेड वुमन दिसतेस ! ' साहेब म्हणाला, ' तुझं करेज पाहून मीं खूष झालोंय. तूं आतां माझ्या घरीं चल. तुझ्या नवरा या लढाईत मेला म्हणजे तूं काय करणार आहेस ? '

' तर मग माझंही एक सांगणं ऐक. ' शांती म्हणाली, ' दोनचार दिवसांत लढाईला तोंड लागणार. ही लढाई तुम्हीं जिंकली आणि मी हयात राहिलें तर

मीं तुझी रखेली होऊन राहीन. पण जर आमचीच जीत झाली तर तूं माकड बनून आमच्या पिंजऱ्यांत केळीं खात बसशील का ?'

'केळीं खायला फार छान असतात! साहेब म्हणाला, 'आहेत का तुझ्यापाशीं ?'

'घे, तुझी बंदुक घे' शांती म्हणाली, 'तुझ्यासारख्या जंगली माणसाबरोबर कोण बोलायला बसलंय !'

बंदूक त्याच्या अंगावर फेंकून शांती हंसत हंसत तिथून निघून गेली.

— ३ —

साहेबाला सोडून देऊन शांती जंगलांत शिरली. हरिणाच्या बचासारखी उड्या मारमारीत ती जंगलांतून जात होतीं.

त्या जागीं जंगल अगदीं घनदाट होतें. आंत कुणी राहिलें तर बाहेरच्या माणसाला तें दिसलें नसतें. शांती त्या तशा जंगलांत घुसली. त्या जागीं झाडांच्या फांद्याखालीं 'झांकून राहिलेली एक छोटीशी झोंपडी होती. तीं झाडांच्या काटक्यांनीं बांधलेली होती आणि तिचें छप्पर झाडाच्या पाल्याचेंच होतें. तिची खालची तक्तपोशी लाकडी असून मातीनें सारवलेली होती. दाराचें झडपही पालावेलीचें होतें.

त्या झोंपडीत बसून जीवानंद सारंगी वाजवीत होता.

शांतीला पाहतांच जीवानंद म्हणाला, 'इतक्या दिवसांनीं पाण्याला भरती आलीय वाटतं !'

'डबक्याला कधीं भरती का येत असते ?' शांतीनें हंसत हंसत उत्तर दिलें.

जीवानंद खिन्न होऊन म्हणाला, 'असं पहा शांती, माझ्याकडून व्रतभंग झाला आहे. माझे प्राण खर्ची पडलेच आहेत. हातून पाप घडलं त्याचं प्रायश्चित्त केलंच पाहिजे. याचपूर्वी तें केलं असतं, पण तूंच म्हटलंस म्हणून थांबलोंय. आतां लौकरच घनघोर युद्ध माजणार आहे. त्या लढाईच्या मैदानावरच हें प्रायश्चित्त घ्यायचं—प्राण सांडायचे, हें ठरलेलंच आहे. मीं मरायच्या दिवशीं—'

त्याला मधेंच थांबवून शांती म्हणाली, 'मी तुमची धर्मपत्नी आहें—सहधर्मिणी आहें—तुमच्या धर्मात तुम्हांला मदत करायला आलें आहें. अत्यंत बिकट अशा धर्माचा तुम्हीं स्वीकार केला आहे, त्या धर्मात तुम्हांला मदत करण्यासाठीं मीं घर टाकून आलें आहें—दोघांनींही एकत्र धर्माचरण करावं या उद्देशानं घर टाकून जंगलांत राहिलें आहें. प्रायश्चित्ताची गोष्ट यावेळीं कशाला ? तुम्हीं पाप केलं आहे का ? कोणत्याही स्त्रीबरोबर एका बैठकीवरसुद्धां बसायचं नाहीं, ही तुमची प्रतिज्ञा. एका बैठकीवर आपण कधींच बसलों नाहीं—मग प्रायश्चित्त कशासाठीं ? काय हें ! तुम्ही माझे गुरू, तुमचा धर्म तुम्हांला मीं का शिकवायचा ? तुम्ही वीर, वीराचं व्रत तुम्हांला मीं बायकोनं का शिकवायचं !

जीवानंद सद्गदित झाला आणि म्हणाला, 'आतां शिकवलंस तर खरं ! '

शांती उल्हसित होऊन म्हणाली, 'आणखीन् असं पहा गोसावी, या लोकचा आमचा विवाह तरी कुठं निष्फळ झालाय ? तुमचं माझ्यावर प्रेम आहे, मीं तुमच्यावर प्रेम करतें, यापेक्षां आणखी कुठलं फळ मिळालं पाहिजे आपल्याला ? बोला—वंदे मातरम्. '

आवाजांत आवाज मिसळून दोघेंही वंदे मातरम् गीत गाऊं लागलीं.

## — ४ —

भवानंद गोस्वामी एकदां शहरांत गेला होता. सरळ राजरस्ता टाकून तो एका काळोख्या गल्लींत शिरला. त्या गल्लीच्या दोन्हीं बाजूंना खूप उंच घरें होतीं. तिथें सूर्याचा प्रकाश येत होता काय तो भर दुपारीं मात्र. इतर वेळीं सर्वत्र काळोख असे.

गल्लीच्या बाजूच्या एका दुमजली घरांत भवानंदानें प्रवेश केला. खालच्या मजल्यावरच्या एका खोलींत एक साधारण प्रौढ बाई सैंपाक करीत होती, तिथें जाऊन भवानंद हजर झाला. ती बाई साधारणपणें अर्ध्या वयाची झालेली होती. वर्णानें काळीच होती. ती बिनकांठाची साडी नेसली होती. तिनें आपल्या केसांचा बुचडा भांगाजवळ गांठ मारून घातला होता.

ती सारखी भांड्यांचा ठणठणाट करीत होती, पातेल्यांत पळी वाजवीत होती, पुढें येणारे केस सारखे हातानें सारीत आपल्याशींच बडबडत होती. अशावेळीं भवानंद येऊन तिथें हजर झाला. तो म्हणाला, ' टाकरूणअक्का, प्रातःप्रणाम ! '

भवानंद पाहतांच आक्का घाबरीघुबरी होऊन कापडचोपड नीटनीटकें करूं लागली. होती पांचहात साडी. तें वस्त्र जवळजवळ कमरेभोंवतीं गुंडाळण्यांत गेलें होतें. जेमतेम अब्रू झांकण्या इतकाच पदर तिनें अंगावर घेतला होता. शक्य तितक्या लौकर आठ हात साडी विकत घ्यायचा निश्चय करून ती म्हणाली, ' कसं काय गोसावीं ठाकूर, यावं, यावं ! तुम्ही मला कसला प्रणाम करतां ? '

' माझी बडी वहिनी ना तूं ! ' भवानंद म्हणाला.

' तुम्ही म्हणतां म्हणून ! ' गौरी म्हणाली,

तुम्ही गोसावी माणूस—आमच्या लेखीं देवासारखे. बरं बरं, आतां प्रणाम केलातच आहां तेव्हां म्हणतें—चिरंजीव व्हा. तसं म्हटलं तर त्यांत कांहीं बिघडलं नाहीं. मी तशी वयानं मोठीच आहें. '

भवानंदापेक्षां गौरीदेवी चांगली पंचवीस वर्षांनीं वडील होती. पण चतुर भवानंद म्हणाला, ' असं कसं म्हणतेस आक्का ! मी तुला आपलं ' आक्का ' म्हणतों म्हणून—तसं हिशेब करून पाहिलं तर तूं माझ्यापेक्षां सहा वर्षांनीं लहान आहेस. तुला नाहीं आठवत ? आम्हां वैष्णव लोकांत लहान मोठीं माणसं आहेतच कीं नाहीं ! त्यांतून वैष्णवच आम्ही. मठपतीला सांगून तुझा पुनर्विवाहच लावून दिला असता. हेंच सांगायला आलों होतों मी. '

' काय बोलतां हें ? ' गौरी म्हणाली, ' असं भलतंच बोलूं नये. मी विधवा आहें ना ? '

' म्हणूनच तुझा पुनार्विवाह लावायचा. ' भवानंद म्हणाला, ' पुनर्विवाह लावतात तो विधवेचाच ना ? '

' काय वाटेल तें कर बाबा ! ' गौरी म्हणाली, ' तुम्ही आहांत पंडीत. मी एक बायकोमाणूस—मला काय कळतंय ? मग केव्हां लावणार आहेस पुनर्विवाह माझा ? '

भवानंदाला हंसूं लोटलें होतें. तें कसेंबसें आवरीत तो म्हणाला, ' आमच्या ब्रह्मचाऱ्यांची आणि तुझी गांठ पडली, कीं तें सहज होऊन जाईल. बरं बरं, आतां सांग, ती कशी काय आहे ? '

गौरीला वाईट वाटलें एकंदरींत ती पुनर्विवाहाची गोष्ट म्हणजे थट्टाच होती तर ! ती म्हणाली, ' ती काय असायची ? जशी आहे तशी आहे. '

भवानंद म्हणाला, ' एकदां जाऊन ती कशी काय आहे, तें पाहून ये तर खरी. तिला सांग, म्हणावं मीं आलों आहें—मला भेटायचं आहे.'

गौरीदेवीनें भाताची हंडी खालीं उतरून ठेवली आणि हात धुऊन घेऊन जिन्याच्या पायऱ्या घडाघडा चढत ती वरच्या मजल्यावर गेली. तिथें एक खोलींत एक फाटक्या चटईवर एक सुंदर स्त्री बसली होती. तिच्या सौंदर्यावर एक प्रकारची काळी छाया आलेली दिसत होती. तिचें मुळचें तेज ओसरलें होतें.

तिच्या आजुबाजूला दोनतीन ताडपत्राच्या पोथ्या पडल्या होत्या. खुंटीवर जपाची माळ टांगलेली होती. भिंतीवर मधून मधून जगन्नाथ, बलराम, सुभद्रा, कालियामर्दन, वस्त्रहरण, गोवर्धनधारण प्रभृति कृष्णलीलेंतलीं चित्रें काढलेली होतीं. गौरीच्या सांगण्यावरून भवानंद त्या खोलींत आला आणि म्हणाला, ' कसं काय कल्याणी, प्रकृति ठीक आहे ना ? '

' किती दिवस हा प्रश्न विचारणार तुम्हीं ? ' कल्याणी म्हणाली, ' माझी प्रकृति नीट असल्याचं तुम्हांला काय किंवा मला काय,—काय होय ? '

' जो झाड लावतो तोच त्याला रोज पाणी घालतो.' भवानंद म्हणाला, झाड मोठं वाढलं, कीं त्याला समाधान वाटतं. तुझ्या मृतदेहांत मीं जीवनाचं बीज रोवलं, तें वाढतंय कीं नाहीं, तें विचारायला नको का ? '

' विषवृक्ष कधीं मरतो का ? ' कल्याणी म्हणाली.

' जीवन म्हणजे विष का ? ' भवानंदानें विचारलें.

कल्याणी म्हणाली, ' जीवन म्हणजे विष नसतं, तर अमृत ढाळून मी त्याचा नाश करायला कां सरसावलें असतें ? !

' तेंच विचारावं असं मला सारखं वाटत होतं. पण विचारायचा धीर होत नव्हता. कुणी तुझं जीवन विषमय केलं ? '

कल्याणीनें शांतपणें उत्तर दिलें, ' कुणींच माझं जीवन विषमय केलं नव्हतं. जीवनच मुळीं विषमय आहे. माझं जीवन विषमय आहे, आपलं जीवन विषमय आहे, सर्वांचंच जीवन विषमय आहे. '

' खरोखरच कल्याणी, ' भवानंद म्हणाला, '—माझं जीवन विषमय झालंय. ज्या दिवसापासून—बरं बरं, तुझा व्याकरणाचा अभ्यास कितीसा झाला ? '

' मुळींच नाहीं. '

' आणि अभिधान ? '

' मला नाहीं आवडत तें. '

भवानंद म्हणाला, ' विद्याव्यासंगाबद्दल तुला उत्कंठा असलेली दिसत होती, आतां ही अश्रद्धा कां उत्पन्न झाली ? '

कल्याणी म्हणाली, ' आपल्यासारखे महापंडित देखील जर पापाला प्रवृत्त होतात, तर विद्यासंपादन न केलेलीच बरी. माझ्या पतीची कांहीं खबर मिळालीय का महाराज ? '

' पुन्हां पुन्हां हाच प्रश्न कां करतेस ? ' भवानंद म्हणाला, ' तो तर तुझ्या लेखीं मेल्यासारखाच आहे. '

' नाहीं ! ' कल्याणी म्हणाली, ' त्यांच्या लेखीं मीं मेलेलीं आहें, माझ्या लेखीं ते नव्हत. '

' तुझ्या लेखीं तो मेल्यागत व्हावा म्हणूनच ना तूं जीव दिलास !' भवानंद म्हणाला, ' पुन्हां पुन्हां तेंच कशाला विचारतेस कल्याणी ? '

' मेल्यानं काय संबंध तुटतो ? ' कल्याणी, म्हणाली ' कसे आहेत ते ? '

' खुशाल आहेत. ' भवानंद म्हणाला.

' कुठें आहेत ते ? पदचिन्ह गांवीं ?

' तिथंच आहेत. '

' काय करताहेत तिथं ?

' भवानंद म्हणाला, ' जें करीत होते तेंच. गड उभारताहेत, शस्त्रं घडवताहेत. त्यांनीं तयार केलेलीं शस्त्रं आज हजारोंहजार संतान वापरताहेत. त्यांच्याच कृपेनं तोफ, बंदूक, दारूगोळा या वस्तूंचा अभाव आतां आम्हाला जाणवत

नाहीं. सर्व संतानांत तो श्रेष्ठ होऊन बसला आहे. फार मोठे उपकार झाले आहेत त्यांचे आमच्यावर. आज संतानांचे ते उजवा हात आहेत.'

कल्याणी म्हणाली, 'माझ्या सुकुमारीची कांहीं खबर मिळवलीय का तुम्हीं ?

'बरेच दिवसांत तिची खबर कळली नाहीं.' भवानंद म्हणाला, 'जीवानंदाला अलीकडे त्या बाजूला जायला सवड झाली नाहीं.'

'तिची खुशाली काढून मला कळवाल का ?' कल्याणी म्हणाली, 'आतां पती मला वर्ज्य आहेत. आतां जगलेंच आहे, तर मुलीला कां टाकून देऊं ? यावेळीं माझी सुकुमारी मला मिळाली, तर या जीवनांत तेवढंच समाधान मिळेल मला. माझ्यासाठीं एवढी तसदी घ्याल का ?'

'अगदीं अवश्य !' भवानंद म्हणाला, 'तुझी मुलगी तुला आणून देईन—पण त्यानंतर ?'

'त्यानंतर काय ठाकूर ?' कल्याणीनें विचारलें.

'नवरा आणून द्यायला सांगणार आहेस ?'

'आपखुषीनं मी त्यांचा त्याग केला आहे.'

'आणि त्यांचं व्रत संपूर्ण झालं तर ?'

'तर मी त्यांचीच होईन.' कल्याणी म्हणाली, 'मी जिवंत आहें हें माहीत आहे का त्यांना ?'

'नाहीं.' भवानंद म्हणाला.

'आपली अन् त्यांची कधीं भेट होते का ?'

'माझ्याबद्दल कांहीं बोलतात का ?'

'मुळींच नाहीं.' भवानंद म्हणाला, 'मरून गेलेल्या स्त्रीचा तिच्या नवऱ्याशीं संबंध कसला ?'

'पण ते विचारतात का कांहीं ?'

भवानंद म्हणाला, 'तुला पुन्हां लग्न करतां येईल. तुझा पुनर्जन्म झाला आहे.'

'माझी मुलगी आणून द्याल का मला ?'

'खास आणून देईन.' भवानंद म्हणाला, 'तुला पुन्हां लग्न करता येईल.'

'तुमच्याबरोबर का ?'

'मीं तसंच म्हटलं तर ?'

'मग तुमचा संतानधर्म कुठं जाणार?'

'समुद्राच्या तळाला!'

'आणि परलोकाचं काय?' आणि तुमचं हें महाव्रत? कल्याणीनें विचारलें, 'अन् हें तुमचं नांव—भवानंद?'

'तेंही समुद्राच्या तळाला!'

कल्याणीनें विचारलें, 'हें सारं कांहीं समुद्राच्या तळाला नेऊन बुडवतांहा तें कशापायीं?'

'तुझ्यापायीं!' भवानंद म्हणाला, 'असं पहा, मनुष्य असो, ऋषि असो, सिद्ध असो, कीं देवता असो, त्याचं मन अनावर असतं. संतानधर्म म्हणजे माझा प्राण-पण आज तुला पहिल्यानंच सांगतों, कीं तूं माझ्या प्राणाचाही प्राण आहेस. ज्या दिवशीं मीं तुला प्राणदान दिलं, त्याच दिवसापासून मीं तुझ्या पायतळीं विकला गेलों.

आज चार वर्षं हा प्राणसुद्धां जळतो आहे. भडका—कल्याणी, भडका होतोय या जीवाचा! ज्वाळा पेटताहेत. त्या पेटत ठेवायला हवं तें इंधन माझ्यापाशीं नाहीं. आतां प्राण जाऊं पाहताहेत. चार वर्षं सहन केलं, आतां असह्य झालंय. तूं माझी होशील?'

कल्याणी म्हणाली, 'जो इंद्रियांच्या आहारीं जातो, त्याला संतानधर्मानं मृत्यूचं प्रायश्चित्त सांगितलं आहे असं तुमच्याच तोंडून मीं ऐकलं होतं. खरं आहे ना तें?'

'अगदीं खरं आहे.' तो म्हणाला.

'तर मग मृत्यु हेंच तुमचं प्रायश्चित्त?'

'हो.' भवानंद म्हणाला, 'त्याला एकच प्रायश्चित्त—मृत्यु!'

कल्याणीनें विचारलें, 'मीं तुमची इच्छा पुरी केली तर तुम्हीं जीव द्याल?'

'खात्रीनं जीव देईन.' भवानंद म्हणाला.

'मीं तुमची इच्छा केव्हांही पूर्ण करणार नाहीं.' कल्याणी म्हणाली, 'तुम्ही केव्हां जीव देणार आहांत?'

'आगामी लढाईत.' भवानंद म्हणाला.

'तर मग आतां निरोप द्या.' कल्याणी म्हणाली, 'माझी मुलगी मला आणून देणार आहां का?'

आसवें भरलेल्या डोळ्यांनीं भवानंद म्हणाला, 'देईन!—मी मरून गेलों तरी माझी आठवण ठेवशील ना?'

'ठेवीन.' कल्याणी म्हणाली, 'व्रतभ्रष्ट झालेला अधर्मी म्हणून सदोदित तुमची आठवण ठेवीन.'

भवानंद निघून गेला.

कल्याणी पोथी घेऊन वाचूं लागली.

## — ५ —

विचार करीत करीत भवानंद मठाकडे निघाला होता. जातां जातां रात्र झाली. तो एकटाच जात होता. तो एकटाच जंगलांत शिरला. त्या जंगलांत कुणीतरी एक माणूस त्याच्या पुढें पुढें जात असल्याचें त्याला दिसून आलें. भवानंदानें विचारलें, 'कोण आहे तें?'

पुढें जाणारा माणूस म्हणाला, 'विचारलंत म्हणूनच उत्तर देतों. मी वाटसरू आहे.'

भवानंद म्हणाला, 'वंदे—'

'मातरम्!' तो माणूस म्हणाला.

'मीं भवानंद गोसावी.'

'मीं धीरानंद.' तो म्हणाला.

'कुठं गेला होतास धीरानंद?'

'तुमच्याच शोधासाठीं.'

धीरानंदानें विचारलें, 'तुम्ही शहरांत गेलां होतां?'

'हो.'

'गौरीदेवीच्या घरीं? गौरीदेवीच्या घरीं एक सुंदर स्त्री राहाते आहे का?'

भवानंद आश्चर्यचकित झाला—तसाच थोडासा घाबरलाही. तो म्हणाला, 'हें काय बोलतोयस तूं?'

'तुम्ही जाऊन तिला भेटलां होतां ! त्या तरुणीवर तुम्ही भारीच अनुरक्त झालां आहां !'

क्षणभर विचार करून भवानंद म्हणाला, 'हा पाठपुरावा कां चाललाय धीरानंद ? बरं तर, सांगतों. तूं म्हणतोयस तें सारं खरं आहे. तुझ्याखेरीज दुसऱ्या कुणाला ही गोष्ट माहीत झालीय का ?'

'कुणालाही नाहीं.' धीरानंद म्हणाला.

भवानंद म्हणाला, 'तर मग मी तुझा जीव घेतला कीं या कलंकांतून मी मुक्त होईन—होय ना ?'

धीरानंद म्हणाला, 'अगदीं बरोबर !'

'ये तर मग.' भवानंद म्हणाला, 'या निर्जन जागीं आपण दोघेही द्वंद्व-युद्ध करूं. शस्त्र आहे तुझ्याजवळ ?'

'आहे.' धीरानंद म्हणाला, 'रिकाम्या हातानं कुणाची छाती आहे या गोष्टी बोलायची ? युद्धच करावं असं जर तुला वाटत असेल, तर मीं तें अवश्य करीन. संतानांसंतानांत विरोध निषिद्ध आहे, पण स्वसंरक्षणासाठीं कुणाशींही विरोध करणं निषिद्ध नाहीं ! तरीपण जें कांहीं तुला सांगावं म्हणून मीं तुला शोधीत होतों, तें सारं ऐकून घेतल्यावर मग आपण लढलों तर बरं नाहीं का व्हायचं ?'

'कांहीं हरकत नाहीं.' भवानंद म्हणाला, 'आतां बोल.'

म्यानांतून तरवार बाहेर काढून धीरानंद पळून जाऊं नये म्हणून भवानंदानें ती त्याच्या खांद्यावर ठेवली.

'मीं आतां असं सांगत होतों,' धीरानंद म्हणाला, 'तूं कल्याणीशीं विवाह कर.'

'कल्याणी !' भवानंद उद्गारला, 'तुला नांवसुद्धां माहीत आहे तिचं ?'

धीरानंदानें विचारलें, 'विवाह कां करीत नाहींस तिच्याबरोबर ?'

'तिचा नवरा हयात आहे.'

धीरानंद म्हणाला, 'वैष्णवांत तसे विवाह होतात.'

'ते बोडक्या वैष्णवांत.' भवानंद म्हणाला, 'संतानांत नव्हे. संतानांत विवाहच होत नाहींत.'

धीरानंद म्हणाला, 'इतका जीवावर उदार झालास तो संतानधर्मच कां टाकीत नाहींस ?—छे : माझा खांदा कापला ना !' धीरानंदाच्या खांद्यांतून रक्त वाहूं लागलें होतें.

'अधर्माकडे माझी प्रवृत्ति व्हावी याच उद्देशानं का तूं आला आहेस ?' भवानंद म्हणाला, 'यांत तुझा कांहीं स्वार्थ आहे का ?'

'तेंच बोलायचंय मला.' धीरानंद म्हणाला, 'ती तरवार काढून घे पाहूं आधीं. या संतानधर्माच्या पायीं मीं अगदीं वेजार झालोंय. या धर्माचा त्याग करून बायकामुलं घेऊन सुखानं संसार करायला मीं अगदीं उतावीळ झालोंय. हा धर्म मीं आतां सोडणार. पण घरीं जाऊन बसणं शक्य आहे का ? जिकडे तिकडे मला बंडखोर म्हणून ओळखतात. घरीं जाऊन बसलों तर एक तर सरकारी शिपाई माझा जीव घेतील, नाहींतर संतान लोक मीं विश्वासघातकी म्हणून मला मारून टाकून निघून जातील. एवढ्या-साठींच तूंही माझ्याबरोबर यावंस असं मीं सुचवतोंय ?'

'कां ? मीं कशाला हवा आहें तुझ्याबरोबर ?'

'महत्त्वाची गोष्ट आहे ती तीच.' धीरानंद म्हणाला, 'हें सारं संतानांचं दल आहे तुझ्या हुकमतीखालीं—सत्यानंद सध्यां इथं नाहींत. तूंच आहेस इथला प्रमुख. हें सैन्य घेऊन तूं शत्रूंवर चाल करून जा. तुझाच जय होईल ही माझी खात्री आहे. या लढाईंत तुला जय मिळाला तर 'राजा' म्हणून तूं स्वतःच्या नांवाची द्वाही फिरव. सैन्य तर तुझ्या ताब्यांतच आहे. तूं राजा हो, कल्याणी तुझी राणी होईल, आणि तुझ्या पायावर पाऊल टाकून मीही माझी बायकामुलं घेऊन सुखानं संसार करीत तुला आशीर्वाद देईन. जाईना कां हा संतानधर्म समुद्राच्या तळाला ?'

धीरानंदाच्या खांद्यावरची तरवार भवानंदानें हळूहळू खालीं घेतली. तो म्हणाला, 'धीरानंद, चल लढ माझ्याबरोबर. मीं तुझी मुंडी उडवणार. मीं इंद्रियांच्या आहारीं गेलों असलों तरी विश्वासघातकी होणार नाहीं. मीं विश्वास-घातकी व्हावं म्हणून तूं मला उपदेश करीत होतास, पण तूं स्वतःच विश्वास-

घातकी आहेस. तुला मारण्यानं ब्रह्महत्या होणार नाहीं. मीं तुझा जीव घेणार !'

त्याचें भाषण पुरें व्हायच्यापूर्वीच धीरानंद धापा टाकीत पळून गेला. भवानंदानें त्याचा पाठलाग केला नाहीं कांहीं वेळपर्यंत तो सुन्न होऊन राहिला होता. जेव्हां तो धीरानंदाला शोधायला गेला त्यावेळीं तो त्याला सांपडला नाहीं.

— ६ —

मठांत न जातां भवानंद त्या घनदाट जंगलांत शिरला. त्या जंगलांत एका जागीं एका फार मोठ्या इमारतीचा पडका भाग होता. त्या पडीक इमारतीवर गवत आणि झुडपें दाट उगवलीं होतीं. त्या जागीं सापांनीं आपली राहायची जागा केली होती. त्या पडलेल्या इमारतीचा एक भाग मात्र शाबूत होता. ती स्वच्छ करून राखलेला दिसत होता. भवानंद त्या जागीं जाऊन बसला आणि विचार करूं लागला.

काळोख अगदीं मिट्ट पडला होता. त्यांत तें जंगल अगदीं अफाट होतें, घनदाट होतें, जनशून्य होतें. झाडापेडांची तिथें इतकी गर्दी झाली होती, कीं जंगली जनावरांना देखील तिथून वाट काढणें अशक्य झालें असतें. या निर्जन अंधकारांत भवानंद एकटाच बसून राहिला होता.

त्याच्या लेखीं पृथ्वी आतां नष्टप्राय झाली होती—नुसतें भीतीचें कारण होऊन बसली होती. एवढीसुद्धां हालचाल न करतां तो कपाळावर हात ठेवून आपल्याशीच बोलत होता, 'जें व्हायचं असं ठरून गेलंय, तें होणारच. गंगेच्या झपाटेबंद प्रवाहांत हत्तीदेखील एकाद्या ढलपीसारखा वाहून जातो, तसाच इंद्रियांच्या प्रवाहांत मींही वाहून गेलों, याचंच दुःख मला वाटतंय. एका क्षणांत देहाचा नाश करतां येईल—देहाचा नाश म्हणजे इंद्रियांचा नाश. त्या असल्या क्षणभंगुर इंद्रियांच्या आहारीं मीं कसा गेलों ! आतां मरणच श्रेयस्कर ! धर्मत्यागी कसा झालों ? छेः छेः आतां मेलंच पाहिजे.'

धर्माच्या ठायीं माझी श्रद्धा राहूं दे. पापापासून मला परावृत्त कर. हे गुरुदेव धर्माच्या ठायीं माझी मति स्थिर होऊं दे.

त्या भयाण जंगलांतून अत्यंत मधुर असा मानवाचा मर्मभेदी आवाज ऐकूं आला. कुणीं तरी म्हटलें, 'धर्माच्या ठायीं तुझी मति राहील—माझा आशीर्वाद आहे हा.'

भवानंदाच्या देहांवर रोमांच उभे राहिले. तो उद्गारला, 'हें काय! हा तर गुरुदेवांचा आवाज! महाराज, कुठं आहां आपण? यावेळीं या दासाला दर्शन द्या!'

पण कुणीं दर्शन दिलें नाहीं, कीं उत्तरही दिलें नाहीं. भवानंद पुन्हां पुन्हां हांका मारीत होता, पण उत्तर मिळत नव्हतें. इकडे तिकडे त्यानें खूप शोधून पाहिलें, पण कुठेंच कुणी सांपडलें नाहीं.

रात्र संपली, प्रभात झाली, सूर्य वर येऊं लागला. त्या अरण्यांतल्या झाडांच्या शेंड्यावर सूर्याचे किरण चमकूं लागले त्यावेळीं भवानंद येऊन मठांत शिरला. येतांक्षणींच त्याच्या कानांत शब्द आले,—'हरे मुरारे! हरे मुरारे!'

त्यानें ओळखलें. हा सत्यानंदाचाच आवाज. प्रभू फिरून आले होते.

जीवानंद त्या झोपडींतून बाहेर गेल्यानंतर शांतीदेवी हातीं सारंगी घेऊन गाऊं लागली :—

प्रलय प्रयोधिजले धृतवानसि वेदम् ॥
विहितवहित्र चरित्रमखेदम् ।
केशवधृत मीनशरीर ॥
जय जगदीश हरे ॥

कवी जयदेवाच्या स्फूर्तीतून निर्माण झालेलें तें मधुर स्तोत्र शांतीदेवीच्या कंठांतून राग-ताल-लयबद्ध बाहेर निघत होतें. त्या अफाट जंगलांतील अनंत स्तब्धता त्या गायनानें भंग पावत होती.

त्या काळीं बाहेरून कुणीतरी गंभीर स्वरांत गायला सुरवात केली. तो आवाज मेघगर्जनेसारखा गंभीर होता :—

म्लेंच्छ निवहनिधने कलयसि करवालम् ।
धूमकेतुमिव किमपि करालम् ॥
केशवधृत कल्किशरीर ।
जय जगदीश हरे ॥

2-8-58 1432 9-1-5

शांतीनें भक्तिभावानें सत्यानंदाच्या पायावर मस्तक ठेवलें. ती म्हणाली, ' प्रभो, असं कुठलं माझं भाग्य, कीं त्यामुळं आपल्या चरणाचं मला इथं दर्शन झालं ? मला आज्ञा करा—मीं काय केलं पाहिजे ? '

सत्यानंद म्हणाले, ' मुली, तुझं कुशलच होईल. '

' तें कसं शक्य आहे ठाकूर ! ' शांती म्हणाली, ' तुमच्या आज्ञेनं मला वैधव्य प्राप्त व्हायचं हें तर ठरलेलंच आहे. '

' मुली, मीं तुला ओळखलं नव्हतं. ' सत्यानंद म्हणाले, ' दोरीची ताकद न ओळखतां मीं ती जास्त ताणली. तूं माझ्यापेक्षांही ज्ञानी आहेस. याचा उपाय आतां तूंच कर. मला सारं कांहीं कळलं आहे हें तूं जीवानंदाला कळूं देऊं नकोस. तुझ्या आकर्षणामुळं आजवर त्यानं जीव धरून ठेवला आहे, तसाच तो पुढंही धरून ठेवतां येईल त्याला. एवढं झालं म्हणजे माझं कार्य यथास्थित पार पडेल. '

शांती रागाला येऊन म्हणाली, ' हें काय ठाकूर ! माझा पति आणि मीं म्हणजे एकच आत्मा. तुमचं माझं जें जें कांहीं बोलणं झालं आहे तें तें मी त्यांना सांगणार. मरावंच असं वाटलं तर ते जीव देतील–त्यानं माझं काय नुकसान होणार ? मीं सुद्धां त्यांच्याबरोबरच देह ठेवीन. त्यांनाच तेवढा स्वर्ग मिळेल अन् मला मिळायचा नाहीं, असं का तुम्हांला वाटतं ? '

सत्यानंद म्हणाला, ' आजपर्यंत मीं कधीं हार खाल्ली नव्हती. आज तुझ्या-समोर मीं हरलों. आई, मीं तुझं लेंकरूं आहें. या लेंकरावर दया कर. जीवानंदाच्या प्राणाचं रक्षण कर. तुझेही प्राण जाऊं देऊं नकोस, तरच माझं कार्य यशस्वी होईल. '

वर आकाशांत बिजली कडाडून हंसली.

शांती म्हणाली, ' माझ्या पतीचा धर्म आहे त्यांच्याच हातीं—त्यांच्या धर्मांपासून त्यांना परावृत्त करणारी मी कोण ? इहलोकीं पति हा स्त्रीचा देव—पण परलोकीं सर्वांचाच देव—धर्म. माझ्या दृष्टीनं माझा पति माझ्यापेक्षां मोठा, त्यापेक्षां माझ्या धर्मावर मला केव्हांही पाणी सोडतां येईल—माझ्या पतीच्या धर्मावर कां मीं जलांजली देऊं ? तुमच्या अनुज्ञेप्रमाणें माझा पति मरणार असेल तर खुशाल मरूं दे-मीं त्याला नको म्हणणार नाहीं. '

एक मोठा सुस्कारा सोडून सत्यानंद म्हणाला, 'मुली, या घोर व्रताचं मुख्य अंग म्हणजे बलिदान. आम्हां सर्वांनाच हें बलिदान करणं भाग आहे. मीं मरून जाईन–जीवानंद भवानंदही मरून जातील–कदाचित तूंही मरून जाशील–पण एक ध्यानांत ठेव मुली, कांहींतरी कार्य करीत मेलं पाहिजे. निष्कारण जीव देण्यांत काय अर्थ ? मीं सदोदित माझ्या देशालाच 'आई' म्हटलं, दुसऱ्या कुणालाही कधीं 'आई' म्हटलं नाहीं. या सुजला धरणीशिवाय आम्हीं पोरकेच आहों–नाहीं का ? आणि आतां तुलाही आईच म्हटलं,–आई या नात्यानं या संतानांचं कार्य तूं कर–ज्या योगेंकरून हें कार्य यशस्वी होईल, तेंच कर ! जीवानंद जगला पाहिजे, तूंही जगली पाहिजेस.'

एवढेंच बोलून सत्यानंद 'हरे मुरारे मधुकैठभारे' गातगात निघून गेले.

— ८ —

सत्यानंद आल्याची बातमी संतानसंप्रदायांत चोंहीकडे पसरली. साऱ्या संतानांना त्यांनीं आमंत्रण धाडलें होतें. ते त्यांना कांहींतरी विशेष सांगणार होते.

चोंहीकडून गटागटांनीं संतान मंडळी नदीकांठी येऊन गोळा होऊं लागली. त्या नदीच्या वाळवटांत दहा हजार संतान गोळा झाले. सत्यानंदांच्या आगमनानें आनंदित होऊन ते सारखा जयजयकार करीत होते.

सत्यानंद कोणत्या कामासाठीं आणि कुठें गेले होते तें साऱ्यांनाच कांहीं माहित नव्हतें. संतानांना विजयप्राप्ती व्हावी म्हणून तपश्चर्या करण्यासाठीं ते हिमालयांत गेले होते असा प्रवाद होता. जो तो एकमेकांच्या कानाला लागून म्हणत होता, 'महाराजांची तपःसिद्धि झाली आहे. आतां आमचं राज्य होणार.'

आपलें राज्य होणार या कल्पनेनें बेभान होऊन 'धरा, मारा, म्लेंच्छांचा नाश करा !' म्हणत सारेच ओरडत होते. कुणी म्हणत होते, 'जय सत्यानंद महाराज की जय !' कुणी गात होते, 'हरे मुरारे मधुकैठभारे !' कुणीकुणी तर 'वंदे मातरम्' गीताचा घोष करीत होते.

सत्यानंद आले आणि त्या जमलेल्या संतान मंडळीच्यामध्यें उभे राहिले. त्यांच्या डोळ्यांतून आसवांचा झरा वहात होता. दोन्ही बाहू उभारून उच्च स्वरानें सत्यानंद म्हणाले,—

५.३२५

'शंखचक्रगदापद्मधारी तो वैकुंठनाथ, वनमाली, तो केशीमथन, मधुमुरनरक—विनाशन, लोकपालक श्रीहरी तुमचं मंगल करो. तुमच्या बाहूंच्या ठायीं तो बल देवो. मनाच्या ठायीं भक्ति देवो. धर्माच्या ठायीं मति देवो. आतां तुम्ही सर्व मिळून एक कंठानं त्याच्या स्तोत्राचं गायन सुरू करा.'

त्यावेळीं हजारों हजार कंठांनं तो गीतध्वनी निघूं लागला—

**जय जगदीश हरे**
**प्रलयपयोधिजले धृतवानसि वेदम् ।**
**विहितवहित्र चरित्रमखेदम् ।**
**केशवधृत मीनशरीर ।**
**जय जगदीश हरे ॥**

सत्यानंदांनीं त्यांना पुन्हां आशीर्वाद दिला आणि बोलायला सुरवात केली—'हे संतानगणहो, आज एक महत्त्वाची गोष्ट तुम्हांला सांगण्यासाठीं मीं मुद्दाम इथं आलों आहें. टॉमस या नांवाच्या एका विधर्मी दुरात्म्यानं बऱ्याचशा संतानांचा नाश केला आहे. आज रात्रीं आपण त्याचा सैन्यासह वध करणार. ही जगदीश्वराची आज्ञा आहे. बोला, तुमचं काय म्हणणं आहे?'

हरिध्वनीच्या गजरानें तें जंगल दणाणून गेलें. 'आतांच मारूं—कुठं आहेत ते? दाखवून द्या ते आम्हांला—मारा! मारा! दुष्मनांना जिवें मारा!' अशा आरोळ्या पलीकडल्या डोंगरावरसुद्धां प्रतिध्वनित झाल्या. त्यावेळीं सत्यानंद म्हणाले, 'या कार्यासाठीं आपण थोड्याशा धैर्यानं चाललं पाहिजे. शत्रूपाशीं तोफा आहेत—तोफांशिवाय त्यांच्याबरोबर लढाई करणं शक्य नाहीं. ती शूरांची जात आहे. पदचिन्ह गांवच्या किल्ल्यांतून सतरा तोफा निघाल्या आहेत, त्या इकडे येऊन पोंचतांक्षणींच आपण लढाईच्या मोहिमेवर निघूं. पहा, प्रभात होत आहे—इतक्यांत आपण—हें काय?—हें काय?—'

धुड्डुम्—धुड्डुम् धाड्!

चारी दिशांकडून त्या जंगलांत तोफेचे आवाज ऐकूं येऊं लागले. त्या इंग्रजांच्या तोफा होत्या.

जाळ्यांत सांपडलेल्या माशांप्रमाणे कॅप्टन टॉमसनें संतानसंप्रदायाला त्या जंगलांत घेरून नष्ट करावयाचा तो उपक्रम केला होता.

' धुडुम् धुडुम् धाड्—' इंग्रजांच्या तोफेनें हांक फोडली. त्या आवाजानें सारें जंगल हादरलें.—प्रतिध्वनि झाला, ' धुडुम् धुडुम् धाड्. '

सत्यानंदानें हुकूम सोडला. ' पहा बरं, ही कुणाची तोफ ? '

कांहीं संतान लगेच घोड्यावर बसून पळत सुटले. जंगलाच्या बाहेर ते थोडेसे गेले नाहींत तोंच श्रावणाच्या पावलासारखा गोळ्यांचा वर्षाव त्यांच्या अंगावर होऊं लागला. घोड्यासकट ते सारे खालीं मरून पडले.

सत्यानंदांनीं तें दुरून पाहिलें. ते म्हणाले, ' उंचशा झाडावर चढून पहा बरं. '

त्यानीं सांगायच्या पूर्वीच जीवानंद झाडावर चढला होता. झाडाच्या शेंड्यावरून नुकत्याच फुटलेल्या तांबड्याच्या प्रकाशांत जें दिसलें तें पाहून त्यानें वरून ओरडून सांगितलें, ' तोफ इंग्रजांची. '

सत्यानंदानें विचारलें, ' घोडेस्वार कीं पायदळ ? '

' दोन्हीही आहेत. '

' किती आहेत ? ' सत्यानंदानें विचारलें.

' नीटसा अंदाज करतां येत नाहीं. जंगलाच्या आडून ते नुकतेच बाहेर पडताहेत. '

' गोरे आहेत, कीं नुसतेच शिपाई आहेत ? '

' गोरे आहेत. ' जीवानंद म्हणाला.

त्यावेळीं सत्यानंदानें जीवानंदाला झाडावरून खालीं उतरायला सांगितलें. जीवानंद खालीं उतरला.

सत्यानंद म्हणाले, ' आज इथं दहा हजार संतान हजर आहेत. काय करतां येईल तें पहा. आज तूं सेनापती. '

हत्यारबंद होऊन जीवानंद एका उडींत घोड्यावर चढला. त्यानें नवीनानंद गोस्वामीकडे पाहिलें. त्याला त्यानें डोळ्यांनीं कसली खूण केली ती कुणाला कळली नाहीं. नवीनानंदानेंही डोळ्यांच्या खुणेनें जें उत्तर दिलें तेंही कुणाला कळलें नाहीं. दोघांनाही मनांतल्या मनांत कळून चुकलें, कीं ही या जन्मांतली शेवटची भेट. बाहू उभारून नवीनानंद सर्वांना उद्देशून ओरडला, ' भाई हो, आतां यावेळीं गा, ' जय जगदीश हरे. ' '

त्यावेळीं त्या दहा हजार कंठांतून एका आवाजांत नदीजंगल दणाणून टाकणारा, तोफेचा आवाज देखील नाहींसा करणारा जयघोष उठला.

याचवेळीं त्या जंगलांत संतान संप्रदायावर इंग्रजांच्या गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. कित्येक जणांचे गातांगातांना हात तुटले, डोकीं तुटलीं, काळीज फुटलें, सारे जमिनीवर कोसळले, तरी गीतघोष बंद झाला नाहीं. सारे गात होते—
' जय जगदीश हरे.'

तो घोष समाप्त होतांच सारे एकदम स्तब्ध झाले. त्या घनदाट जंगलांत, नदीच्या वाळवंटांत, त्या अफाट प्रदेशांत जिकडे तिकडे गंभीर स्तब्धता पसरली. केवळ तो तोफेचा भयानक आवाज आणि गोऱ्यांच्या घोड्यांच्या टापा फार दुरून ऐकूं येत होत्या.

त्या गंभीर निःस्तब्धतेंतून सत्यानंद मोठ्यानें हांक फोडून म्हणाले, ' जगदीश हरी तुमचं रक्षण करो ! तोफ किती अंतरावर आहे ? '

झाडावरून एकजण बोलला, ' या जंगलाच्या अगदीं जवळ ! एक छोटंसं पठार ओलांडायचं तेवढं राहिलं आहे.'

सत्यानंदांनीं विचारलें, ' कोण तूं ?

' मी नवीनानंद.' वरून उत्तर आलें.

सत्यानंद म्हणाले, ' तुम्ही दहा हजार आहांत. आज तुमचाच जय होणार. तोफ छिनावून घ्या ! '

घोड्यावर स्वार होऊन पुढें चाललेला जीवानंद ओरडला, ' या माझ्याबरोबर.'

ते सारे दहा हजार संतान—कुणी घोडेस्वार, कुणी पायदळ—बेछूट जीवानंदाच्या मागोमाग चालले. पायदळ सैनिकांच्या खांद्यावर बंदूक, कमरेला तरवार आणि हातांत भाला होता. ते जंगलांतून बाहेर पडतांना पलीकडून सारखा गोळ्यांचा वर्षाव होत होता आणि त्यांची दाणादाण उडत होती. कित्येक संतान लढाईच्या पूर्वींच गोळी खाऊन धरणीवर पडले होते. कुणींतरी एकानें म्हटलें, ' जीवानंद, ही निष्कारण मनुष्यहत्या करण्यांत काय अर्थ ? '
जीवानंदानें मागें वळून पाहिलें, तो भवानंद होता. जीवानंदानें विचारलें, ' तर मग काय करूं ? '

भवानंद म्हणाला, ' जंगलांत झाडांच्या आडोशाला राहून आधीं आपण आपला बचाव करूं या. तोफेच्या तोंडाला मोकळं पठार आहे—संतानांचं सैन्य स्वतःच्या तोफेशिवाय एक क्षणभरसुद्धां टिकाव धरणार नाहीं. झाडाच्या आड राहून लढलों, तर बराच वेळ लढाईला तोंड देतां येईल.'

' तूं म्हणतोस तें खरं आहे.' जीवानंद म्हणाला, ' पण प्रभूंचा हुकूम झाला आहे, तोफ छिनावून घ्या ! आतां तोफ काबीज केलीच पाहिजे.'

' कुणाची छाती आहे तोफ काढून घ्यायची ?' भवानंद म्हणाला, ' कुणी पुढं व्हायचंच असलं, तर मीं जातों. तूं मागं हट.'

' तें होणं शक्य नाहीं भवानंद.' जीवानंद म्हणाला, ' आज मला मरायचं आहे या रणांगणांत.'

' तर मग ये ! ' जीवानंद म्हणाला.

त्यानंतर भवानंद आघाडीला गेला. चोहींकडून गोळयांचा मारा होत होता. संतान सैन्य खंडविखंड होत होतें.—चिरून काढलें जात होतें—उलथून पाडलें होतें. त्याशिवाय शत्रूचे बंदुकवाले शिपाई अचुक नेम मारून सैन्यांतल्या वेंचक वेंचक संतानांचा जीव घेत होते. त्या सगळया रणधुमाळींत भवानंद ओरडून म्हणाला, ' या खवळलेल्या समुद्रांत आज उडी घ्यायची आहे—कोण येणार माझ्याबरोबर ?—आतां सारे मिळून गा—वंदे मातरम् ! '

त्यावेळीं खड्या आवाजांत मेघमल्हार रागांत हजारों संतान तोफेच्या तालावर गाऊं लागले—' वन्दे मातरम्. '

— १० —

ते दहा हजार संतान ' वंदे मातरम् ' गात गात भाले उभारून दौड करीत त्या तोफखान्यावर चाल करून गेले. गोळ्यांच्या माऱ्याखालीं सारें सैन्य बेजार होऊन त्यांची दाणादाण उडत होती, तरीही संतानसेना मागें हटत नव्हती. इतक्यांत कॅप्टन टॉमसच्या हुकमानें एक शिपायांचीं तुकडी बंदुकीवर संगिनी चढवून संतानांच्या उजव्या बाजुला मोठ्या जोरानें घुसली. शेंकडों संतानांचा नाश झाला. तें पाहून जीवानंद म्हणाला, ' भवानंद, तुझंच म्हणणं बरोबर होतं. उगीच वैष्णवांचा विध्वंस करण्यांत अर्थ नाहीं. आतां हळूहळू माघार घेतली पाहिजे. '

'आतां माघार कशी घेणार ?' भवानंद म्हणाला, 'आतां जो माघार घेईल, तो ठार मरेल.'

जीवानंद म्हणाला, 'मारा होतोय तो समोरून आणि उजव्या बाजूनं डाव्या बाजूला कुणीच नाहीं. थोडी थोडी बगल देऊन डाव्या बाजूनं मागं हटूं चल.'

'मागं हटून जाणार कुठं ?' भवानंद म्हणाला, 'तिथं नदी आहे. पावसाळी नदीला पूर आलाय—दुथडी भरून वाहतेय. इंग्रजांच्या गोळ्यांना भिऊन पळणाऱ्या संतानसेनेला काय नदींत बुडवायचं आहे ?'

जीवानंद म्हणाला, 'नदीवर एक पूल आहे—मला चांगलं आठवतं.'

भवानंद म्हणाला, 'हें दहा हजार सैन्य पुलावरून पार होतां होतां एवढी गर्दी होईल कीं एकच तोफ साऱ्या सैन्याचा पाहतां पाहतां धुव्वा उडवील.'

'आतां एक काम कर.' जीवानंद म्हणाला, 'थोडंसं सैन्य तुझ्याबरोबर ठेव. या लढाईंत तूं जें शौर्य आणि चातुर्य दाखवलंयस, त्यावरून मला वाटतंय, कीं तुला अशक्य असं कांहींच नाहीं. हें थोडंसं सैन्य घेऊन तूं आघाडीला लढत रहा. मी तुझ्या या सैन्याच्या आडून बाकीच्या संतानांना पुलावरून पलीकडे नेतों. या लढतींत तुझ्याबरोबरचं सैन्य कामाला येणार यांत शंकाच नाहीं. माझ्याबरोबरचं सैन्य कदाचित वांचलं तर वांचेल.'

'ठीक आहे !' भवानंद म्हणाला. 'मीं तसंच करतो.'

दोन हजार संतान बरोबर घेऊन वंदे मातरम्‌चा जयघोष करीत भवानंदानें बेफाम होऊन इंग्रजांच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. तिथें घनघोर युद्ध सुरू झालें. तोफेच्या तोंडापुढें ती छोटीशी संतानसेना किती वेळ टिकाव धरणार होती ? इंग्रजांच्या गोलंदाजांनीं त्या संतानांना पाहतां पाहतां धूळ चारली.

ती संधी साधून जीवानंद शिलकी सैन्य घेऊन डाव्या बाजूनें आघाडी फिरवून जंगलाला बगल देत हळू हळू निघाला. कॅप्टन टॉमसच्या हाताखालच्या लेफ्टनंट वॉटसनूनं दुरून हेरलं, कीं संतानांची एक तुकडी बगल देऊन जात आहे. फौजदारी शिपायांची एक तुकडी आणि परगणा शिपायांची एक तुकडी घेऊन त्यानें जीवानंदाचा पाठलाग सुरू केला.

'अतिदर्पे हता लंका.' संतानसैन्याला तुच्छ लेखून कॅप्टन टॉमसनें नुसते दोनशेंच शिपाई भवानंदाला तोंड देण्यासाठीं राखून ठेवले आणि बाकीचे कॅप्टन बरोबर पाठवले.

इंग्रजांच्या साऱ्या तोफा गेल्या, सारें सैन्य गेले, जें थोडेसें राहिलें आहे त्यांना सहज नामोहरम करतां येईल असें पाहून भवानंद आपल्या सैनिकांना म्हणाला, 'या समोरच्या तुकडीला कापून काढून आपल्याला जीवानंदाच्या मदतींसाठीं गेलं पाहिजे. आतां पुन्हां एकदां 'जय जगदीश हरे' चा घोष करा.'

तें मूठभर सैन्य 'जय जगदीश हरे' चा घोष करीत चिडलेल्या वाघाप्रमाणें कॅप्टन टॉमसच्या शिपायांवर तुटून पडलें. त्या चढावाची धडक त्या थोड्या-बहुत शिपायांना आणि तेलंगी तुकडीला सांवरतां आली नाहीं. ते सारे मरून पडले. स्वतः भवानंद कॅप्टन टॉमसवर चाल करून गेला. कॅप्टन त्याच्याबरोबर सारखा लढत होता. तो थकत आला होता. भवानंद म्हणाला, 'कॅप्टनसाहेब मीं तुझा जीव घेणार नाहीं. इंग्रजांशीं आमचं वैर नाहीं. काय म्हणून तुम्ही मुसलमानांना मदत करतां ? चल. मीं तुला प्राणदान दिलं आहे. तूं माझा कैदी आहेस, इंग्रज आमचे दोस्त आहेत.'

भवानंदाचा जीव घेण्यासाठीं कॅप्टन टॉमसनें संगिनीसकट बंदूक वर उचलली, पण तितक्यांत भवानंदानें त्याच्यावर झडप घातली. कॅप्टन टॉमस निःशस्त्र होऊन खिळून राहिला. त्यावेळीं भवानंद आपल्या शिपायांना म्हणाला, 'बांधा याला.' दोघांतिघांनीं येऊन कॅप्टन टॉमसला जखडून बांधलें. भवानंद म्हणाला, 'याला एका घोड्यावर घ्या. चला, आतां आपण जीवानंदाच्या मदतीला जाऊं.'

संतानांच्या त्या छोट्याशा तुकडीनें टॉमसला घोड्यावर बांधलें आणि वंदे मातरम् गातगात ते लेफ्टनंट वॉटसनवर चाल करून गेले. जीवानंदाचें सैन्य यावेळीं थकून गेलें होतें. जीवानंद आणि धीरानंद त्यांना चुचकारून आवरून धरण्याचा प्रयत्न करीत होते, तरीही त्यांतले कांहींजण पळून जाऊन आंबराईचा आसरा धरून राहिले, शिलकी सैन्य घेऊन जीवानंद आणि धीरानंद पुलाचं तोंड सर करायला निघाले, पण तिथें हे आणि वॉटसन यांनीं त्यांना दोन्ही बाजूंनीं कोंडींत धरलें.

आतां सारे मार्ग खुंटलें होते.

— ११ —

याचवेळीं टॉमसच्या तोफा उजव्या बाजूला येऊन पोंचल्या. संतानांच्या सैन्याची दाणादाण उडाली. त्यांतला कुणीही माणूस जिवंत राहाण्याचें लक्षण दिसेना. संतानांचें सैन्य वाव फुटेल तिकडे पळूं लागलें. जीवानंद आणि धीरानंद त्या सर्वांना आवरून एकत्रित करण्याचा जीवापाड प्रयत्न करीत होते, पण कुणीच त्यांचें ऐकेना.

तितक्यांत दुरून खड्या आवाजांत हांक ऐकूं आली, 'पुलावर जा! पलीकडल्या बाजूनं जा. नाहींतर नदींत बुडून मराल. इंग्रजांच्या पलटणींच्या बाजूला तोंड राखून हळूहळू पुलावर जा.'

जीवानंदानें वळून पाहिलें, तों समोर भवानंद दिसला. भवानंद म्हणाला, 'जीवानंद, त्यांना पुलावर घेऊन जा. दुसरा उपाय नाहीं.'

हळूहळू पीछेहाट घेत संतानसेना पुलाच्या बाजूकडे वळली. संतानांचें बहुसंख्य सैन्य पुलावरून जाऊं लागलें तेव्हां इंग्रजांच्या तोफेला तें आयतेंच सोयीचें झालें. पुन्हा हादरूं लागला. संतानांच्या सैन्याचा विध्वंस होऊं लागला. भवानंद, जीवानंद आणि धीरानंद एकत्र येऊन विचार करूं लागले. एका तोफेच्या धडाक्यामुळें संतानांची संख्या भराभर कमी होऊं लागली होती, तें पाहून भवानंद म्हणाला, 'जीवानंद, धीरानंद, चला–तरवार उपसून आपण तिघेही जाऊं या आणि ती तोफ काबीज करूं या.'

तिघेहीजण तरवार परजीत तोफखान्यावर तुटून पडले आणि गोलंदाजांना कापून काढूं लागले. बाकीचें संतानही त्यांच्या कुमकेला धांवले. तोफ भवानंदाच्या ताब्यांत आली.

तोफ ताब्यांत येतांच भवानंद तिच्यावर चढला. टाळी वाजवून तो ओरडला, 'बोला वंदे मातरम्.'

सारे गाऊं लागले, 'वंदे मातरम्.'

भवानंद म्हणाला, 'जीवानंद, आतां ही तोफ फिरवून बेट्यांची कणीक तिंबूं या.'

साऱ्या संतानांनीं तोफ फिरवली. आतां ती तोफ 'हरीहरी'चा जयघोष करते आहे कीं काय असें त्या वैष्णवांच्या कानांना जाणवलें बरेच शिपाई पटापट मरूं लागले. भवानंदानें ती तोफ आणून पुलाच्या तोंडावर खडी केली. तो म्हणाला, 'या संतानांना घेऊन तुम्ही दोघे पूल पार होऊन जा. मीं एकटा हें तोंड सांभळतों. तोफ चालवण्यापुरते गोलंदाज मात्र माझ्यापाशीं राहूं देत.'

यत्किंचितही न थकतां भवानंद बेडरपणें तोफ डागीत प्रत्येक गोळ्यासरशीं शत्रुसैन्याला जेरीला आणीत होता. हजारोंहजार सैन्य चाल करून येत असतांही नुसते वीस संतान तोफ रोखून पुलाचं तोंड बचावीत राहिले होते. मृत्यू जणूं काय त्यांना भीत होता. त्या अजिंक्य वीरांच्या समोर पुलाकडे यायला यवन धजत नव्हते. ही संधी सांपडल्यामुळें संतानसेना तुकड्या तुकड्यांनीं पलिकडल्या किनाऱ्याला जाऊन पोंचत होती.

आणखी कांहीं वेळपर्यंत शत्रूला अडवून धरलें तर सगळी संतानसेना पूल पार होऊन जाईल असें वाटत असतांना कुठूनतरी तोफेचा आवाज आला— 'धुडुम् धुडुम्—धाड्!' दोन्हीं सैन्यें कांहीं वेळ थांबून हा तोफेचा आवाज कुठून आला याचा शोध करीत होतीं.

त्यांना दिसून आलें, कीं जंगलांतून देशी गोलंदाजांच्या हातीं असलेल्या, कित्येक तोफा लढाईच्या मैदानावर प्रवेश करीत होत्या.

त्या तोफा जंगलाबाहेर येतांच सतरा तोंडांनीं धुराचे फवारे सोडीत साहेबाच्या सैन्यावर त्यांनीं गोळ्यांचा पाऊस पडला. जंगल, नदी आणि पर्वत तोफांच्या त्या धूमधडाक्यानें दणाणून गेलीं. सारा दिवस लढाई करून यवनसेना थकून गेलेली होती, त्यामुळें या अग्निवर्षाला भिऊन तेलंगी, मुसलमान आणि हिंदुस्तानी शिपाई पळ काढूं लागले. चारदोन गोरेच तेवढे लढाईला तोंड द्यायला खडे राहिले होते.

भवानंद हा सारा रणरंग पहात होता. तो म्हणाला, 'भाई हो, मुसलमान पळताहेत. चला त्यांचा पाठलाग करूं'

वारुळांतून निघालेल्या मुंग्यांप्रमाणें भराभर बाहेर पडणारें संतानांचें सैन्य मोठ्या उत्साहानें पूल पार होऊन यवनांचा पाठलाग करूं लागलें.

यवनांना दिसून आलें, कीं मागल्या बाजूनें भवानंदाचें पायदळ सैन्य आणि समोरून महेन्द्राचा तोफखाना आपल्यावर मारा करीत आहे. लेफ्टनंट हे साहेबाची दाणादाण उडाली होती. फौजदारी, बादशाही, इंग्रजी, देशी, विलायती आणि काळेंगोरें सैन्य जमीनदोस्त होत होतें.

उरलेल्या सैन्यानें पळ काढला होता. 'मारा, मारा!' अशा आरोळ्या ठोकीत जीवानंद, भवानंद आणि धीरानंद यांनीं विधर्मी सैन्याचा पाठलाग सुरू केल होता. त्यांच्या तोफा संतानांनीं हिरावून घेतल्या होत्या. बरेचसे इंग्रज आणि शिपाईही नेस्तनाबूद झाले होते. आतां टिकाव लागत नाहीं असें पाहून कॅप्टन हे आणि वॅाटसन यांनीं भवानंदाला सांगावा दिला, 'आम्ही सारे तुम्हाला शरण आलों आहोंत. यापुढं जीवहत्या करूं नका.'

जीवानंदानें भवानंदाच्या तोंडाकडे पाहिलें. भवानंदानें विचार केला, आज आपल्याला मरायचें आहे. आतां हटायचें नाहीं. दोन्हीं हात उभारून मोठ-मोठ्यानें हरिनामाचा घोष करीत 'मार, मारा' म्हणत भवानंद शत्रूंवर तुटून पडला.

बहुतेक सारे लोक मारले गेले होते. पंचवीस तीस गोरे शिपाई जिवावर उदार होऊन एका बाजूला शेवटपर्यंत लढत होते. जीवानंद म्हणाला, 'भवानंद आपला आतां विजय झाला आहे. आतां लढाईची जरूरी नाहीं. या पांच पंचवीस लोकांखेरीज आतां कुणीच शिल्लक राहिलेला नाहीं. या लोकांना जीवदान देऊन आपण आतां परत फिरूं.'

भवानंद म्हणाला, 'शत्रूच्या सैन्यांतला एकतरी माणूस जोपर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत भवानंद मागं फिरणार नाहीं.! जीवानंद, तुला माझी शपथ आहे—तूं बाजूला राहून पहा—मी एकटाच या इंग्रजांचा निःपात करतों.'

कॅप्टन टॉमस घोड्यावर बांधलेला होता. भवानंदानें हुकूम दिला, 'त्याला माझ्यासमोर आणा. आधीं हा बेटा मरेल—मग मीं मरेन.'

कॅप्टन टॉमसला बंगाली भाषा समजत होतो. तो तिथूनचं ओरडून आपल्या इंग्रजसेनेला म्हणाला, 'इंग्रजहो, मी तर आतां मरणारच. प्राचीन इंग्लंडचं नांव राखणं आतां तुमच्या हातीं आहे. तुम्हांला खिस्ताची शपथ आहे, आधीं माझा जीव घ्या आणि मग या बंडखोरांना कंठस्नान घाला.'

सणूकन एक गोळी सुटली. एका आयरिशमननें कॅप्टन टॉमसवर नेम धरून ती गोळी सोडली होती. ती गोळी मस्तकावर लागून कॅप्टन टॉमस मरून खालीं पडला.

तें पाहून भवानंदानें हांक मारून म्हटलें, ' माझं ब्रह्मास्त्र व्यर्थ गेलं आहे. कुणी भीम, अर्जुन, नकुल, सहदेव असाल ते माझ्या जोडीला या. जखमी झालेल्या वाघासारखे गोरे लोक माझ्यावर तुटून पडत आहेत. मी चाललों आहें रणांगणावर देह ठेवण्यासाठीं ! माझ्याबरोबर मरायला तयार असलेले कुणी संतान आहेत का ? '

पहिल्यानें धीरानंद पुढें झाला–त्याच्या मागोमाग जीवानंद आला–त्याच्या पाठोपाठ दहा, पंधरा, वीस, पन्नास संतान पुढें झाले.

धीरानंदाला पाहून भवानंद म्हणाला, ' तूं सुद्धां माझ्याबरोबर मरायला येतो आहेस का ? '

' कां ? मरायची मिरास काय कुणा एकट्यालाच दिली आहे ? ' असें म्हणत म्हणत धीरानंदानें एका गोऱ्याला खालीं पाडलें.

' तसं नव्हे–' भवानंद म्हणाला, ' इथं मेलास तर बायकामुलांत राहून तूं सुखानं संसार करणार कसा ? '

' माझं कालचं भाषण आठवलं का तुला ? ' धीरानंद म्हणाला, ' अजूनही तुला कळलं नाहीं तर ?–' त्याचवेळीं धीरानंदानें खालीं पडलेल्या गोऱ्याचा शिरच्छेद केला.

भवानंद ' नाहीं ' म्हणत होता तोंच एका गोऱ्यानें भवानंदाचा उजवा हात तोडला.

धीरानंद बोलत होता, ' तुझ्यासारख्या पवित्र आत्म्यासमोर तसली भाषा बोलायचा माझा काय पाड होता ? सत्यानंदांच्या आज्ञेप्रमाणें मी तुझी कसोटी पाहात होतों. '

एकाच हातानें लढत भवानंद म्हणाला, ' खरंच का ! महाराजांना माझा संशय आला होता होय ? '

धीरानंद त्याचा बचाव करायचा प्रयत्न करीत म्हणाला, ' तुझं कल्याणी-बरोबर जें बोलणं झालं, तें त्यांनी स्वतःच्या कानांनी ऐकलं होतं. '

'तें कसें ?' भवानंदानें विचारलं

'त्यावेळीं ते स्वतःच तिथं होते—' धीरानंद म्हणाला. त्याचवेळीं तो ओरडला, 'हं ! हं ! सावध ! सावध !' भवानंदावर एक गोरा वार करीत होता तोंच त्यानें त्या गोऱ्याला कंठस्नान घातले. धीरानंद बोलत होता, 'त्यावेळीं ते कल्याणीला गीता शिकवीत होते. इतक्यांत तूं तिथं गेलास., तो पुन्हां ओरडला, 'सावध ! सावध !' भवानंदाचा डावा हातही आतां तुटून पडला होता.

भवानंद म्हणाला. 'माझ्या मरण्याची खबर महाराजांना सांग. त्याना सांग, मी अविश्वासू नाहीं.'

डोळ्यांना पाणी येत होतें तरीही धीरानंद लढतलढत म्हणाला, 'त्यांना तें माहीत आहेच. काल रात्रीं त्यानीं दिलेला आशीर्वाद आठवतो ना ? काल ते मला म्हणाले होते, कीं तूं सारखा भवानंदाच्या पाठीशीं रहा. आज तो आत्मघात करून घेणार आहे. मृत्युकाळीं त्याला सांग, कीं माझ्या आशीर्वादानं तुला परलोकीं वैकुंठवास लाभेल.'

'संतानांचा विजय असो.' भवानंद म्हणाला, 'माझ्या मृत्युकाळीं मला एकदां 'वंदेमातरम्' ऐकवा.'

धीरानंदाने हुकूम सोडला. युद्धोन्मत्त झालेले संतान बेफाम होऊन 'वंदे मातरम्' गीत गाऊं लागले. त्या गीताच्या श्रवणानें त्यांच्या बाहूंत दुप्पट बळाचा संचार झाला. त्या भयंकर क्षणाला उरलेसुरले सारे गोरे जमीनदोस्त झाले. रणांगणावर शत्रूचा एकहि शिपाई शिल्लक राहिला नाहीं.

विजयाच्या त्या आनंददायक प्रसंगीं नजरेसमोर विष्णुपद आणून 'वंदे मातरम्' गीत गात भवानंदानें प्राण सोडला.

रमणीच्या सौंदर्यानें एका वीराचा बळी घेतला !

## — १२ —

रणागणांत विजय मिळाल्यावर अजय नदीच्या तीरीं सत्यानंदांच्या सभोंवार गोळा होऊन विजयी वीर नानाप्रकारचे उत्सव करूं लागले. एकटे सत्यानंद तेवढे भवानंदाच्या मृत्युमुळें खिन्न होते.

अजूनपर्यंत वैष्णवांपाशीं रणवाद्यें नव्हतीं. पण यावेळीं त्यांनीं कुठून तरी ढोल, नगारे, सनई, तूरी ' भेरी, रामशिंग प्रभृति वाद्यें आणून त्यांच्या गजरानें तो सारा प्रांत दणाणून सोडला होता.

अशा प्रकारें संतानांनीं बराच वेळ उत्सवाची धामधूम केल्यावर सत्यानंद सर्वत्रांना उद्देशून बोलूं लागले, ' जगदीश्वरानं खैर केली, संतानधर्माचा जय झाला, पण आज एक काम अजुन शिल्लक राहिलं आहे. आज आमच्याबरोबर या उत्सवासाठीं जे हजर नाहींत, ज्यांनीं हा उत्सव व्हावा म्हणून आपले प्राण दिले, त्यांना आपण विसरतां कामा नये. रणक्षेत्रावर जे आज पडून आहेत त्यांची उत्तरक्रिया करण्यासाठीं आपण जाऊं या. विशेषतः ज्या माणासाच्या बाहुबलामुळं या लढाईत आम्हांला जय मिळाला, त्या विजयासाठीं ज्यानं आपले प्राण वेंचले, त्या भवानंदाचा मोठ्या महोत्सवांत आपण सत्कार करूं या चला.'

' वंदे मातरम् ' गीत गातगात संतानसेना या सत्कारासाठीं निघाली. कित्येक लोकांनीं गोळा होऊन हरिनामाच्या गजरांत चंदनाचे भारेच्या भारे आणून भवानंदाची चिता रचली आणि त्या चितेवर भवानंदाचा मृतदेह ठेवून अग्नि दिल्यावर त्या चितेला वेढा घालून सर्वजण ' हरे मुरारे ' गाऊं लागले. ते विष्णुभक्त होते—वैष्णव संप्रदायी नव्हते—म्हणूनच त्यांनीं त्याच्या देहाला अग्नि दिला.

त्यानंतर त्या जंगलांतल्या गुप्त स्थळीं सत्यानंद, जीवानंद, महेन्द्र, नवीनानंद आणि धीरानंद एकत्र आले होते. त्या पांच जणांचीं गुप्त खलबतें सुरू झालीं होतीं. सत्यानंद म्हणाले, ' ज्या व्रतासाठीं एके दिवशीं आम्हीं इतर सर्व धर्म आणि सर्व सुखांचा त्याग केला होता, तें व्रत सफल झालं आहे. या प्रदेशांतून यवनसेना नष्ट झाली आहे. जी कांहीं शिल्लक राहिली आहे, ती आतां आमच्या समोर टिकाव धरूं शकणार नाहीं. आतां पुढं काय करायचं तें तुम्हींच सांगा. '

जीवानंद म्हणाला, ' चला, आतां आपण राजधानी काबीज करूं.'

सत्यानंद म्हणाले, ' माझंही तेंच मत आहे.'

' पण सैन्य कुठं आहे ? ' धीरानंदानें विचारलें.

'कां बरं ?' जीवानंद म्हणाला, 'हें आपलं सैन्य आहे ना ?'

'कुठंय हें आपलं सैन्य ?' धीरानंदानें विचारलें, 'कुणी दिसतायत का तुम्हांला ?'

'ठिकठिकाणीं सारे विश्रांति घेताहेत.' जीवानंद म्हणाला, 'डंका देतांच अवश्य धांवत येतील.'

'एकजण सुद्धां येणार नाहीं.' धीरानंद म्हणाला.

'कां ?' सत्यानंदांनीं विचारलें.

'सारे लुटीसाठीं बाहेर पडले आहेत.' धीरानंद म्हणाला, 'गांवांत कुणी राखणदार नाहीं. मुसलमानांचीं गांवं आणि रेशमाच्या वखारी लुटून सारे घरोघर जातील. आतां कुणीसुद्धां सांपडायचा नाहीं. मीं सर्वांचा शोध करून आलों.'

सत्यानंद खिन्न होऊन म्हणाले, 'कसं कां असेना, हा सारा प्रदेश आमच्या ताब्यांत आला आहे. आमच्याशीं विरोध करायला आतां इथं कुणीच नाहीं. या वरेंद्रभूमींत आतां तुम्हीं संतानराज्याचा डांगोरा पिटा, प्रजेपासून कर वसूल करा आणि नगर काबीज करण्यासाठीं सैन्य उभारा. हिंदू राज्य झालं आहे असं ऐकतांच हजारों लोक संतानांचं निशाण फडकावतील.'

त्यावेळीं जीवानंद प्रभृति संतानांनी सत्यानंदाला प्रणाम केला आणि म्हटलें, 'हे महाराजाधिराज, आपली आज्ञा व्हावी—याच ठिकाणीं आम्हीं आपलं सिंहासन स्थापन करूं.'

आपल्या उभ्या आयुष्यांत याचवेळीं सत्यानंदांनीं संताप प्रदर्शित केला. ते म्हणाले, 'हें काय बोलतां तुम्ही ? मला तुम्ही काय रिकामा घडा समजलांत ? आम्हीं कुणीच राजे नाहीं—आम्हीं संन्यासी आहोंत. आतां इथला राजा स्वतः वैकुंठाधीश. नगर काबीज केलं, कीं मग तुम्हांला वाटेल त्याच्या मस्तकावर तुम्हीं मुकुट चढवा—पण हें पक्कं ध्यानांत ठेवा, कीं हा सत्यानंद ब्रह्मचर्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही आश्रमाचा स्वीकार करणार नाहीं. चला आतां, आपापल्या कामाला लागा.'

सत्यानंदाला प्रणाम करून ते चौघेही तिथून उठले. बाकीच्यांना दिसूं न देतां सत्यानंदांनीं महेन्द्राला खूण करून थांबवून घेतलें. बाकीचे तिघे निघून गेले. महेन्द्र तेवढा तिथेंच राहिला.

सत्यानंद महेन्द्राला म्हणाले, ' तुम्ही सवानीं विष्णुमंडपांत शपथ घेऊन संतानधर्माची दीक्षा घेतली आहे. भवानंद आणि जीवानंद या दोघांनींही प्रतिज्ञाभंग केला आहे. आज भवानंदानं त्या पापाचं प्रायश्चित्त घेतलं. मला सदोदित भीति वाटतेय, कीं जीवानंद देखील असंच प्रायश्चित्त घेऊन देहपात करील. तरीही मला खात्री आहे, कीं कांहींतरी गुप्त कारणासाठीं त्याला सध्यां मरण पत्करतां येणारा नाहीं. प्रतिज्ञा राखली आहे अशी, कीं एकट्यानंच. संतानांचा आतां कार्यभाग झाला आहे. प्रतिज्ञा होती ती अशी, कीं संतानांचं कार्य पुरं होईपर्यंत तूं आपल्या बायकोचं आणि मुलीचं मुखावलोकन करायचं नाहीं. आतां हें कार्य पुरं झाल्यावर तुला संसारी व्हायला मुळींच हरकत नाहीं.'

सत्यानंदांनीं नवीनानंदाला बोलावून घेतलं आणि ते महेन्द्राला म्हणाले, ' हा नवीनानंद गोस्वामी. मोठा विचित्र माणूस आहे हा. माझा प्रिय शिष्य आहे हा. तुझी आणि तुझ्या माणसांची हा भेट करून देईल. असें म्हणून सत्यानंदांनीं शांतीला कसलीतरी खूण केली. तिला ती कळली. तिनें प्रणाम केल्यावर सत्यानंद निघून गेले त्यावेळीं महेन्द्र म्हणाला, ' आतां तुमची भेट कुठं होईल ? '

शांती म्हणाली, ' माझ्या आश्रमांत चला.'

शांती पुढें चालूं लागली आणि महेन्द्र तिच्या मागोमाग निघाला. तीं दोघेंही तिच्या आश्रमांत आलीं त्यावेळीं मध्यान्हरात्र झालीं होती तरीही शांती मुळींच विश्रांति न घेतां शहरच्या रस्त्यानें निघाली.

ते निघून गेल्यावर ब्रह्मचारी सत्यानंद जमिनीवर डोकें टेकून जगदीश्वराचें ध्यान करीत एकटेच बसले होते. रात्र संपून पहांट होऊं लागली होती. अशा वेळीं येऊन त्यांच्या मस्तकला स्पर्श केला आणि म्हटलें, ' मीं आलों आहें.'

सत्यानंद दचकले, अस्वस्थ झाले, उठून उभे राहून म्हाणाले, ' यावेळीं कां आपलं येणं झालं ? '

जी व्यक्ति आली होती ती म्हणाली, ' दिवस पुरे झाले. '

सत्यानंद म्हणाला, ' हे प्रभू, आज मला क्षमा करा. येत्या माघी पौर्णिमेला मी आपली आज्ञा पालन करीन.'

★

# चतुर्थ खंड

## — १ —

त्या रात्रीं हरिध्वनीनें तो सारा प्रदेश दणाणून गेला होता. संतान लोक गटागटांनीं जिकडे तिकडे फिरत खड्या सुरांत, कुणी ' वंदे मातरम् ' तर कुणी ' जगदीश हरे ' गीतें म्हणत हिंडत होते. वाटेवरचा वाटसरू भेटो, कीं घरांतला गृहस्थ दिसो, ते त्याला म्हणत, ' बोल ' वंदे मातरम्. ' नाहींतर तुझी मुंडी छाटतों. '

त्या एकाच रात्रीं गांवागांवांत, शहरा-शहरांत जिकडे तिकडे कोलाहल सुरू झाला होता. सारे म्हणत होते, ' मुसलमानांचा धुव्वा उडाला—देश पुन्हां हिंदूंचा झाला. आतां सारेजण मुक्तकंठानं हरिनामाचा घोष करा. '

गांवचे लोक मुसलमान दिसला कीं त्याला मारायला धांवून जात. त्या रात्रीं कुणी कुणी टोळ्या करून मुसलमान वाड्यांत जात होते आणि त्यांचें सर्वस्व लुटून त्यांच्या घराला आग घालीत होते, अशा प्रकारें पुष्कळ मुसलमान नेस्तनाबूद झाले. पुष्कळसे मुसलमान दाढीमिशी काढून टाकून आंगाला राख माखून हरिनामाचें गायन करूं लागले. त्यांना विचारलें तर ते म्हणत, ' आम्ही हिंदू आहों—'

हिंदू म्हणत होते, ' येऊं देत, संन्यासी येऊं देत ! आई दुर्गेच्या कृपेनं हिंदूंच्या अदृष्टांत तो भाग्याचा दिवस उगवूं दे. '

मुसलमान म्हणत होते, ' अल्ला हो अकबर ! इतक्या दिवसांनंतर कुराण शरीफ बेबाक्—झूट होऊन गेलं. मी पांच वख्त नमाज पढत होतों तो फुकट गेला. या तिलक लावणाऱ्या हिंदूंच्या सैन्याला आम्हांला हटवतां आलं नाहीं. दुनिया सब झूट है ! '

अशा प्रकारें कुणी हंसत होते, तर कुणी रडत होते. सर्वत्रांनाच ती रात्र एक प्रकारें मोठ्या धामधुमीनें काढावी लागली.

त्या सर्व बातम्या कल्याणीच्या कानीं गेल्या. साऱ्या आबालवृद्धांना ही विजयाची कथा आतां कळल्यावांचून राहिली नव्हती. कल्याणी आपल्याशींच म्हणाली, ' जय जगदीश्वर ! देवा, आज तुझं कार्य सिद्ध झालं. आज मीं पतीच्या दर्शनासाठीं निघणार. हे मधुसूदना, आज माझा त्राता हो ! '

कल्याणी शहरच्या दिंडी दरवाजावर आली. पहारेकऱ्यानें हटकलें, कोण आहे तें ? '

कल्याणी म्हणाली, ' मीं बाईमाणूस आहें. '

पहारेवाला म्हणाला, ' बाहेर जायचा हुकूम नाहीं. '

तें त्याचें भाषण दफेदाराच्या कानीं गेलें. दफेदार म्हणाला, ' बंदी आहे ती आंत यायची, बाहेर जायला बंदी नाहीं. '

तें ऐकून पहारेवाला कल्याणीला म्हणाला, ' जा बाई. बाहेर जायला मना नाहीं. पण आज रात्रीं मोठा धोका आहे. तुझं पुढं काय होईल कोण जाणे ! '

कल्याणी म्हणाली, ' बाबारे, मीं भिकारीण आहें. माझ्यापाशीं एक कपर्दिकसुद्धां नाहीं. डाकू लोक माझं कांहींसुद्धां करणार नाहींत. '

पहारेवाला म्हणाला, ' हें तारुण्य आहे बाई, हें तारुण्य आहे. हेंच जवा-हीर हिरेमाणकांपेक्षां मोलाचं आहे. याच्यासाठीं माझ्यासारखा माणूस देखील डाकू बनेल ! '

कल्याणीला वाटलें, मोठी पंचाईत आली ! काय करायचें ? एक शब्दसुद्धां न बोलतां ती हळूहळू दिंडीदरवाजांतून बाहेर पडली.

त्या रात्रीं लोक टोळ्याटोळ्या करून वाटेनें जात होते. कोण ' मारा मारा ' म्हणत होते, तर कुणी ' पळा पळा ' म्हणत होते. कोण हंसत होते, तर कोण रडत होते. जो समोर दिसत होता त्याला पकडायला धांवत होते.

कल्याणी मोठ्या संकटांत पडली होती. रस्ता ओळखीचा नव्हता. कुणाला विचारीन म्हटलें, तर तेंही कठीण होतें, कारण सारे विजयाच्या कैफानें बेफाम झाले होते. ती काळोखाच्या आसऱ्यानें लपत छपत चालली होती.

अशा प्रकारें लपत छपत जात असतांना ती एका उन्मत्त बंडखोरांच्या टोळीच्या हातीं सांपडली. मोठा आरडाओरडा करीत ते तिला पकडायला धांवले. कल्याणी त्यावेळीं जिवाच्या आकांताला जी पळत सुटली, ती जंगलांत शिरली. त्या टोळींतले एकदोन डाकू तिथंही तिच्यामागून धांवत गेले. एकानें पुढें होऊन तिचा पदर धरला आणि म्हटलें, ' अग चटकचांदणे ! '

इतक्यांत कुठूनतरी एकजण अचानक आला आणि त्यानें त्या डाकूला लाठीचा एक फटका लगावला. त्या फटक्यासरशीं डाकू मूर्च्छित होऊन खालीं पडला.

तो माणूस संन्याशाच्या वेषांत होता. त्याच्या अंगावर कृष्णाजिन होतें. तो वयानें अगदीं तरुण होता. तो कल्याणीला, ' तूं अगदीं भिऊं नकोस. माझ्या-बरोबर ये. कुठं जायचंय तुला ! '

कल्याणी म्हणाली, ' पदचिन्हाला.'

तो माणूस दचकला. अचंबित होऊन तो म्हणाला ' काय म्हणतेस पदचिन्ह गांवीं ! '

त्यानें आपले दोन्ही हात तिच्या खांद्यावर ठेवले आणि त्या काळोखांत टक लावून तो तिच्याकडे पाहूं लागला.

पुरुषाचा स्पर्श होताच कल्याणी घाबरली. तिला जितकें आश्चर्य वाटलें तितकीच ती संतापली होती. तिचे डोळे पाण्यानें भरून आले होते. पळून जायची सोय नव्हती. भीतीनें ती गळाठून गेली होती.

त्या माणासानें तिला नीटपणें पाहून घेतल्यावर म्हटलें, ' हरे मुरारे ! ओळखलं ग ओळखलं ! तूं काळतोंडी कल्याणी ! '

कल्याणी भेदरली. तिनें विचारलें, ' कोण आपण ? '

तो म्हणाला, ' मी तुझा दासानुदास ! हें सुंदरी, तूं माझ्यावर प्रसन्न हो.'

कल्याणी तिथून झट्कन दूर सरली आणि हातपाय आपटीत म्हणाली, ' माझी अशी विटंबना करण्याकरतांच का आपण माझा बचाव केला ? तुमच्या अंगावर संन्याशाचा वेष आहे—हाच का संन्याशाचा धर्म ? मीं आज अशी ही असहाय आहें !—नाहींतर मी तुझ्या छातीवर लाथ मारली असती.'

ब्रह्मचारी म्हणाला, ' अग ए सुहास्यमुखी, कित्येक दिवसांपासून मीं तुझ्या-साठीं जीव टाकतों आहें !—' धांवत जाऊन त्या संन्याशानें कल्याणीला कड-कडून पकडून घट्ट आलिंगन दिलें, तेव्हां कल्याणी हंसूं लागली आणि म्हणाली, ' आतां काय म्हणावं, कपाळ ! आधीं बोलूं नये माणसानं ? जशी मीं, तशीच तूं ! '

शांती म्हणाली, ' महेन्द्राच्या शोधासाठीं कां चाललीयस ?

' कोण तूं ? ' कल्याणीनें विचारलें, ' तुला सारं कांहीं माहीत आहेंस दिसतं.

शांतीं म्हणाली, ' मीं एक ब्रह्मचारी आहें. संतानसेनेचा अधिनायक आहें. महाप्रतापशाली वीरपुरुष आहे. मला सारं कांही माहींत आहे. आज रस्त्यांत सारे शिपाई आणि संतान पिसाळले आहेत. तुला आज पदचिन्हाला जातां येणार नाहीं.'

कल्याणी रडूं लागली.

डोळे गरगर फिरवीत शांती म्हणाली, ' भितेस कशाला ? आम्हीं बायका एका नयनबाणासरशीं हजारों शत्रूंचा जीव घेऊं. चल आपण पदचिन्हाला जाऊं.'

त्या बुद्धिमान आणि शक्तिमान स्त्रीच्या मदतीचा हात मिळाल्यामुळें कल्या-णीला हातीं स्वर्ग आल्यासारखें वाटलें. ती म्हणाली, ' जिथं तूं मला घेऊन जाशील तिथं मीं येईन.'

कल्याणीला बरोबर घेऊन शांती त्या जंगलांतून वाट काढीत निघाली.

## — २ —

शांती ज्यावेळीं आपला आश्रम सोडून मध्यान्हरात्रीं शहराकडे जायला निघाली, त्यावेळीं जीवानंद त्या आश्रमांत हजर होता. शांती जीवानंदाला म्हणाली, ' मीं शहरांत चाललें. महेंद्राच्या बायकोला मी घेऊन येतें. त्याची बायको अजून जिवंत आहे, हें त्याला सांगून ठेवा. '

कल्याणीला जगवल्याची सारी हकिकत भवानंदाकडून जीवानंदाला कळली होती. सर्व ठिकाणीं फिरून बातम्या काढणाऱ्या शांतीला तिची राहाण्याची

जागाही कळली होती. जीवानंदानें हळूहळू ती हकिकत महेंद्राला ऐकवली. पहिल्यानें महेंद्राचा विश्वास बसेना, पण शेवटीं तो आनंदानें बेहोष होऊन सुन्न होऊन गेला.

ती रात्र संपली, पहाट झाली, त्यावेळीं शांतीनें महेन्द्राची आणि कल्याणीची भेट घडवून आणली. त्या भयाण जंगलांत, शालवृक्षाच्या घनदाट छायेमुळें पडलेल्या काळोखांत, पशुपक्षी जागे होण्यापूर्वी त्या दोघांची भेट झाली.

एक प्रहर दिवस आला त्यावेळीं शांती आणि जीवानंद त्या जागीं आलीं. कल्याणी शांतीला म्हणाली, 'तुमच्या पदरीं आम्हीं बिनमोलानं विकले गेलों आहों. माझ्या मुलीचा पत्ता सांगा आणि हें उपकाराचं माप भरपूर करा.'

शांती जीवानंदाकडे पाहून म्हणाली, 'मीं आतां झोंप घेतें. आठ प्रहरांत मला बसायला मिळालं नाहीं अन् दोन रात्रीं झोंप नाहीं!—पुरूष ना मी!'

तें ऐकून कल्याणी हंसली. जीवानंद महेंद्राकडे वळून म्हणाला, 'या कामाचा भार मीं घेतों. आपण पदचिन्हाला जा. तिथं तुमची मुलगी तुम्हांला सांपडेल.'

जीवानंद भरुईपूरला निमाईमणीदेवीपासून मुलगी आणायला गेला. तें काम तितकेसें सोपें नाहीं असें त्याला वाटलें.

अगदीं पहिल्यानेंच निमीनें एक आवंढा गिळला—उगीच इकडे तिकडे पाहिलें—तिचे ओठ आणि नाक फुललें होतें. त्यानंतर तिनें एकदम रडायला सुरवात केली. ती म्हणाली, 'मीं मुलगी द्यायची नाहीं.!'

निमी आपल्या मनगटानें डोळे चोळून चोळून पुशीत होती. जीवानंद म्हणाला, 'अग रडतेस कां? अशी काय दूर जातेय मुलगी? मधून मधून त्यांच्या घरीं जा अन् मुलीला पाहून ये.'

निमी फुरंगटून म्हणाली, 'तुमचींच मुलगी—मग कां घेऊन जाऊं नये तुम्ही! त्यांत माझं काय जातं?' असें म्हणून तिनें सुकुमारीला आंतून बाहेर आणलें आणि जीवानंदाच्या समोर तिला दाण्कन आपटून ती पाय पसरून रडूं लागली.

जीवानंद बिचारा बावरून जाऊन इकडल्या तिकडल्या भलत्याच गोष्टी काढूं लागला, तरीही निमीचा राग ओसरला नाहीं.

निमी उठून आंत गेली आणि सुकुमारीच्या कपड्याचें बोचकें, दागिन्यांची पेटी, केंस बांधायची दोरी, खेळायच्या बाहुल्या आणि खेळणीं आणून तिनें जीवानंदांच्या समोर फेंकून दिलीं. ते सारे जिन्नस स्वतः सुकुमारीच गोळा करूं लागली. निमीला तिनें विचारलें, 'काय ग आई,—आतां कुठं जायचंय आई ?'

निमीला तें सहन झालें नाहीं. सुकूला उचलून कडेवर घेऊन ती रडत रडत निघून गेली.

## – ३ –

पदचिन्ह गांवाच्या सभोंवार आतां कोट उभारला गेला होता. महेंद्र, कल्याणी जीवानंद, शांति, निमाईमणी आणि तिचा नवरा, ही सारीं सुकुमारीला घेऊन मोठ्या खुषींत येऊन बसली होतीं. हें कौटुंबिक संमेलन मोठ्या सुखाचें होतें. शांती नवीनानंदाच्या वेषांत आली होती.

कल्याणीला शांतीनें ज्या रात्रीं आपल्या पर्णकुटींत आणलें होतें, त्याच रात्रीं आपण स्त्री आहें हें महेंद्राला कळूं न देण्याबद्दल तिनें कल्याणीला बजावलें होतें. एके दिवशीं कल्याणीनें तिला अंतःपुरांत येण्यासाठीं बोलावणें पाठवलें. नवीनानंद अंतःपुरांत जायला निघाला त्यावेळीं नोकरांनी त्याला अडवलें, पण त्यांची पर्वा न करतां तो आंत शिरला.

शांति कल्याणीपाशीं आली. तिनें विचारले, 'मला कां बोलावलंस ?'

'असं पुरुषाचं सोंग करीत किती दिवस राहाणार आहेस ?' कल्याणीनें विचारले, 'तुला भेटतां येत नाहीं, तुझ्याशीं बोलतां येत नाहीं—आतां माझ्या नवऱ्याला ही गोष्ट सांगून द्यायला हवी.'

नवीनानंद मोठ्या विचारांत पडला. बराच वेळ तो कांहीं बोलला नाहीं. शेवटीं तो म्हणाला, 'या कामीं बऱ्याच अडचणी आहेत कल्याणी.'

तीं दोघेंही बोलत बसलीं होतीं. ज्या नोकरांनीं नवीनानंदाला अंतःपुरांत प्रवेश करतांना अडथळा केला होता त्यांनीं महेन्द्राला जाऊन सांगितलें, कीं नवीनानंद आमचें न ऐकतां जबरदस्तीनें अंतःपुरांत शिरला आहे.

महेन्द्राला मोठें चोज वाटलें. महेन्द्र अंतःपुरांत गेला. कल्याणीच्या झोंपायच्या खोलींत नवीनानंद उभा होता. त्याच्या अंगावर हात ठेवून कल्याणी वाघाच्या चामड्याच्या गांठी सोडवीत होती. महेन्द्राला फार आश्चर्य वाटलें. तो अतिशय रागावलाही.

महेंद्राला पाहातांच नवीनानंद हंसला आणि म्हणाला, 'संतानासंतानांत हा अविश्वास कां ?'

महेंद्र म्हणाला, 'भवानंदाचं काय ? तो काय विश्वासू होता ?'

नवीनानंद डोळे मुरडून म्हणाला, 'तुमची कल्याणी काय भवानंदाच्या गळ्यांत हात टाकून वाघाच्या चामड्याच्या गांठी कधीं सोडवीत होती ?' बोलतां बोलतां त्यानें कल्याणीचा हात पकडला—वाघाचें चामडें तिला सोडवूं दिलें नाहीं.

महेंद्र म्हणाला, 'तुमच्या या म्हणण्याचा अर्थ काय ?'

नवीनानंद म्हणाला, 'हवा तर माझा संशय घ्या, पण कल्याणीचा संशय घ्यायला काय कारण झालंय ?'

महेन्द्र ओशाळला. तो म्हणाला, 'कां ?—मीं कुठं तिचा संशय घेतला ?'

'तर मग माझ्या मागोमाग अंतःपुरांत कां आलांत ?' नवीनानंदानें विचारलें.

'कल्याणीला मला कांहीं सांगायचं होतं,' महेन्द्र म्हणाला, '—म्हणून मीं आलों.'

'तर मग आतां जा.' नवीनानंद म्हणाला, 'मलाही कल्याणीला कांहीं सांगायचं आहे. तुम्ही जरा बाहेर जा. मी आधीं बोलून घेतों. हें घर आहे तुमचंच. केव्हांही तुम्हांला इथं येतां येतं. मोठ्या प्रयासानं एकदांचं मला इथं यायला मिळालं—'

महेन्द्र बावळटासारखा पाहात राहिला. त्याला कांहींच उलगडा होईना. अपराधी माणसाची ही भाषा नव्हती. कल्याणीची वागणूकही त्याला विचित्र वाटली. तीही दोषी माणसासारखी पळाली नाहीं, घाबरली नाहीं, लाजली नाहीं, कीं कांहीं नाहीं—उलट नाजुकनाजुक हंसत होती.

आणि ही कल्याणी !—झाडाच्या खालीं बसून जी अगदीं सहजासहजीं विष घ्यायला तयार झाली होतीं, ती काय असें पाप करील !

महेन्द्र अशा प्रकारें विचारांत पडलेला असतांना त्या दळभद्र्या शांतीनें महेन्द्राची दुरवस्था पाहून कल्याणीला उद्देशून एक कटाक्ष फेंकला. चट्कन महेन्द्राच्या डोळ्यासमोरचा पडदा दूर झाला. महेन्द्राला दिसून आलें, तो कटाक्ष स्त्रीचा होता. जिवाचा धडा करून महेन्द्रानें नवीनानंदाची दाढीमिशी धरून ओढली, त्या सरशीं ती त्याच्या हातीं आली. त्याचवेळीं ती संधी साधून कल्याणीनें वाघाच्या चामड्याची गांठ सोडवून टाकली होती आणि तें खालीं पडलें होतें.

बिंग उघडकीस आल्यामुळें शांती मान खालीं घालून उभी राहिली.

'कोण तूं ?' महेन्द्रानें शांतीला विचारलें.

'मी श्रीमान नवीनानंद गोस्वामी.' शांती म्हणाली.

'हें ढोंग पुरे झालं.' महेन्द्र म्हणाला, 'तूं बाई आहेस का ?'

शांती म्हणाली, 'कार्यपरत्वें केव्हां केव्हां बाईही होतें मीं.'

'तर मग एकच प्रश्न विचारतों मी.' महेन्द्र म्हणाला, 'तूं स्त्री असून सदोदित जीवानंदाच्या सहवासांत राहातेस कशी ?'

'तें मीं तुम्हांला नाहीं सांगितलं तर ?' शांती म्हणाली.

'तूं स्त्री आहेस, हें जीवानंदाला माहीत आहे का ?' महेन्द्रानें विचारलें.

'माहित आहे !' शांती म्हणाली.

महेन्द्राची वृत्ति अत्यंत विशुद्ध होती. तें ऐकून तो खिन्न झाला, तें पाहून कल्याणीच्यानें राहवेना. ती म्हणाली, 'हीं जीवानंद गोस्वामींची धर्मपत्नी शांतीदेवी.'

महेन्द्राची मुद्रा त्या क्षणींच प्रसन्न झाली. तरी पण पुन्हां त्याच्या मुद्रेवर आडोसा आलेला दिसला. कल्याणीला तें जाणवलें. ती म्हणाली, 'ही ब्रह्मचारिणी आहे.'

## — ४ —

उत्तर बंगाल आतां मुसलमानांच्या हातून गेला होता, पण मुसलमान ती गोष्ट कबूल करीत नव्हते. स्वतःच्या मनाला फसवीत ते म्हणत होते, कीं कित्येक लुटारूंनीं इथें गोंधळ माजवला आहे—त्यांना आपण शिक्षा लावणार आहों.

अशा प्रकारें किती काळ गेला असता, कोण जाणे! पण याचवेळीं ईश्वरी योजनेनें वॉरन हेस्टिंग्स कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल म्हणून आला.

वारन हेस्टिंग्स स्वतःची फसवणूक करून घेणारा माणूस नव्हता. तो तसा असता, तर आज भारतांत ब्रिटिशांचें साम्राज्य कसें प्रस्थापित झालें असतें? त्यानें संतानांना दहशत लावण्यासाठीं मेजर एडवर्डस् नांवाचा एक दुसरा सेनापती नव्या पलटणी ताब्यांत देऊन पाठवून दिला.

एडवर्ड्सला दिसून आलें, कीं ही लढाई युरोपीय पद्धतीची नव्हती. शत्रूंच्या पाशीं सैन्य होतें, नगर नव्हतें कीं राजधानी नव्हती, कोटकिल्लसुद्धां नसतांना सारें कांहीं त्यांच्या ताब्यांत होतें. ज्या दिवशीं ज्या जागीं ब्रिटिश सैन्याची छावणी पडे, त्याच दिवशीं त्या जागीं ब्रिटिश सैन्याचा ताबा राही. ब्रिटिश सैन्य छावणी उठवून गेल्याबरोबर चोहोबाजूंनीं 'वंदे मातरम्' गीताचा जय-घोष होऊं लागे.

कुठून हीं माणसें वारुळांतल्या मुंगीसारखीं एका रात्रींत बाहेर येतात, इंग्र-जांनीं काबीज केलेल्या मुलखाला आग घालतात, किंवा अल्पसंख्य ब्रिटिशसेना दिसली, कीं लगेच तिचा धुव्वा उडवतात, याचा त्या साहेबाला पत्ता लागेना. शोध करतां करतां साहेबाला कळून आलें, कीं पदचिन्ह गांवीं किल्ला बांधून त्यांनीं त्या ठिकाणीं आपलें शस्त्रागार आणि धनागार राखून ठेवलें होतें. तो किल्ला काबीज करायचें साहेबानें ठरवलें.

पदचिन्हांत कितीसे संतान राहात होते हें शोधून काढण्यासाठीं त्यानें हेर पाठवले. त्याला जी बातमी मिळाली, त्यावरून त्या किल्ल्यावर चाल करून जाणें त्याला धोक्याचें वाटलें. मोठ्या कौशल्यानें त्यानें एक अजब युक्ति योजली.

माघी पूर्णिमा जवळ आली होती. त्यांच्या छावणीपासून जवळच नदीकांठीं मेळा जमणार होता. या मेळ्यासाठीं मोठ्या जोरानें तयारी चालली होती. या मेळ्याला जवळजवळ लाख माणसें गोळा होतील अशी अपेक्षा होती. आतां वैष्णवांचें राज्य झालेलें असल्यामुळें हा उत्सव मोठ्या थाटांत होणार होता. या पूर्णिमेच्या दिवशींसारे संतान या मेळ्यासाठीं या जागीं एकत्रित होण्याचा संभव होता. पदचिन्हांतील रक्षक सैन्य देखील या मेळ्याला हजर राहील अशी मेजर

एडवर्ड्सनें अटकळ केली आणि त्याच दिवशीं पदचिन्हावर चाल करून जाऊन तो किल्ला हस्तगत करायचें त्यानें ठरवलें.

ही योजना मनांत ठेवून त्यानें बाहेर घोषणा केली होती, कीं मेळ्यावर आपण चाल करून जाणार—तिथें सारे वैष्णव गोळा होणार असल्यामुळें एका दिवसांत शत्रूंचा निःपात करून टाकणार—वैष्णवांचा मेळा होऊं देणार नाहीं.

जीवानंद आणि शांती पदचिन्हांतून निघून गेलीं होतीं. त्यावेळीं लढाईचा संशय सुद्धां आला नव्हता. लढाईंत त्यांचें आतां लक्षही नव्हतें. माघी पूर्णिमेच्या पुण्य दिवशीं शुभमुहूर्तावर गंगेच्या पवित्र प्रवाहांत प्राणविसर्जन करून प्रतिज्ञाभंगाच्या महापापाचें प्रायश्चित्त करायचें, असें त्यांनीं ठरवलें होतें.

मेळ्याच्या वेळीं संतानांची आणि इंग्रज सैन्याची मोठी लढाई होणार, असें वाटेनें येतांना त्यांना कळलें. तेव्हां जीवानंद म्हणाला, 'तर मग आतां लढाईतच जीव देऊं. चल लौकर.'

ते तांतडीनें यायला निघाले होते. वाटेंत एका जागीं एका टेकाडावर चढून त्यांनीं निरीक्षण केलें. त्या वीरदंपत्याला दिसून आलें, कीं खालीं बऱ्याच अंतरावर इंग्रजांचीं छावणी पडली होती.

शांती म्हणाली, 'मरायच्या गोष्टी सध्यां राहूं देत—बोला 'वंदेमातरम्!''

## — ५ —

त्यावेळीं त्या दोघांनींही एकमेकांच्या कानाला लागून कांहीं खलबत केलें. जीवानंद जंगलाच्या एका भागांत लपून बसला. शांती जंगलाच्या दुसऱ्या भागांत प्रवेश करून एक अजब प्रकार करायला प्रवृत्त झाली होती.

शांती मरायला निघाली होती—पण मरतांना आपल्या स्त्रीवेषांतच मरावें असें तिनें ठरवलें होतें. तिचा पुरुषवेष म्हणजे लबाडी, असें महेन्द्र म्हणाला होता. ढोंग करीत करीत मरायचें नाहीं. तिनें येतांना आपल्या साऱ्या सौभाग्यचिन्हांची सांबळी बरोबर आणली होती. आतां नवीनानंद सांबळी उघडून वेष बदलायला बसला होता. तिनें स्त्रीवेष घेऊन, वैष्णवासारखा नाकापासून वरपर्यंत नाम लावून केसांची रचना मोठ्या खुबीदार पद्धतीनें केली. आणि त्यावेळीं प्रचलित असलेले बिंदीसारखे गोल गोल दागिने कपाळावर रुळत ठेवून तिनें एकप्रकारें

तोंड झांकून घेतलें. वैष्णवीच्या वेषांत हातीं सारंगी घेऊन ती इंग्रजांच्या छावणींत हजर झाली.

तिला पाहतांच भल्यामोठ्या काळ्याकुट्ट मिशांचे शिपाई बेहाय खूष झाले. कुणी टप्पा, कुणी गझल, कुणी श्यामाची गाणीं, तर कुणी कृष्णाचीं गाणीं, अशा वेगवेगळ्या गाण्यांची फरमाईश करूं लागले. कुणी तांदूळ दिले, कुणी डाळ दिली, कुणी मिठाई दिली, कुणी पैसा दिला, तर कुणी चवली दिली. अशा रीतीनें तिनें छावणींतील व्यवस्था स्वतःच्या डोळ्यानें पाहून घेऊन छावणींतून पाय बाहेर काढला. शिपायांनीं विचारलें, 'पुन्हां केव्हां येणार ?'

वैष्णवी म्हणाली, 'तें कांहीं सांगतां येत नाहीं. माझं घर फार दूर आहे.'

शिपायांनीं विचारलें, 'कितीसं दूर आहे ?'

वैष्णवी म्हणाली, 'माझं घर आहे पदचिन्हाला.'

तें ऐकून एका शिपायाला आठवण झाली...मेजरसाहेबांना पदचिन्ह गांवाकडची खबर पाहिजे होती. वैष्णवीला बोलावून घेऊन त्यानें तिला कप्तानसाहेबांकडे सुपूर्द केलें. कप्तानसाहेब तिला मेजरसाहेबाकडे घेऊन गेले. मेजरसाहेबांच्या समोर जातांच वैष्णवी गोड गोड हंसली. तिच्या मर्मभेदी कटाक्षानें साहेबाचें डोकें फिरूं लागलें. खंजिरावर थाप मारून ती गाऊं लागली—

**म्लेंच्छ निहवनिधने कलयसि करवालम् ।**

साहेबानें आपल्या मोडक्या बंगालींत विचारलें, 'तुझं घर कुठं बिबी ?'

वैष्णवी म्हणाली, 'मी बिबी नाहीं—वैष्णवी आहें. माझं घर पदचिन्हाला.'

साहेब म्हणाला, 'वेल, दॅट ईच पॅडसीन—इज इट ? तिथं एक गर्र आहे ?'

वैष्णवी म्हणाली, 'घर ? पुष्कळ घरं आहेत.'

साहेब म्हणाला, 'घर नव्हे—गर्र—गर्र ! गर्र !'

शांती म्हणाली, 'आतां तुम्ही काय म्हणतां तें समजलं. गड होय ?'

साहेब म्हणाला, 'यस् यस्. गर्र—गर्र. आहे ?'

शांती म्हणाली, 'गड आहे. भला मोठा किल्ला आहे.'

साहेबानें विचारलें, 'किती आदमी आहेत तिथं ?'

शांती म्हणाली, 'त्या किल्ल्यांत होय ? आहेत वीसपंचवीस हजार.'

साहेब उद्गारला, ' नॉनसेन्स. एका किल्ल्यांत फार तर दोनचार हजार माणसं रहात असतील ! अच्छा ! ते तिथंच आहेत, कीं गेले निघून ? '

शांती म्हणाली, ' निघून जाणार कुठं ? '

साहेब म्हणाला, ' मेळ्यासाठीं ! तिथून तूं इथं केव्हां आलीस ? '

वैष्णवी म्हणाली, ' कालच आलें साहेब. '

साहेब म्हणाला, ' तर मग ते लोक आज गेले असतील तिथं. '

शांती आपल्याशींच पुटपुटत होती, ' तुझ्या बारशाच्या घुगऱ्या खाल्ल्याय मीं. आतां कोल्हेकुत्रे तुझी मुंडी केव्हां चघळतात त्याची वाट पहातेंय मीं. ' ती उघड म्हणाली, ' तसंच असेल साहेब. आज कदाचित ते गेले असतील निघून. गळा सुकला साहेब. द्या ना एक चवलीपावली. कांहीं दिलंत म्हणजे जाईन निघून. अन् तसंच चांगलंसं बक्षिस दिलंत तर परवां तिथली खबर काढून येतें अन् तुम्हांला सांगतें. '

साहेबानें खण्कन एक रुपया तिच्या अंगावर फेंकला. तो म्हणाला, ' परवां नको बिबी—'

' बिबी काय म्हणतोस मेल्या ? वैष्णवी म्हण. '

एडवर्ड्स म्हणाला, ' परवां नको, आजच्याच रात्रीं मला खबर मिळायला हवी. '

शांती म्हणाली, ' उशाखालीं बंदूक घे अन् दारूचा ग्लास झोंकून शिरसाचं तेल नाकांत घालून झोंप जा. म्हणे आज रात्रीं ! आजच्या आज दहा कोस जायचं ! पुन्हां दहा कोस परत यायचं ! आणि या वेड्याला खबर आणून द्यायची ! हलकट बेटा कुठला ! '

' कुणाला हलकट म्हणतेस ? ' साहेबानें विचारलें.

शांती म्हणाली, ' मोठा आलाय वीर ! बडा जांदरेल ! '

' बडा जनरल हम् हो सकता है. ' साहेब म्हणाला, ' क्लाईव्ह के माफिक. पण आजच्या आज मला खबर मिळायला हवी. आज खबर आणलीस तर तुला शंभर रुपये बक्षीस. '

शांती म्हणाली, ' शंभर दे, कीं हजार दे. या दोन टांगांनीं वीस कोसांची मजल मारणं माझ्या बापाच्यानंही व्हायचं नाहीं.'

साहेब म्हणाला, ' घोड्यावर बसून जाशील

शांती म्हणाली, ' घोड्यावर बसतां आलं असतं तर तुझ्या तंबूसमोर येऊन सारंगी वाजवीत भिक्षा कां मागितली असती ? '

साहेब म्हणाला, ' तुला समोर बसवून नेलं तर ? '

' तुझ्या मांडीवर बसून जाऊं ? ' शांती म्हणाली, ' मला कांहीं लाजशरम आहे कीं नाहीं ? '

' क्या मुष्किल ! ' साहेब म्हणाला, ' पांचशें रुपये देईन.'

' कोण नेणार आहे मला ? ' शांतीनें विचारलें, ' तूं स्वतः नेणार आहेस ? '

साहेबानें हातानें खूण केली. समोर उभ्या असलेल्या एका लिंड्ले नांवाच्या तरुण एनसाईनला बोलावून त्यानें विचारलें, ' लिंड्ले, तूं हिला घोड्यावर बसवून घेऊन जाशील ? '

शांतीचें रूप पाहून तो खूष झाला होता. तो म्हणाला, ' मोठ्या आनंदानं !'

एक मोठा आरबी घोडा दौडीच्या तयारीनें आणण्यांत आला. लिंड्ले तयारच होता. शांतीला धरून उचलून तो घोड्यावर चढवण्यासाठीं पुढें सरसावला. शांती म्हणाली, ' छे : एवढ्या लोकांच्यासमोर ? मला कांहीं लाज शरम आहे कीं नाहीं ? चल आधीं छावणीबाहेर जाऊं.'

लिंड्ले घोड्यावर स्वार झाला. घोडा हळूहळू चालत होता आणि शांती त्याच्या मागून पायीं चालत जात होती.

ते छावणीच्या बाहेर आले. आतां आजूबाजूला कुणी नाहीं असें पाहून शांती लिंडलेच्या पायावर पाय देऊन एका उडींत घोड्यावर चढली. लिंड्ले हंसून म्हणाला, ' तूं तर सराईत घोडेस्वार दिसतेस ! '

शांती म्हणाली, ' मीं सराईत घोडेस्वार तर आहेंच, पण तुझ्या शेजारीं घोड्यावर बसायला मला शरम वाटते. छेः ! रिकिबींत पाय घालून घोड्यावर बसायचं म्हणजे काय ? '

एकदां आपला दिमाख दाखवण्यासाठीं लिंड्लेनें रिकबींतून पाय बाहेर काढला, त्या सरशीं त्या अक्कलशून्य इंग्रजाच्या मुंडीला हात घालून तिनें त्याला घोड्यावरून फेंकून दिलें.

घोड्यावर पद्धतशीर मांड ठोकून घोड्याच्या पोटाला तिनें पायाच्या पैंजणांसकट टांच मारली, तेव्हां तो अरबी घोडा वाऱ्यासारखा पळत सुटला.

लिंडले पाय मोडून पडला होता, आणि शांती घोड्यावर बसून तीरासारखी जात होती.

जंगलाच्या ज्या भागांत जीवानंद लपून बसला होता, तिथें जाऊन तिनें त्याला सारी हकीकत सांगितली. ती ऐकतांच जीवानंद म्हणाला, 'तर मग आतां जलदी करून जाऊन महेन्द्राला सावध केलं पाहिजे. तूं मेळ्याकडे जाऊन सत्यानंदांना ही खबर दे. तूं घोड्यावरूनच जा. प्रभूंना शक्य तितक्या लौकर ती बातमी कळली पाहिजे. दोघेंही दोन बाजूंनीं दौड करीत निघालीं.

शांती आतां पुन्हा नवीनानंद बनली होती हें कांहीं सांगायला नको.

— ६ —

एडवर्ड्स हा अस्सल इंग्रज होता. जिकडे तिकडे त्याचे हेर फिरत होते. लिंडले साहेबाला फेंकून देऊन त्याचा घोडा घेऊन वैष्णवी कुठेंतरी निघून गेली, ही बातमी त्याच्या कानीं येऊन पोंचली. ते ऐकतांच एडवर्ड्स म्हणाला, "An imp of Satan! Strike the tents!"

तंबूच्या खुंट्यांवर थडाथड हातोड्यांचे घाव पडूं लागले. ती वस्त्रनगरी पाहतांपाहतां नाहींशी झाली.

इकडे महेंद्र संतानसेना घेऊन मेळ्याच्या वाटेला लागला होता. दुपारच्या वेळीं महेंद्रानें वाटेंत छावणी ठोकली. वैष्णवांकडे तंबू नव्हते. ते झाडाखालीं वस्ती करीत आणि चटई किंवा कंथा टाकून झोंप घेत. संध्याकाळीं थोडेसें हरिचरणामृत प्राशन करून रात्र काढीत. यावर कांहीं भुकेची बाकी राहिली तर स्वप्नांत वैष्णवी ठाकुराणीचें अधरामृतपान करून ती पुरी करून घेत.

छावणी ठोकण्याजोगी एकच जागा जवळपास होती. ती एक आंबे, फणस, चिंच आणि बाभळीची भलीमोठी बाग होती. महेन्द्रानें हुकूम सोडला, 'इथंच छावणी ठोका.'

त्याच्याजवळच एक छोटीशी टेकडी होती. ती चढायला जरा कठीण होती. महेन्द्राला वाटलें, या टेकडीवर छावणी ठोकली तर छान होईल. एकदां ती जागा पाहून जायचें असें त्यानें ठरवलें.

घोड्यावर स्वार होऊन महेन्द्र हळूहळू त्या टेकडीवर चढत होता. तो थोड्याशा अंतरावर गेल्यावर एक तरुण योद्धा त्या वैष्णवांच्या छावणींत आला आणि म्हणाला, ' चला, आपण टेकडीवर चढून जाऊं. '

तिथें जे बसले होते ते आश्चर्यचकित होऊन म्हणाले, ' कां ! '

तो तरुण एका मातीच्या ढिगाऱ्यावर चढून उभा राहिला आणि म्हणाला, ' या चांदण्या रात्रीं या छोट्या पर्वताच्या शिखरावर या वसंत ऋतूंत नुकताच फुललेल्या फुलांचा वास घेत घेत आपण शत्रूंबरोबर लढूं या चला. '

आतां संतानांना कळून आलें, कीं तो सेनापती जीवानंद होता. ' हरे मुरारे '—चा जयघोष करीत सारी संतानसेना भाल्यावर भर देऊन उठून उभी राहिली. जीवानंद पुढें निघाला आणि बाकीची सेना त्याच्या मागोमाग टेकडीवर चढूं लागली.

एकानें एक जीन कसलेला घोडा आणून जीवानंदासमोर उभा केला. महेन्द्रानें तें दुरून पाहिलें तेव्हां त्याला आश्चर्य वाटलें.

त्याला वाटलें, हें काय चाललेंय ? कुणाचाही हुकूम नसतांना हे वर चढून कां येताहेत ? महेंद्रानें घोड्याचें तोंड फिरवलें आणि घोड्याला चाबकाचा एक फटकारा मारून तो टेकडीवरून खालीं उतरला. त्या सैन्याच्या अग्रभागीं जीवानंद आहे असें पाहातांच त्यानें त्याला विचारलें, ' हें काय चाललंय जीवानंद ? '

जीवानंद हंसून म्हणाला, ' आज आनंदीआनंद आहे. टेकडीच्या पलीकडे एडवर्डसाहेब आला आहे. जो आधीं वर चढून येईल, त्याचीच आज जीत. '

संतान सैन्याला हांक मारून जीवानंद म्हणाला, ' मला ओळखलंत ? मी जीवानंद गोस्वामी. हजारों गनीमांना मीं कंठस्नान घातलं आहे. ' तो सारा प्रदेश दणाणून सोडीत सर्वांनीं उत्तर दिलें, ' आम्हीं तुम्हांला ओळखतों. तुम्ही जीवानंद गोस्वामी. '

' तर मग बोला ' हरे मुरारे ' जीवानंद म्हणाला.

हजारोंहजार कंठांतून निघणाऱ्या त्या ' हरे मुरारे ' च्या जयघोषानें तें पठार दणाणून सोडलें.

जीवानंद म्हणाला, ' टेकडीच्या पलीकडे गनीम आहे. या टेकडीच्या शिखरावर या काळोख्या रात्रीच्या साक्षीनं संतान लढाई खेळणार. चला, लौकर या. या शिखरावर जो आधीं जाऊन पोंचेल तोच ही लढाई जिंकील. बोला, ' वंदेमातरम् ! ' '

तें सारें अरण्य दणाणून ' वंदेमातरम् ' गीताचा घोष सुरू झाला. संतानसेना एकामागून एक टेकडी चढूं लागली.

तितक्यांत ते एकदम घाबरले. महेंद्रसिंह दौड करीत टेकडीवरून खालीं उतरत असतां शिंग फुंकीत होता. पाहतां पाहतां टेकडीच्या शिखरावरून आकाशाच्या पार्श्वभूमीवर तोफखान्यासकट इंग्रजांची गोलंदाज सेना ठाण मांडून राहिलेली त्यांना दिसूं लागली.

हांक फोडून वैष्णवसेना गाऊं लागली—

**तुमि विद्या तुमि भक्ति**
**तुमि मा बाहुते शक्ति**
**त्वम्हि प्राणाः शरीर ॥**

पण इंग्रजांच्या तोफांच्या धुमधडाका आवाजांत त्या महागीताचा घोष कुठल्याकुठें नाहींसा झाला. शेकडों संतान गोळ्या लागून घोड्यासकट टेकडीवरून कोसळून खालीं पडले. धडाड् धडाड् आवाज करीत इंग्रजांचें वज्र मेघगर्जनेला लाजवीत दशदिशा दणाणून टाकीत होतें. जीवानंद आणि महेन्द्र जिवाचा आटापिटा करीत होते, पण दरडीवरून कोसळणाऱ्या दगडांप्रमाणें संतानसेना टेकडीवरून पळ काढीत होती. कोण कुणीकडे पळाले त्याचा पत्ता नव्हता. एका झटक्यासरशीं सर्वांना नेस्तनाबूद करण्यासाठी ' हुरें हुरें म्हणून ओरडत गोऱ्यांची पलटण टेकडीखालीं उतरूं लागली. पर्वतावरून पडणाऱ्या पाण्याच्या धबधब्याप्रमाणें संगिनी उंच करून ती ब्रिटिशांची अजिंक्य सेना पळत सुटलेल्या संतानसेनेच्या मागें बेछूटपणें धांवूं लागली.

जीवानंद एकदांच महेन्द्राला भेटला आणि म्हणाला, ' आज शेवट ! आज इथंच मरूंया आपण. '

महेन्द्र म्हणाला, ' नुसता जीव दिल्यानं लढाई जिंकतां आली असती तर मी जीवही दिला असता. निष्कारण मरण ओढून घेणं हा वीराचा धर्म नव्हे. '

जीवानंद म्हणाला, ' मी निष्कारणच मरणार—पण लढत लढत मरणार ! ' मोठ्यानें हांक फोडून जीवानंद म्हणाला, ' ज्या कुणाला हरिनामाचा जयघोष करीत मरायचं असेल त्यानं माझ्याबरोबर यावं.'

बरेच जण पुढें आले. जीवानंद म्हणाला, ' असं नव्हे ! श्रीहरीच्या साक्षीनं शपथ करा—जिवंत मागं फिरायचं नाहीं.'

जे पुढें आले होते ते मागें हटले. जीवानंद म्हणाला, ' तुम्ही कुणी नाहीं येत ? तर मग हा पहा, मी एकटाच चाललों.'

घोड्याच्या पाठीवर उभा राहून बराच मागें असलेल्या महेन्द्राला हांक मारून जीवानंद म्हणाला, ' भय्या, नवीनानंदाला सांग, मीं चाललों. आतां पुन्हां भेट स्वर्गात.'

एवढेंच बोलून तो वीर पुरुष गोळ्यांच्या वर्षावांतून घोडा दामटीत पुढें चालला.

पळत सुटलेल्या संतानांना हांक मारून महेन्द्र म्हणाला, ' पहा, एकवार मागं वळून जीवानंदाकडे पहा. नुसतं पहिल्यानं कांहीं मरत नाहीं तुम्ही ! '

कित्येक जणांनीं मागें वळून पाहिलें. जीवानंदाचें, तें असामान्य धाडस पाहून पहिल्यानें कित्येक आश्चर्यचकित झाले. त्यानंतर म्हणाले, ' जीवानंदालाच काय जीव देतां येतो ? आम्हांला नाहीं येणार ? चला. जीवानंदाबरोबरच आपणही वैकुंठ गांठूं.'

तें ऐकून थोडेबहुत संतान मागें फिरले. त्यांना पाहिल्यावर आणखी कांहीं मागें फिरले. त्या सर्वांना पाहिल्यावर आणखी बरेच मागें फिरले. जिकडेतिकडे गोंधळ माजला. शत्रूची फळी फोडून जीवानंद आंत शिरला होता. आतां तो दिसेनासा झाला होता.

इकडे कांहीं संतान पुन्हां मागें हटत होते, असें लढाईच्या मैदानवरून बाकीच्या संतानांनीं पाहिलें. सर्वांना वाटलें, कीं संतानांचा विजय झाला—संतानांनीं शत्रूंना पिटाळून लावलें. त्यावेळीं सारें संतान सैन्य ' मारा मारा ' असा आरडाओरडा करीत इंग्रज सैन्यावर तुटून पडलें.

इकडे इंग्रज सैन्यांत भारीच गोंधळ उडला होता. लढाईच्या माऱ्याला तोंड न देतां शिपाई दोन्ही बगलांनीं पळत होते. गोरे शिपाई देखील संगिनी उभा-

रून छावणीकडे धांवत होते. महेंद्रानें चोहीकडून नजर टाकून पाहिली तेव्हां त्याला दिसून आलें, कीं टेकडीच्या शिखरावर असंख्य संतानसेना दिसून येत होती. ते संतान युद्धाच्या कैफानें बेहोष होऊन इंग्रजसैन्यावर चाल करून जात होते. तें पाहून संतानांना हांक मारून तो म्हणाला, ' संतानगण हो ! पहा, पहा, शिखरावर प्रभू सत्यानंदगोस्वामींचें निशाण फडकत आहे. मधुकैटभ आणि कंस—केशी दैत्यांचा नाश करणारा मुरारी स्वतः रणांगणावर अवतीर्ण झाला आहे. पहा, लाखों संतान वर उभे आहेत. बोला, हरे मुरारे ! हरे मुरारे ! उठा ! मुसलमानांना पाठीपोटीं सडकून झोडपून काढा. टेकडीवर लाखों संतान आले आहेत—पहा, पहा.'

त्यावेळीं ' हरे मुरारे 'च्या प्रचंड जयघोषानें तें सारें जंगलपठार दणाणून सारे संतान ' भिऊं नका, भिऊं नका ' अशी हांक ठोकीत हत्यारांचा खणखणाट करीत लढत असतांना सारे जीव थक्क झाले होते.

महेन्द्राची तुकडी आतां उसळून वर चढूं लागली होती. दगडावरून कोसळणाऱ्या नदीच्या पाण्याप्रमाणें राजसेना गडगडून पडत होती. शत्रु स्तंभित झाले होते, भेदरून गेले होते. त्याचवेळीं पंचवीस हजार संतानसेना घेऊन सत्यानंद ब्रह्मचारी टेकडीच्या शिखरावरून धबधब्यासारखे शत्रुसैन्यावर येऊन कोसळले तुमल युद्ध सुरू झालें.

वरून आणि खालून होणाऱ्या दोन्ही संतानसैन्यांच्या माऱ्यामुळें शत्रुचें अफाट सैन्य भरडून नेस्तनाबूद झालें.

वॉरन हेस्टिंग्जला ही बातमी कळवण्यासाठीं जायला एकही माणूस शिल्लक राहिला नाहीं.

ती पूर्णिमेची रात्र होती. लढाईचें तें भीषण मैदान आतां थंडावलें होतें. घोड्याची दौड, बंदुकांच्या फैरी, तोफांचा धडाका, आणि सर्वांना व्यापून टाकणारा धूरांचा प्रचंड लोट कुठेंच दिसत नव्हता. कुणी जसे ' हुर्रे ' करीत नव्हते तसेच ' हरीध्वनि 'ही करीत नव्हते. आवाज ऐकूं येत होता काय तो कोल्हे, कुत्रे आणि गिधाडांचा. मधून मधून जखमी सैनिकांचें विवळणें ऐकूं येत होतें. कुणाचे हात तुटले होते. कुणाचे पाय तुटले होते, कुणाचे डोकें फुटलें होतें, कुणाच्या बरगड्या मोडल्या होत्या, तर कुणी पडलेल्या घोड्याखालीं

अडकून पडले होते. माघ महिन्यांतल्या त्या पुर्णिमेच्या रात्रीं कडक थंडींत आणि भडक चांदण्यांत तें लढाईचें मैदान भयानक स्वरूप धारण करून राहिलें होतें. तिथें जायचें कुणालाही धैर्य होत नव्हतें.

कुणालाही धैर्य होत नव्हतें, तरी रात्रींच्या वेळीं एक स्त्री त्या अगम्य रण-क्षेत्रावर सारखी हिंडत होती. हातीं मशाल घेऊन त्या मुडद्यांच्या राशींत ती कांहींतरी शोधीत होती. ती प्रत्येकाचा चेहरा मशाल पुढें धरून पाहून घेई आणि पुन्हां दुसऱ्याकडे जाई. जो आपल्याला हवा तो हा नव्हे, असें दिसून येतांच ती हातीं मशाल घेऊन पुढें जाई.

साऱ्या पठारावर अशा प्रकारें धुंडाळीत असतां तिला हवें होतें तें कुठेंच सांपडलें नाहीं. तिनें मशाल फेकून दिली. मेलेल्या माणसांच्या रक्तानें खचलेल्या धरणीवर आंग टाकून ती रडूं लागली.

ती शांती होती. ती जीवानंदाचा देह शोधीत होती.

अशा रीतीनें खालीं पडून ती रडत असतां कुणाचा तरी करुणापूर्ण आवाज तिच्या कानीं आला. कुणीतरी बोलत होतें, ' ऊठ मुली, रडूं नकोस. '

शांतीनें वर पाहिलें. त्या शुभ्र चांदण्यांत तिच्यासमोर एक जटाजूटधारी महापुरूष उभा होता.

शांती उठून उभी राहिली. जे आले होते ते म्हणाले, ' रडूं नकोस मुली, मी तुला जीवानंदाचा देह शोधून काढून देतों. चल माझ्याबरोबर. '

तो महापुरुष शांतीला घेऊन लढाईच्या मैदानाच्या मध्यभागीं आला. त्या जागीं एकावर एक पडलेल्या मुडद्यांच्या राशी खचल्या होत्या. शांतीला ते देह निवडून पाहाणें अशक्य झालें. त्या बलवान् पुरुषानें त्या राशींतून एक मृतदेह बाहेर काढला. शांतीनें तो ओळखला—तो जीवानंद होता. त्याच्या सर्वांगाला गोळ्यांचीं क्षतें पडलीं होतीं. तो रक्तानें माखलेला होता. एकाद्या सामान्य स्त्रीप्रमाणें शांती हंबरडा फोडून रडूं लागली.

तो महापुरुष पुन्हां म्हणाला, ' रडूं नकोस मुली. जीवानंद खरोखरीच का मेलाय ? जरा नीट तपासून पहा पाहूं. आधीं त्याची नाडी पहा. '

शांतीनें नाडी तपासून पाहिली. ती चालत नव्हती. तो पुरुष म्हणाला, ' छातीवर हात ठेवून पहा. '

शांतीनें त्याची छाती नीट तपासून पाहिली—तिथें सर्वत्र स्तब्ध होतें—सारें थंडावलें होतें.

तो पुरुष पुन्हां म्हणाला, 'नाकापाशीं हात धरून पहा—सूत धरून पहा—तिथं कांहीं श्वासोच्छ्‌वासाचा अंश दिसतो कीं काय तें पहा.'

शांतीनें पाहिलें—सारें गारीगार होतें.

तो पुरुष म्हणाला, 'पुन्हां पहा, तोंडांत बोट घालून तिथं कांहीं उष्णता आहे कीं नाहीं तें पहा.'

शांतीनें तोंडांत बोट घालून पाहिलें. ती म्हणाली, 'नीटसं कांहीं कळत नाहीं.'

शांतीचा जीव आसावला होता.

महापुरुषानें जीवानंदाच्या देहावरून आपला हात फिरवला. तो म्हणाला, 'तूं निराशेनं खचलीं आहेस म्हणून तुला कळत नाहीं. अजून या देहांत थोडीशी गरमाई आहे असं वाटतंय मला. पहा बरं पुन्हां!'

शांतीनें पुन्हां नाडी पाहिली—ती मंदपणें चालत होती. चकित होऊन तिनें हृदयावर हात ठेवला—तिथें थोडीशी धडधड जाणवली. नाकाशीं हात नेऊन पाहिलें—श्वासोच्छ्‌वासाचा थोडासा भास जाणवूं लागला. तोंडांतही थोडीशी उष्णता जाणवूं लागली. शांती अचंबित होऊन म्हणाली, 'आधींच धुगधुगी होती का? कीं प्राण परतून आले आहेत?'

तो महापुरुष म्हणाला, 'असं कधीं झालंय मुली? बरं, याला उचलून पुष्करणीजवळ आणशील का! मी वैद्य आहें—कांहीं उपाय झाला तर करून पाहतों.'

शांतीनें जीवानंदाचा देह सहज उचलून घेतला आणि ती पुष्करणीकडे जाऊं लागली. तो पुरुष म्हणाला, 'तूं याला घेऊन पुष्करणीवर जा आणि देहावरचं सारं रक्त धुवून काढ. तोंपर्यंत मी औषध घेऊन येतों.'

शांती जीवानंदाला घेऊन पुष्करणीच्या कांठीं गेली आणि तिनें तें सारें रक्त धुऊन काढलें. इतक्यांत तो महापुरुष वनस्पतीचा पाला वाटून घेऊन आला होता. त्यानें तो साऱ्या जखमांना लावला.

तो महापुरुष जीवानंदाच्या अंगावरून सारखा हात फिरवीत होता.

एक दीर्घ निःश्वास सोडून जीवानंद उठून बसला. शांतीला पाहून त्यानें विचारलें, 'कुणी लढाई जिंकली?'

शांती म्हणाली, ‘ तुम्ही लढाई जिंकली ! आतां या महात्म्याला प्रणाम करा.’

दोघांनींही पाहिलें, तिथें कुणीच नव्हतें. प्रणाम कुणाला करणार ?

औषधीच्या प्रभावानें जीवानंद अगदीं थोड्या वेळांत पूर्वीसारखाच झाला होता. तो म्हणाला, ‘ शांती, या धन्वंतरीच्या औषधाचा गुण मोठा विलक्षण आहे. मला आतां एवढ्यासुद्धां वेदना होत नाहींत, कीं थकवा वाटत नाहीं. आतां आपण इथून कुठंतरी जाऊं. संतानसेनेच्या विजयोत्सवाचा गजर ऐकूं येतोय ना तुला ? ’

शांती म्हणाली, ‘ आतां त्या बाजूला जायचं नाहीं. मातेचं कार्य सफल झालं. या देशाची मालकी संतानांकडे आली. आम्हांला या राज्यांत भाग नको आहे. आतां कशाला जायचं तिकडे ? ’

‘ जें काढून घेतलं आहे तें मनगटाच्या जोरावर राखलं पाहिजे. ’ जीवानंद म्हणाला.

‘ तें राखण्यासाठीं महेंद्र आहे—स्वतः सत्यानंद आहेत. ’ शांती म्हणाली, ‘ संतानधर्मासाठीं तुम्ही देहत्याग केला—दोषाबद्दल प्रायश्चित्त घेतलं. या पुन्हां मिळालेल्या देहावर आतां कुणाचीच सत्ता नाहीं. संतानांच्या दृष्टीनं आम्हीं मरून गेलों आहों. आम्हांला पाहिल्यावर संतान म्हणतील, ‘ प्रायश्चित्ताच्या भीतीनं हा जीवानंद लढाईच्या वेळीं लपून बसला होता, आतां लढाई जिंकली आहे असं पाहतांच राज्याचा भाग घ्यायला आला ’ तसं व्हायला नको आहे ! ’

‘ हें काय म्हणतेस शांती ? ’ जीवानंद म्हणाला, ‘ लोकापवादाच्या भीतीनं आपलं कर्तव्य सोडायचं का ? मातृसेवा हेंच आमचं कर्तव्य. कुणी कांहीं का म्हणेना, मीं मातृसेवाच करीत राहाणार. ’

‘ आतां तुम्हांला तो अधिकार राहिला नाहीं. ’ शांती म्हणाली, ‘ मातृसेवे-साठीं तुम्ही देहाची सांड केली. आतां पुन्हां त्याच सेवेला वाहून घेतलं, तर तुमच्या प्रायश्चित्ताचं काय ? मातृसेवेपासून वंचित होणं हाच या प्रायश्चित्ताचा मुख्य भाग. नाहींतर नुसताच जीव देणं काय तितकं बिकट आहे ? ’

जीवानंद म्हणाला, ‘ शांती, तुझं म्हणणं बरोबर आहे. मी हें प्रायश्चित्त अपुरं ठेवणार नाहीं. संतानधर्मातच मला सौख्य आहे. त्या सौख्यापासून स्वतः

दुरावल्याशिवाय प्रायश्चित्त पुरं होणार नाहीं; पण आतां जायचं कुठं? मातृ-सेवा सोडल्यावर घरीं जाऊन काय सुखाचा संसार करायचा ? '

'मीं असं कुठं म्हटलं ?' शांती म्हणाली, 'आपण आतां संसारी राहिलों नाहीं—आपण दोघंही आतां संन्यासी—मरेपर्यंत ब्रह्मचर्य पालन करणारे संन्यासी. चला, आतां आपण तीर्थयात्रेसाठीं देशोदेशीं भ्रमण करूं.'

'त्यानंतर—' शांति म्हणाली, 'हिमालयावर जाऊन पर्णकुटी बांधून राहूं आणि भारतमातेचं मंगल व्हावं असा वर मागत परमेश्वराची आराधना करूं.'

तीं दोघंही तिथून उठलीं--हातांत हात घालून त्या पूर्णिमेच्या चांदण्याच्या रात्रीं ती अनंतांत अंतर्हित झालीं.

पुन्हां तीं दिसतील का आई ? जीवानंदासारखा पुत्र, शांतीसारखी कन्या, तुझ्या गर्भांतून पुन्हां निर्माण होतील का आई ?

— ८ —

त्या लढाईच्या मैदानावरून सत्यानंद ठाकूर कुणाला कांहीं न सांगतां आनंदमठांत निघून आले. त्या गंभीर रात्रीच्यावेळीं विष्णुमंडपांत येऊन ते ध्यानासाठीं बसले होते. इतक्यांत शांतीला भेटलेले ते वैद्य—ते **धन्वंतरी** तिथें येऊन उभे राहिले. त्यांना पाहातांच सत्यानंदांनीं उठून त्यांना प्रणाम केला.

धन्वंतरी म्हणाले, 'सत्यानंद, आज माघी पूर्णिमा !'

'चला—मीं तयार आहें.' सत्यानंद म्हणाले, 'पण हे महात्मन्, माझी एक शंका आहे, ती दूर करा. ज्या क्षणाला युद्धांत जय मिळवून सनातन धर्म मीं निष्कंटक केला, त्याचवेळीं आतां मला माघार घ्यायचा हा आदेश कां मिळतो आहे ?'

'तुझं कार्य पूर्ण झालं आहे.' जे तिथें आले होते ते म्हणाले, 'मुसलमान राज्याचा विध्वंस झाला आहे. आतां यापुढं तुझ्यासाठीं काम राहिलेलं नाहीं. निरर्थक जीवहत्या करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.'

सत्यानंद म्हणाले, 'मुसलमान राज्याचा नायनाट झाला खरा, पण अजून हिंदूराज्याची स्थापना झालेली नाहीं—अजूनही कलिकात्यांत इंग्रज विद्यमान

आहेत—बलाढ्य होऊन बसलेयत.'

हिंदुराज्य यावेळीं अस्तित्वांत येणार नाहीं.' ते म्हणाले, 'तूं इथं राहिलास तर निरर्थक नरहत्या होईल. चल माझ्याबरोबर'

त्यांचें तें भाषण ऐकतांच सत्यानंदांचा मर्मभेद झाला. ते हताश झाले. ते म्हणाले, 'हे प्रभू, हिंदूराज्य जर अस्तित्वांत येणार नाहीं, तर या देशाचा राजा कोण होणार? पुन्हां मुसलमानच राजे होणार काय?'

'नाहीं!' ते म्हणाले, 'आतां इंग्रज राजा होणार!'

सत्यानंदांच्या दोन्ही डोळ्यांतून आसवांच्या धारा वाहूं लागल्या. समोर असलेल्या मातृरूपा जन्मभूमीच्या प्रतिमेसमोर हात जोडून सद्गदित कंठानें ते म्हणाले, 'आई, शेवटीं तुझा उद्धार करणं माझ्या हातून घडलं नाहीं. पुन्हां तूं म्लेंच्छांच्याच हातीं जाणार. संतानांचा हा अपराध पोटांत घाल आई! कां मला या लढाईच्या मैदानावर मृत्यु आला नाहीं?'

सत्यानंद, असा हताश होऊं नकोस.' धन्वंतरी म्हणाले, 'बुद्धीच्या भ्रमामुळं तूं दरोडेखोरी करून पैसा गोळा केलास—लढाई जिंकलीस-पापाचं फळ कधीं पवित्र असत नाहीं, म्हणूनच तुम्हां लोकांना देशाचा पुरा उद्धार करणं अशक्य झालं. यापुढं जें कांहीं होणार आहे, तें सारं बऱ्यासाठींच! इंग्रज राजा झाला नाहीं तर सनातन धर्माचा पुनरुद्धार होणं शक्य नाहीं. महान् सिद्ध पुरुषांनी द्रष्टे या नात्यानं जें पाहिलं आहे, तेंच तुला मीं समजावून सांगतों आहें. मन लावून ऐक. तेहेतीस कोटी देवतांची पूजा म्हणजे सनातन धर्म नव्हे. हा एक लौकिक धर्म आहे. या लौकिकधर्माच्या प्रभावामुळं खरा सनातनधर्म, म्लेंच्छ ज्याला हिंदूधर्म म्हणतात तो धर्म—लोप पावला आहे. खरा सनातनधर्म ज्ञानात्मक नाहीं. हें ज्ञान दोन प्रकारचं आहे; एक बहिर्विषयक आणि एक अंतर्विषयक. हें अंतर्विषयक ज्ञान म्हणजेच सनातनधर्माचं मुख्य अंग—पण बहिर्विषयक ज्ञान आधीं झाल्याशिवाय अंतर्विषयक ज्ञानाच्या अनुभूतीची संभावना नाहीं.

सध्या या देशांत बहिर्विषक ज्ञानच मिळत नाहीं—तें शिक्षण देतील असेही कुणी इथं नाहींत. लोकशिक्षणाच्या बाबतींत आम्हीं अनभ्यस्त आहोंत, म्हणूनच बहिर्विषयक ज्ञान दुसऱ्याच कोणत्या तरी देशापासून आम्हीं संपादन

केलं पाहिजे. बहिर्विषयक ज्ञानांत इंग्रज महापंडित आहेत—लोकशिक्षणाच्या कामीं अत्यंत निष्णात आहेत. म्हणूनच इंग्रजांच्या हातीं हें राज्य द्यायचं. इंग्रजी शिक्षणानं या देशाचे लोक बहिर्विषयक ज्ञानांत सुशिक्षित झाले म्हणजे अंतर्विषयक ज्ञान प्राप्त करून घ्यायला ते समर्थ होतील.

इंग्रजांच्या राज्यांत प्रजा सुखी होईल —धर्माचरण निष्कंटक होईल. अतएव हे बुद्धिमान पुरुषा, इंग्रजांबरोबर युद्ध करायची कल्पना सोडून देऊन माझ्याबरोबर चल.'

सत्यानंद म्हणाले, 'हे महात्मन्, इंग्रजांनीं हें राज्य चालवावें असा जर आपला उद्देश होता, इंग्रजांचं राज्य चालू काळांत देशाच्या दृष्टीनं मंगलप्रद आहे असं जर आपल्याला वाटत होतं तर आम्हां लोकांना आपण या नृशंस युद्धकार्याला कां जुंपलंत ? '

महापुरुष म्हणाला, 'इंग्रज आज व्यापारी आहेत. पैसा मिळवण्यावरच त्यांची दृष्टि आहे. राज्यकारभार हातीं घ्यायची अजून त्यांची तयारी नव्हती. या संतानांच्या बंडामुळं राज्यकारभार हातीं घेणं इंग्रजांना भाग पडेल. राज्यशासनाशिवाय अर्थसंग्रह होत नाहीं. हें संतानांचं बंड निर्माण करावं लागलं तें इंग्रजांना या राज्यावर बसवावं म्हणूनच. चल आतां—ज्ञानसंपादन केलंस कीं सारं कांहीं तुझं तुलाच कळून येईल.'

सत्यानंद म्हणाले, 'हे महात्मन्, मला ज्ञान नको आहे—ज्ञानाची मला जरुरी नाहीं. जें व्रत मीं पत्करलं आहे तेंच मीं पालन करणार. माझी मातृभक्ति अचल राहो, एवढाच मला आशीर्वाद द्या '

'तुझं व्रत सफल झालं आहे.' महापुरुष म्हणाला, 'मातृभूमीचं कल्याण झालं आहे. इंग्रजांचं राज्य अस्तित्वांत आलं आहे. पृथ्वी शस्यशालिनी होवो. भारताचा उत्कर्ष होवो.

चल. आधीं ज्ञानलाभ करून घे चल. हिमालयाच्या शिखरावर मातृमंदिर आहे, तिथून तुला मातेचं खरं स्वरूप दाखवतों चल !' असें म्हणून महापुरुषानें सत्यानंदाचा हात धरला.

केवढें अपूर्व दृश्य होतें तें ! त्या गंभीर विष्णुमंदिरांत प्रचंड चतुर्भुज मूर्तीसमोर मिणमिणत्या प्रकाशांत त्या महाप्रतिभापूर्ण दोन पुरुषमूर्ति शोभायमान होत होत्या. एकानें दुसऱ्याचा हात धरला होता.

कुणी कुणाला धरलें होतें ?

ज्ञानानें येऊन भक्तीला धरलें होतें—धर्मानें येऊन कर्माला धरलें होतें—विसर्जनानें येऊन प्रतिष्ठेला धरलें होतें—कल्याणीनें येऊन शांतीला धरलें होतें.

सत्यानंद म्हणजेच शांती ! महापुरूष म्हणजेच कल्याणी ! सत्यानंद म्हणजे प्रतिष्ठा—महापुरूष म्हणजे विसर्जन !

विसर्जन आलें आणि प्रतिष्ठेला घेऊन गेलें.

— वन्दे मातरम् —

जय भारत

# परिशिष्ट

प्रस्तुत कादंबरी १८८० सालीं 'वंगदर्शन' नामक बंगाली मासिकांत क्रमशः सुरू झाली होती, ती १८८२ सालच्या ज्येष्ठ महिन्यांत संपूर्ण झाली. त्याच सालीं—म्हणजे १८८२ सालीं—ती पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली.

या कादंबरींत कर्त्यानें आपल्या आयुष्यांत वेळोवेळीं बरेच फेरफार केले होते. पहिल्या आवृत्तींत उपक्रमणिकेंत एक, प्रथमखंडांत पंचवीस आणि द्वितीय खंडांत वीस, असे सेहेचाळीस परिच्छेद एकशें एक्याण्णव पानांत पुरे झाले होते. कर्त्याच्या हयातींतच शेवटची पांचवी आवृत्ति निघाली होती आणि तींत उपक्रमणिका एक, प्रथमखंड अठरा, द्वितीय खंड आठ, तृतीय खंड बारा आणि चतुर्थ खंड आठ, असे सत्तेचाळीस परिच्छेद दोनशेंअकरा पृष्ठांत पुरे झाले होते.

प्रस्तुत भाषांतर या पुस्तकाच्या पांचव्या आवृत्तीवरूनच केलेलें आहे. यानंतर या पुस्तकाच्या बऱ्याच आवृत्त्या निघाल्या आणि वंगभंगाच्या चळवळीच्या वेळीं 'वन्दे मातरम्' हें गीत युद्धगीताप्रमाणें वापरण्यांत येऊं लागलें म्हणून ब्रिटिश सरकारनें हें पुस्तक जप्त केलें.

आज हें पुस्तक वाचलें असतांना असें दिसून येतें, कीं यांत ब्रिटिशांविरुद्ध कांहीं नव्हतें. उलट ब्रिटिश राज्याच्या अस्तित्वाचें आणि उपकारिकतेचें समर्थनच करण्यांत आलें होतें. असें असूनही त्यावेळीं हें पुस्तक जप्त करण्यांत आलें तें केवळ 'वंदेमातरम्' गीतामुळें. किंबहुना राष्ट्रीयत्वाच्या भावनेला पोषक असणारें, कुठल्याही जुलमी राजसत्तेविरुद्ध विद्रोह उत्पन्न करायला प्रवृत्त वाङ्मय त्यावेळच्या सरकारला नको होतें म्हणूनच हें पुस्तक त्यावेळीं जप्त करण्यांत आलें. मधल्या काळांत त्याच्यावरची बंदी एकदां उठली होती आणि पुन्हां १९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळीनंतर पुन्हां तें जप्त करण्यांत आलें होतें. पुन्हां त्याजवरील बंदी उठवण्यांत आली ती कॉंग्रेस मंत्रिमंडळें अस्तित्वांत आल्यावर.

'संतानांचें बंड,' ज्याला स्वातंत्र्यसंग्राम असें नांव देतां येईल, ती घटना म्हणजे ऐतिहासिक सत्य आहे. १८५७ सालच्या पूर्वीचा हा स्वातंत्र्यसंग्राम आहे त्या घटनेचा जो काल दिला आहे तोही ऐतिहासिक आहे. मात्र प्रस्तुतः कादंबरींत या 'संतान' पुढाऱ्यांना ज्याप्रकारचें धार्मिक आणि उज्वल स्वरूप देण्यांत आलें आहे, तसें 'बंड' करणारे संतान वस्तुतः अस्तित्वांत नव्हते. ते केवळ बंडखोर होते. त्या बंडखोरांची भूमिका ध्येयवादी किंवा राष्ट्रवादी नव्हती. ते जुलमाला विटले होते यांत शंकाच नाहीं, तें बंड जुलूमशाहीविरुद्धच होतें हेंही खरें, पण त्या बंडखोरांच्या वृत्तींत आणि ध्येयांत मूलभूत फरक होता. प्रस्तुत कादंबरींत कर्त्यानें या संतानांच्या प्रवृत्तीचें जें उदात्तीकरण केलें आहे, ती लेखकाची स्वतंत्र कल्पना आहे.

अक्षयचन्द्र सरकार यांनीं बंकिम बाबूंवरील आपल्या लेखांत म्हटलें आहे, 'आनंदमठ ज्यावेळीं लिहिलें जात होतें, त्यावेळीं क्षेत्रनाथ मुखोपाध्याय हेही त्यांच्यासारखेच एक डेप्युटी कलेक्टर होते. दोघेही शेजारीं शेजारींच राहात होते. तेही संध्याकाळीं बंकिमबाबूंच्या घरीं येत असत तसाच मींही जात असें.

क्षेत्रबाबू स्वरज्ञ होते. त्यांनींच हें गीत टेबल हार्मोनियम हातीं घेऊन 'मल्हार' रागांत बसवलें होतें. त्या स्वराला अनुसरून आणि तें गीत तालबद्ध करण्यासाठीं क्षेत्रबाबूंच्या सूचनेप्रमाणें त्यांनीं त्या गीतांत क्वचित् फेरबदल केले होते.'

आज 'वंदे मातरम्' गीताला जे निरनिराळे 'राग' लावले जाण्याचा प्रयत्न होत आहे, तो ध्यानीं येऊनच या गोष्टीचा उल्लेख इथें केला आहे. 'मल्हार हाच राग या गीताला युक्त आहे आणि त्याच रागांत हें गीत म्हटलें जावें. भलभलते राग लावण्याचा प्रयत्न अप्रयोजक आहे.

या कादंबरींत कालाचा फरक नसला तरी कथावस्तूच्या 'स्थला' च्या बाबतींत मात्र मतभेद आहे. कांहींच्या मतें संतानांचें बंड बीरभूम जिल्ह्याच्या आसपास कुठेंतरी झालें होतें, तर कुणाचें म्हणणें तें पूर्णिया, तिरहूत आणि दीनापूर या भागांत झालें असावें.

२८७५० ७-२-५७

संतानांच्या कार्यपद्धतींत आणि चारित्र्यांत या कादंबरींत जरी कल्पनाशक्तीचें स्वातंत्र्य अवलंबिलें आहे, तरीही तें अगदींच ऐतिहासिक नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. स्वतः बंकिमबाबू ही कादंबरी केवळ काल्पनिक आहे असेंच म्हणत असत.

मात्र या कादंबरींतील घटना ऐतिहासिक आहेत. वॉरन हेस्टिंग्सच्या पत्रांत या घटनांचा उल्लेख आहे. त्या पत्रांत असें म्हटलें आहे, ' रंगपूरच्या जवळपास परगण्याचे शिपाई बरोबर घेऊन कॅप्टन टॉमस नामक नामजादा अधिकारी निघाला होता. त्याच्यावर तीन हजार बंडखोरांनीं हल्ला करून त्याचा जीव घेतला हे हल्लेखोर संन्यासी होते. ' त्याच पत्रसंग्रहांतील आणखी एका पत्रांत म्हटलें आहे, ' आमच्या प्रांताला सध्यां लढाईचें स्वरूप आलें आहे. एका संन्याशांच्या टोळीनें परगणा शिपायांच्या तुकडीवर हल्ला करून दोन ऑफिसरांचा शिरच्छेद केला. त्यांतले एक तुमच्या परिचयाचे कॅप्टन टॉमस हे होते. ब्रिगेड शिपायांचीं चार बटॉलियन्स त्यांचा पाठलाग करीत आहेत, पण हे लोक समोरासमोर लढाई देत नाहींत. त्यांची छावणी नसते, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या अंगावर कपडेसुद्धां नसतात. नदीनाल्यांचा आधार धरून ते लढत असतात. त्यांना घरदार नाहीं, बायकापोरें नाहींत, ते गांवोगांव भटकत हिंडत असतात आणि कोणत्याही गांवांतील सुदृढ मुलें दिसलीं, कीं त्यांना घेऊन आपल्यांत सामील करून घेतात. ते महाबलवान् आणि कर्तृत्वान् लोक आहेत. त्यांत कांहीं व्यापारीही आहेत. पण बहुतेक लोक यात्रेकरूसारखे रहात असल्यामुळें सामान्य नागरिकांचा त्यांच्याबद्दल आदर आहे आणि त्याचमुळें त्यांच्या हालचालींची कांहींही माहिती द्यायला कुणीही तयार नसतो. एकदम आकाशांतून खालीं पडल्याप्रमाणें ते कुठूनही उपस्थित होतात. ते कणखर आहेत, शूर आहेत आणि त्यांचा उत्साह असामान्य असल्यामुळें ते भारी होऊन बसले आहेत. '

वॉरन हेस्टिंग्च्या या पत्रांतील पुष्कळशी माहिती इथें देण्याजोगी असली तरी विस्तारभयास्तव ती देणें अशक्य झालें आहे.

वास्तविक संन्यास हा शैवांचा धर्म आहे वैष्णवांचा नव्हे. बंगाल्यांत बहुधा सर्वच गोसावीबैराग्यांना ' संन्यासी किंवा फकीर ' म्हणायची सुरवात त्या प्रांतांत पहिल्यानें आलेल्या इंग्रजांनीं केल्यामुळें आणि त्यांच्या सहकारी

अहवालांत तोच शब्द वापरला गेल्यामुळें बंकीमबाबूंनीं या संतानांना उद्देशून ' संन्यासी ' हा शब्द वापरला असावा. मात्र त्या त्या व्यक्तीचा वैयक्तिक उल्लेख करतांना त्यांनीं ' गोस्वामी ' हा शब्द वापरल्यामुळें 'आनंदमठां 'तील संन्यासी वैष्णव ठरत आहेत. या वैष्णव गोस्वाम्यांचे वेष किंवा आचारविचार कोणत्याही दृष्टीनें संन्याशांसारखे नाहींत.

सर वाल्टर स्कॉटच्या Old Mortality या कादंबरीशीं ' आनंदमठ ' कादंबरीचें बरेंचसें साम्य आहे. दोन्हींही कथेंत बंडखोर संन्यासी किंवा धर्मोन्मत्त योद्धे राजशक्तीशीं झगडा करीत होते. ज्या विशिष्ट काळांत बंकीमबाबूंनीं ही कादंबरी लिहिली त्या काळांत इंग्रजी वाङ्मयाचा प्रभाव मराठी वाङ्मयनिर्मितीवर पडल्यावांचून राहात नव्हता.

या कादंबरीच्या कालखंडाचा इतिहासाच्या दृष्टीनें अभ्यास करणें अवश्य आहे. बंगाली भाषेंत आणि इंग्रजींतही या कादंबरीवर चिकित्सक दृष्टीनें लिहिलेले अनेक लेख आहेत. त्या सर्वांची यादी या लहानशा प्रस्तावनेंत देणें अशक्य आहे.

श्री नरेशचंद्र सेनगुप्त यांनीं १९०६ सालीं Abbey of Bliss या नांवानें या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध केला आहे. श्री. अरविंद घोष यांनीं ' वंदे मातरम् ' या गीताचा इंग्रजींत गद्य आणि पद्य अनुवाद केला आहे. Encyclopedia Britanica मध्यें प्रस्तुत कादंबरी आणि वंदे मातरम् गीत यांजबद्दल जो लेख आलेला आहे, तो आजच्या विद्यार्थ्यानें नजरेखालीं घालणें अवश्य आहे.

या कादंबरीचा मराठी अनुवाद श्री. शिवराम गोविंद फाळके यांनीं १८९७—९८ च्या सुमारास बडोदे येथें प्रसिद्ध केला होता. त्याशिवाय भारतगौरव ग्रंथमालेंतून वासुदेव गोविंद आपटे यांनीं केलेला अनुवाद १९२३ सालीं प्रसिद्ध झाला होता. आज हीं पुस्तकें उपलब्ध नाहींत. शिवाय आजच्या काळांत अनुवादाच्या पद्धतींतही नवी दृष्टी निर्माण झालेली आहे, त्या दृष्टीनें शक्य तेवढ्या सुबोध भाषेंत हा अनुवाद करण्याचा मीं प्रयत्न केला आहे. उगीच द्विरुक्तीनें जिथें जिथें शब्दावडंबर केलेलें आहे तिथलीं कांहीं वाक्यें किंवा वाक्यसमूह अनुवाद करतांना टाळले आहेत.

आज सर्वत्र ' वंदे मातरम् ' म्हणून जो तो टाहो फोडीत आहे, पण ' वंदे मातरम् ' गीताची उत्पत्ति कोणत्या परिस्थितींत झाली याची आजच्या पिढीला कितपत जाणीव आहे ? एका कादंबरीकारानें आपल्या एका कादंबरींत घातलेलें हें गीत आज अखिल भारताचें राष्ट्रगीत होऊन बसलें आहे, हें आजच्या देशीभाषेच्या विश्वविद्यालयीन अध्यापकांना या अनुवादामुळें तरी कळून येईल. कथा, कादंबरी, नाटकादी स्वयंकल्पित साहित्याची ललितवाङ्मय म्हणून हेटाळणी करणाऱ्या स्वयंमन्य पंडितांच्या बुद्धिवादाला ही कादंबरी म्हणजे एक बिनतोड उत्तर आहे.

जगाच्या इतिहासांत उलथापालथ झाली आहे, ती समशेरीच्या जोरापेक्षां कथा, कादंबरी, नाटक लिहिणाऱ्या लेखकाच्या लेखणीच्या मान्यामुळेंच लेखणीच्या कसोटीवर समशेरींना धार चढवली आहे. या अनुवादामुळें आजच्या विद्यार्थ्यांला एवढी जरी जाणीव झाली, तरी या माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें मी समजेन.

हाजीकासम वाडी,
मुंबई ७
गुरुवार ता. ३ जुलै १९५२

**मामा वरेरकर**

IRBK-0105325
IRBK-0105325